मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
नोंदणी क्रं. एफ.१६०९४(मुंबई)

सत्यमेव जयते

महाराष्ट्र शासन
मराठी भाषा विभाग
राज्य मराठी विकास संस्था
एल्फिन्स्टन तांत्रिक विद्यालय, ३, महापालिका मार्ग,
धोबीतलाव, मुंबई - ४००००१ दूरध्वनी : (०२२) २२६३१३२५ / २२६५३९६६
संकेतस्थळ https://rmvs.marathi.gov.in इ-पत्ता rmvs_mumbai@yahoo.com

निवेदन

महाराष्ट्र राज्याचे सांस्कृतिक धोरण २०१० अंतर्गत मराठी भाषेतील प्रतिमुद्राधिकाराची (कॉपीराइटची) मुदत संपलेले दुर्मिळ ग्रंथ महाजालावर उपलब्ध करून द्यावे असे म्हटले आहे. त्यानुसार मराठी भाषा विभागाच्या आदेशाप्रमाणे (शासननिर्णय क्र. रासांधो १०१२/ प्र. क./२०१२/भाषा-३ दि. २८ मार्च २०१३) राज्य मराठी विकास संस्थेद्वारे असे ग्रंथ आणि नियतकालिके महाजालावर उपलब्ध करून देण्याचा प्रकल्प राबवण्यात येत आहे. त्याच बरोबर प्रतिमुद्राधिकाराच्या कक्षेत येणारी काही साधनेही प्रतिमुद्राधिकारधारकांची उचित अनुमती प्राप्त झाल्यास संस्थेद्वारे संगणकीकृत करून अभ्यासकांसाठी उपलब्ध करून देण्यात येत असतात.

सदर प्रकल्पांतर्गत **विदर्भ साहित्य संघ, नागपूर** ह्या संस्थेद्वारे प्रकाशित करण्यात येणाऱ्या **युगवाणी** ह्या नियतकालिकाच्या अंकांचे संगणकीकरण करून ते सार्वजनिकरीत्या आणि विनामूल्य उपलब्ध करून देण्यासंदर्भात उपरोक्त संस्थेला आवाहनपर विनंती करण्यात आली होती.

सदर विनंती मान्य करून विदर्भ साहित्य संघाद्वारे सदर अंक संगणकीकरणासाठी उपलब्ध करून देण्यात आले. हे अंक सदर संस्थेच्या सहकार्यामुळेच आपल्याला संगणकीय स्वरूपात उपलब्ध होत आहेत.

या अंकांच्या पीडीएफ प्रती आपण विनामूल्य उतरवून घेऊ शकता. असे करताना खालील सूचना लक्षात घेऊन त्यांचे पालन करावे.

१. सदर ग्रंथांच्या पीडीएफ प्रती या वैयक्तिक वापरासाठी विनामूल्य उतरवून घेता येतील तसेच इतरांनाही विनामूल्य देता येतील. पण कोणत्याही कारणासाठी त्याचा व्यावसायिक वापर करता येणार नाही.
२. सदर ग्रंथांचे दुवे इतरांना देताना त्यासाठी कोणतीही रक्कम आकारता येणार नाही.
३. पीडीएफ प्रतींवर असलेली राज्य मराठी विकास संस्था, मुंबई व विदर्भ साहित्य संघ, नागपूर यांची मुद्रा आपणास काढता येणार नाही.
४. आपल्या अभ्यासासाठी, संशोधनासाठी या सामग्रीचा उपयोग करताना आपण योग्य तो श्रेयनिर्देश केला पाहिजे.

वरील अटींचा भंग झालेला आढळल्यास कायदेशीर कारवाई करण्यात येईल.

स्पष्टीकरण : सदर सामग्री ही केवळ ऐतिहासिक दस्तऐवज म्हणून उपलब्ध करण्यात आली असून या सामग्रीतून व्यक्त होणारी मते, विचारसरणी इ. त्या त्या लेखक, संपादक इ. कर्त्यांची आहे. त्यांपैकी कोणतेही मत, विचारसरणी इ. यांचा पुरस्कार महाराष्ट्र शासन, मराठी भाषा विभाग, राज्य मराठी विकास संस्था व विदर्भ साहित्य संघ, नागपूर यांपैकी कुणीही करत नसून त्या त्या मताचे वा विचारसरणीचे दायित्व उपरोक्त विभागांवर/ संस्थांवर असणार नाही.

सदर अंक केवळ अभ्यासकांच्या सोयीसाठी संगणकीय स्वरूपात उपलब्ध करण्यात येत असून अंकांतील सामग्रीचे (लेखन, मांडणी, छायाचित्रे, रेखाचित्रे इ.) प्रतिमुद्राधिकार त्या त्या लेखकांकडे अथवा प्रकाशकांनी त्या त्या वेळी केलेल्या व्यवस्थेनुसार आहेत ह्याची नोंद घेण्यात यावी. त्या सामग्रीसंदर्भातील कोणतेही अधिकार वा दायित्वे राज्य मराठी विकास संस्था, मराठी भाषा विभाग किंवा महाराष्ट्र शासन ह्यांच्याकडे असणार नाहीत.

अनुक्रमणिका

मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

मराठीचा विकास : महाराष्ट्राचा विकास

राज्य मराठी विकास संस्थेद्वारे
संगणकीकृत

अनुक्रमणिका

मराठीचा विकास : महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे
संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

विदर्भ साहित्य संघाचे मुखपत्र

विदर्भ साहित्य संघ, नागपूर
दुर्मिळ ग्रंथ संपदा

युगवाणी

ऑगस्ट-सप्टेंबर, १९७८

अनुक्रमणिका

मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

साभार पोच

क्रमांक	पुस्तकाचे नाव	लेखक	प्रकाशक	पृष्ठे	मुल्य रु. पैसे
१.	सलाम	मंगेश पाडगांवकर	मौज प्रकाशन गृह, मुंबई-४	६३	१०.००
२.	ॲरिस्टॉटलचे काव्यशास्त्र	गो. वि. करंदीकर		२३२	१८.००
३.	मातृका	पु. शि. रेगे		१३६	१३.५०
४.	डॉ. पटवर्धन ऊर्फ माधव ज्यूलियन	द. न. गोखले		४४१	४०.००
५.	राजकीय भारत	भा. ल. भोळे	अमेय प्रकाशन, महाल, नागपूर	१७८	२५.००
६.	श्री समर्थ रामदास यांची करुणाष्टके	डॉ. अ. ना. देशपांडे		७८	१०.००
७.	राही	पद्मजा फाटक		१३३	१५.००
८.	लाखातील एक	बाळ गाडगीळ	,,	१२७	१५.००
९.	महावीर युग और जीवन दर्शन	डॉ. हिरालाल जैन	श्री. हुकुमचंद जैन, इतवारी चौक, नागपूर श्री. द. भगवान महावीर २५०० वा निर्वाण महोत्सव समिति यांचे कडून	५८	२.५०
१०.	तीर्थंकर भगवान महावीर	डॉ. हुकुमचंद भारिल्ल		१६	
११.	भगवान महावीर उपदेश व परंपरा	डॉ. विद्याधर जोहरापूरकर		७०	
१२.	इष्टोपदेश	प. नरेन्द्र ज. भिसीकर		९५+२३	२.००
१३.	अनेकान्त व स्याद्वाद	डॉ. हुकुमचंद भारिल्ल		१२	०.३५
१४.	महावीर : व्यक्तित्व उपदेश और आचार मार्ग	रिषभदास रांका		१२४	३.५०
१५.	तीर्थंकर महावीर और उनका सर्वोदयतीर्थ	डॉ. हुकूमचंद भारिल्ल		२००	५.००
१६.	भगवान महावीर का इष्ट उपदेश	डॉ. हरिलाल जैन		२३	०.५०
१७.	अपने को पहिचानिए	डॉ. हुकूमचंद भारिल्ल		२८	० ६५
१८.	समण सुत्तं	संपा. कृष्णराज मेहता		२७८	१०.००
१९.	भारतीय संस्कृतीला जैन धर्माची देणगी	अनु. जितेन्द्रकुमार दा. भोमाज		५३२	१५.००
२०.	निखारा	नीलकांत चव्हाण	कविता प्रकाशन, चौक मंडई, बेळेगल्ली, नाशिक	४५.००	५.००
२१.	करवीरचे छत्रपती आणि पोर्तुगीझ	स. शं. देसाई	शं. बं. भोसले, ऑपरेटींग ट्रस्टी, छत्रपती कल्च. एज्यु. चॅरिटेबल ट्रस्ट, न्यू पॅलेस, कोल्हापूर	९८+९५	१०.००
२२.	लज्जागौरी	रा. चिं. ढेरे	श्री विद्या प्रकाशन, २५० क/१६, शनिवार पेठ, अल्भुजा देवी रस्ता, पुणे-३०	२२८	२५.००
२३.	संत साहित्य आणि लोकसाहित्य			२१६	२५.००
२४.	एकनाथ दर्शन अर्थात एकनाथांच्या वाङ्मयाचे सारसत्त्व	गं. बा. सरदार	मॉर्डन बुक डेपो, ३०६, नारायणपेठ, पुणे-३०	१३९	१२.००

⊗ ⊗ ⊗

अनुक्रमणिका

मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
मकर संक्रांत. १९२३
विदर्भ साहित्य संघ

' महाराष्ट्र राज्य साहित्य व संस्कृति मंडळ ' पुरस्कृत विदर्भ साहित्य संघाचे मुखपत्र

युगवाणी

ऑगष्ट-सप्टेंबर, १९७८
श्रावण-भाद्रपद, १९००

संपादक :
वि. बा. प्रभुदेसाई

मूल्य तीन रुपये) (वर्ष ३४, अंक ५-६

संपादक-मंडळ :
सुरेश डोळके, श्रीधर शनवारे, सुनील सुभेदार, बजरंग सरोदे, यशवंत मनोहर, म. वा. कुंडले

संपादकीय

मराठी भाषा, साहित्य, संस्कृती, इतिहास, मराठीचे अध्ययन, अध्यापन आणि संशोधन, तसेच शिल्प, संगीत, चित्र, नृत्यनाटयादी ललितकला यांविषयीचे साहित्य प्रसिद्ध करतांना व्यापक दृष्टिकोण स्वीकारून 'युगवाणी' यथाशक्ती वाटचाल करीत आहे. या तपश्चर्येच्या सफलतेसाठी आपणा सर्वांच्या लोभाची, आस्थेची आणि सहकार्याची नितान्त आवश्यकता आहे, हे ओघानेच आले.

विदर्भ साहित्य संघाचे सर्व वर्गणीदार हे तर 'युगवाणी'चे वाचक आहेतच. या व्यतिरिक्त बृहन्महाराष्ट्रातील अनेक संस्था आणि व्यक्तीदेखील 'युगवाणी'चे वर्गणीदार आहेत. दरवर्षी 'युगवाणी'चा वाचकवर्ग वाढत असला तरी वर्गणीमध्ये वाढ करता न आल्यामुळे आर्थिक झळ सोसूनदेखील या नियत-कालिकाचे प्रकाशन करावे लागते. इच्छा असूनही आर्थिक ओढगस्तीमुळे लेखकवर्गाला मानधन देणे मात्र शक्य होत नाही.

'युगवाणी' मध्ये सामान्यत: आदानप्रदान तत्त्वावर जाहिराती घेतल्या जातात. त्याशिवाय शासनाकडून व व्यापाऱ्यांकडूनदेखील जाहिराती मिळविण्याचे प्रयत्न केले गेले, पण त्याला योग्य तो प्रतिसाद अद्यापतरी मिळालेला नाही.

महाराष्ट्रातील काही अन्य नियतकालिकांप्रमाणे 'युगवाणी'चा मुख्य निर्वाह हा 'महाराष्ट्र राज्य साहित्य संस्कृति मंडळा'च्या अनुदानावरच होत असतो. या अनुदानाच्या संदर्भातील काही अपेक्षा संबंधितांच्या माहितीसाठी म्हणून येथे उद्धृत करतो :—

"मंडळाच्या अनुदान — योजनेखाली येणाऱ्या नियतकालिकास सर्वसाधारणपणे विषयाचे बंधन नाही. परंतु, त्यात येणारे साहित्य हे मौलिक व संशोधनपूर्ण पाहिजे व साहित्य, विज्ञान आदी क्षेत्रांतील नव-विचार, साहित्य समीक्षा व अत्याधुनिक माहिती देणारे असे असले पाहिजे. केवळ काव्य, कथा आदी ललित साहित्यास वाहिलेल्या नियतकालिकाचा त्या नियमांनुसार अनुदानार्थ विचार केला जाणार नाही. नियतकालिकात येणाऱ्या साहित्य समीक्षणात्मक वाङमयामध्ये पूर्वग्रहदूषित व वैयक्तिक टीकेस स्थान दिले जाऊ नये."

'युगवाणी'ला या बंधनांच्या पलीकडे सहसा जाता येणार नाही, याकडे कृपया सर्वांचे लक्ष असू द्यावे.

अनुक्रमणिका

मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
मकर संक्रांत. १९२३
विदर्भ साहित्य संघ

अंतरंग

सहा लेख :— देवीसींग व्य. चौहान, प्राकृत सिणेह–, सिण्हा– बर्फ–१०५, श्रीकांत तिडके, शिवकालीन शौर्याचे अक्षरस्तोत्र वीरायण–१०९, वा. बा. खापर्डे, "लोकमान्य और प्रॉफेट ऑफ स्वराज्य" या नाटकाचा परिचय–११६, भा. त्र्यं. परांजपे, रामाचा अश्वमेध–११८, दिनकर बेडेकर, एक टिपण : अरुण कोलटकरांच्या कवितांसंबंधी–१३१. व्ही. पी. दामले, मानवावतार–१३६.

दोन कथा :— वर्षा रेगे, मुखवटा–११३. सुभंत दिनकर रहाटे, सुरुवात–१२१.

आठ कविता :— कल्पना दामले, अनुभवाच्या तीन कविता–१०८, रत्ना महाजन, मी–१०८, नंदकुमार शेंगडे, गाणे–११२, नंदकुमार शेंडगे, उत्खनन–१२०, सु. मा. कुळकर्णी, खुंट्या–१२०, निरंजन उजगरे, सायकल रिक्षावाला–१३४, श्रीकांत गोडबोले, जाग–१३४, श्रीकृष्ण राऊत, स्वतःच्या खांद्यावर–१३९.

चार ग्रंथपरीक्षणे :— ज. शा. देशपांडे, मराठी वाङ्मय कोश–१२७, मधुकर वाकोडे, रंगगंधा–१२८, दिलीप देशपांडे, जी. एं. ची कथा–१३५, नीलिमा कुलकर्णी, वेडगळ–१४०, याशिवाय कार्यवृत्त, साभार पोच इत्यादी.

चुकीची दुरुस्ती

श्री. वा. रा. ढवळे, मुंबई, यांनी 'युगवाणी'च्या एप्रिल-मे, १९७८ च्या अंकातील एक चूक पुढील-प्रमाणे मला लिहिलेल्या पत्रात निदर्शनाला आणल्याबद्दल मी त्यांचा आभारी आहे.

"वि. द. घाटे यांच्यावरील स्फुटात अहमदावाद संमेलनाचे साल १९५२ असे चुकीचे पडले आहे. संमेलन १९५३ साली झाले. ते रविकिरण मंडळाचे संस्थापक सभासद नव्हते. नाट्य छटाकारांच्या राजीनाम्यामुळे घाटे यांना घेण्यात आले"

—संपादक

अनुक्रमणिका

मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
मकर संक्रांत, १९२३
विदर्भ साहित्य संघ

देवीसींग व्य. चौहान / प्राकृत सिणेह-, सिण्हा- 'बर्फ' (मूळ लेखक–राल्फ् एल्. तर्नर[१])

भारोपीय शब्द *स्नेड्ग्व्ह्–, याचा मूळ अर्थ काहीही असो, हे स्पष्ट आहे की, याचा अगोदरच वर्फ, हिम असा अर्थ भारोपीय समाजाच्या काळी रूढ होता. या गटातील शब्द भारोपीय भाषेच्या सर्व शाखांत आढळून येतात. याला अपवाद केवळ हित्ताईत, अल्बेनियन, अर्मेनियन व तोखारी (या भाषेत उपलब्ध शब्द–संग्रह फारच अल्प आहे) भाषांचा आहे. आणखी, प्राचीन रूपांमध्ये विलक्षण साम्य आढळून येते. उदाहरणार्थ, ग्रीक धातुनाम **निफ**=लातिन निवेम्; ग्रीक भाषेतले वर्तमान-काळी रूप **नेइफ़ेइ**=लातिन **निवित** (कदाचित ई रूपासह)=ओल्द हाय जर्मन **स्नीवन्**=अवेस्ता स्नएज़इति (पाहा: सोग्दी प्रथम पुरुष एकवचन श्नय्श्त्व्); लातिनमधील अनुनासिक्य धातू निन्गुइत्=लिथ्वेनी स्निङग; गॉथ भाषेतील मूळ धातुनाम स्नैव्स्–=लिथ्वेनी स्निएंगस्=ओल्द स्लाव् स्नेगो=शुग़्नी ज़ेनिज कदाचित् < प्राक् ईराणी *स्नैज़––(जी. मोर्जन्स्तर्न, शुग्नी भाषेवरील टिपणे, नॉर्स्क् तिदस्स्क्रिफ्त फॉर स्प्रोग्विदेन्स्कप, १,१९२८, पृ. ७९). शेवटी 'वर्फ, हिम' या अर्थाने आढळणारा एक पहलवी शब्द, कदाचित् अनिश्चित पाठ असलेला, संभवत: स्निह्न् (अथवा स्निह्र्) एका प्राचीन र/ऋ–युक्त नपुंसक लिंगी [२]स्निग्व्हर/न या मूळाकडे संकेत करीत आहे[२].

तरी पण, भारोपीय भाषांच्या दोन सीमांवर, 'वर्फ, हिम' या अर्थाचे केवळ समान रूप असलेले, पण चालू अर्थ 'विन्दु, पाऊस, ओला' असलेले शब्द आढळून येतात. हे शब्द जुनी आयरिश स्निगे 'विन्दु, पाऊस,' स्निगिद् 'टपकते, पाऊस येतो' आणि संस्कृत स्निह्यति (धातुपाठ, चरक, सुश्रुत) 'ओले आहे, ओलसर, तेलकट, आसक्त, प्रेमळ' असे आहेत.

केल्तिक व भारेराणी भाषांना सोडून, या शब्द-संचाला 'ओलेपणा' असा मूळ अर्थ असल्याच्या खुणा, अनिश्चितपणाने का होईना, इतरत्र सापडतात.

ईराणीत, अवेस्ता स्नएज़न[३] (प्रथमा एक––वचन पुल्लिंगी — ओ) एका वालकाची तुलना करताना एका लांडग्याचे (वेन्दिदाद १३.४०) व एका कुत्र्याचे विशेषण, म्हणून आढळतो.

वार्थोलोमे (अल्त ईराणिश्चे वोर्तर्बुक, पृ. १६२६) यांनी हा शब्द स्नएग–– 'हिमवर्षाव होणे' या शब्दाशी जोडला आहे.[४] परंतु लाळ गाळणारा कुत्रा किंवा लाळ गळत असलेले मूल यांच्यासंबंधी 'हिमवर्षा होणे' या अर्थापेक्षा 'ओलेपणा' हाच विवक्षित अर्थ असणे अधिक संभवनीय आहे.

वाल्ट भाषागटात, जुन्या प्रुसियन भाषेत **स्निग्स्लो** हा शब्द आढळतो. ई. वेर्नेकर याने हा शब्द संस्कृत **स्निह्** शब्दाशी जोडलेला आहे. त्याचा अर्थ 'ओल, ओलावा' असा केलेला आहे.

---

१. बुलेतिन ऑफ् द स्कूल ऑफ् ओरियन्तल अॅन्द आफ्रिकन स्तदीज् १८.३, १९५६, पृष्ठे ४४९–५२.

२. दब्ल्यू. बी. हेनिंग याचे पत्र.

३. प्रोफेसर दब्ल्यू. बी. हेनिंग याच्या पत्रानुसार, हे रूप स्नएज़ान अर्थात, स्नएज़न्त याखेरीज, स्नएज़न शब्दाचे वर्तमान कृदन्त असावे.

४. व्ही. पिसानी (अवेस्ता स्नएज़न, रिविस्ता दिग्ली स्तुदी ओरिएन्तली, १५, १९३५, ३६४) याने विल्मन–ग्रावोव्स्का याचा अर्थ मान्य करून जुन्मास्लाव भाषेतील **स्नेज़िनु** 'हिममय, वर्फाळ' याच्याशी तुलना केली आहे. तसेच जुन्या स्लाव शब्द **नेज़िनु** याशी सम्बद्ध करून, हे आद्य स-वर्णरहित रूप संस्कृत स्निह्यति 'प्रेमळ आहे', स्निग्ध–'तेलकट, नरम, प्रिय,' स्नेह: 'तेल, प्रेम' यांच्याशी जोडले आहे. त्याने मिक्लोज़िक, एतिमा, वोर्तर्बुक देर स्लावस्प्राचे, वीन, १८८६, २१५ चा उल्लेख केला आहे.

अनुक्रमणिका
मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
मकर संक्रांत, १९२३
विदर्भ साहित्य संघ

जुन्या आयरिश शब्दाची भारोपीय *स्नेइग्वह्– 'हिम' शब्दाशी दर्शविलेली एकरूपता अनाक्षेपार्ह आहे. कदाचित् त्याचे कारण असे की मध्य आयरिश स्नेछ्त (पाहा: ग्रीक नेफेतोस 'पडणारे हिम') शब्द 'हिम' अर्थाने वावरतो. याच्या उलटपक्षी संस्कृत स्निह् शब्दाची या गटाशी असलेली एकरूपता शंकास्पद विषय बनलेली आहे. असे असले तरी आर्यभारतीय शब्दाचे इतर भाषांतील 'हिम' अर्थ असलेल्या शब्दांतील रूपांचे साम्य डोळ्यांत भरण्यासारखे आहे स्निह्=ग्रीक निफ्, लातिन निवेम्; स्निह्यति=वेल्श नय्फिओ; स्नेहति (नैघण्टुक २.१९ च्या आधारे प्रयोजक)= अवेस्ता स्नएजइति, ग्रीक नेइफेइ, लातिन निवित; स्नेह्= जुनी स्लाव्ह स्नेगो, लिथ्वेनी स्निएंगस्, गॉथ स्नैव्स्.

उह्लेनेक याने (स्निह्यति शब्द पाहा) या शब्दांचा सम्बन्ध जोडून मूळ अर्थ 'प्रकाशणे' गृहीत धरला आहे व म्हणून एकीकडे 'हिम, वर्फ' व दुसरीकडे 'तेलकटपणा' असा अर्थ साधला आहे. वाल्डे––पोकोर्नी (वोर्टर्बुक देर इन्दोजर्मानिश्चे स्प्राच, २,६९५) यांनी रास्तपणे शंका व्यक्त केलेली असली तरी, 'हिम' अर्थापासून 'ओलेपणा' हा अर्थसन्धारणेतील झालेला वदल स्वीकारताना द्विधा वृत्तीच्या ऐवजी त्यांनी अधिक आत्मविश्वास दाखवायला पाहिजे होता. काही अवस्थांत वर्फ भिजविण्याचे प्रभावीतम साधन असते, आणि काही असले तरी वर्फ, द्रवावरील वर्फाळ थर व थंडगार पाऊस यांतील विभाजनरेषा ही फार निश्चित स्वरूपाची नसते. कदाचित् स्निह्यति, स्नेह्यति, स्निग्ध-स्नेह– यांच्या 'तेलकटपणा' (म्हणून त्याचा 'प्रेम, आकर्षण' या अर्थी विकास, पाहा लिप्त 'चोपटलेला, चिकटणारे' शतपथब्राह्मण) व्यक्त करणाऱ्या वारंवार वापरामुळे व्युत्पत्तिकोविदांची दिशाभूल झालेली आहे.

स्नेइग-उह्- शब्दासंबंधी अलीकडील व अत्यंत चिकित्सक लेखात (त्सेत्स्क्रिफ्त फुर व्हर्ग्लेइचेन्दे स्प्राचफोर्स्चुंग, ७२, १९५४, २२८–३०) जे. गोन्दा याने, संस्कृत स्निह्– धातूची भारोपीय *स्नेइग-वह्- मूळाशी एकरूपता स्थापित करणाऱ्या अनुकूल व विरोधी दोन्ही प्रयत्नांचा संग्रह केला आहे, आणि स्निह् शब्द, त्याची समासान्तर्गत व साधित रूपे यांच्या 'तेलकटपणा' अथवा 'चिकटपणा' या अर्थानुषंगाने, त्याचा मूळ धात्वर्थ 'चिकटपणा–क्लेब्रिग्कीत' होता, आणि म्हणून काही भारोपीय भाषांत 'वर्फ' असा अर्थ व संस्कृतात एकीकडे 'तेलकटपणा' आणि दुसरीकडे 'ओलसरपणा' असा अर्थविकास झाला, असा दृष्टिकोण मांडला आहे.

आर्य भारतीय भाषांत 'तेलकटपणा' व 'ओलसरपणा' यांच्या अर्थसन्धारणात्मक सम्बन्धाविषयी जूल्स ब्लोक याने, ल फॉर्मेशन द ल लांग्वे मराठे, पृ. ३७९, भिजणे, या ग्रंथात, सूचन केलेले आहे. संस्कृत अञ्ज् याचे समास––(अ) भि–अञ्ज्–आणि उपाञ्ज्–किंवा व्यञ्ज्– हे दोन्ही, यांनी बहुतेक सर्व नव्य आर्यभारतीय भाषांना 'भिजणे' क्रियेसाठी शब्द पुरविलेले आहेत. ब्लोक (पूर्वोक्त) यांनी सांगितलेल्या आणि माझ्या नेपाली शब्दकोश, पृ. ४७६ वरील शब्द भिजुनु, भिगनु शब्दांत पुढील वाढ करावी,–प्राकृत अब्भत्त, 'तेलाने माखलेले, शिपडलेले, ओले केलेले' < *अभ्यक्त–, अभिञ्जन––न, भिजा–स्त्री. 'अनुलेपन' < अभि–अञ्ज्–, दमेली बिज्– 'ओतणे, विशेषतः पाणी' (जी. मोर्जेन्स्तर्न, 'दमेली भाषेसंबंधी टिपणे' एन्. टी. एस्–, १२, १९४२, १६२) < *अभि-अज्यते, काश्मीरी वनुन 'ओले होणे' < *उपाग्न–किंवा अधिक संभवतः *व्यग्न, पाहा व्यनक्ति ऋग्वेद, वजवुन 'ओले करणे' प्रयोजक रूप < *उपाज्यते, किंवा व्यज्यते (पाहा मराठी वंजणे 'तेलाने माखणे किंवा सुपारीवर रेघाटणे' < *व्यञ्जति, सिंहली वकनु 'माखणे' < भविष्य व्यङक्ष्यति, वदन 'माखणे, माखण' < व्यञ्जन-), प्राकृत उंजिस्सइ 'ओले करील', उंजिअ 'शिपडलेले' < उपाञ्जति (पाहा गुजराती उंजवुं 'तेल लावणे').

येथे अर्थसन्धारणात्मक वदल स्पष्टपणे 'तेल' अर्थाकडून 'ओले' अर्थाकडे आहे. कारण स्निह्– याचा उध्दृत झालेला जुना अर्थ 'ओला' असा आहे. तैत्तिरीय आरण्यक ४.२३.१ मध्ये स्निह्–

अनुक्रमणिका
मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

स्त्री 'ओलेपणा', याचे प्रथमेचे रूप पाणिनीला स्निक किंवा स्निट् आणि स्निहिति- स्त्री 'ओलेपणा' त्रेशात ज्ञात होते. 'तेल' किंवा 'चोपट' हा अर्थ चरक व सुश्रुत यांच्या काळापर्यंत सुस्थापित झालेला होता, पण ऋग्वेद ९.९७.५४ मधील स्नेहयत् 'सुयोग्य, उपयुक्त वनविले'(?) हा अर्थ पाणी किंवा तेलाने मऊ करणे या कल्पनेवर आधारित असावा. भूतकालिक धातुसाधित स्निग्ध–याचा 'ओला' हा अर्थ पाली भाषेतील सिनिद्ध–, आणि अभिधानराजेन्द्र, पाहा शव्द, ग्रंथानुसार, प्राकृतात सिणिद्ध–शब्दांत कायम राहिलेला आहे. पालीत सिनेह–पु. 'ओलेपण, दमटपण' शव्द असून, प्राकृतात रतनचंद्रजीच्या ॲन इल्लस्ट्रेटेड अर्थ-मागधी डिक्शनरीच्या अनुसारे, सूयगडांगसूत्र यात सिणेह– 'जमिनीतून रोपटयांनी शोषून घेतलेला अन्नांश' असे अर्थ असलेले शव्द आहेत. शतपथ ब्राह्मणात स्नीहन्–पु, स्नीहा–स्त्री 'नाकातील आर्द्र पडदा' (ई साठी शक्यतः पाहा ग्रीक नीफेइ, तसेच नेइफेइ आणि पुढे पाहा), असे शव्द आहेत. सामासिक शव्द उपस्निह्– 'ओले होणे' हे क्रियापद रूपाने उपस्नेह– 'ओलीचे आकर्षण' सुश्रुत २. १.२६४ १५ व रामायण ५.७५.११ (केदारस्येव केदारः सजलस्येव निर्जलः। उपस्नेहेन जीवामि जीवन्तीं यच्छ्रुणोमि ताम्॥) या ग्रंथांत आलेला आहे.

परंतु स्निह् शब्दाच्या भारोपीय *स्नेइग्वह् शव्दाशी असलेल्या एकरूपतेचे अत्यन्त विश्वासार्ह सूचन, संस्कृत स्नेह-व स्निह्–दोहींचा अर्थ 'वर्फ, हिम' सिणेह— या नोंदीखाली, आपल्या कोशात रतन-चन्द्रजी यांनी दशवैतालिक ८.१५ यावरील टीकेचा उल्लेख केला आहे. या टीकेत या शव्दाची व्याख्या अवश्यायहिममिहिका–'थंडीने गोठून पाण्यावर वनलेला वर्फाचा थर, वर्फ, धुके' स्पष्टपणे हे स्नेह शव्दापासून आहे. याच कोशात सिण्हा 'वर्फाचे वारीक तुकडे' शव्दाची नोंद औपपातिक-सूत्र ७०४ वरून केलेली आहे. हा शव्द देशीनाम-मालेतही ८.५३ (हिमोसाएसु सिण्हा 'वर्फाचा थर, वर्फाचे तुकडे') आलेला असून पाइयलच्छीनाममाला ३८ येथे आलेला आहे. या दुसऱ्या ठिकाणी त्याची व्याख्या नीहारो धूमिया य 'वर्फखण्ड, धुके' अशी करण्यात आली आहे. वुह्लरने आपल्या आवृत्तीत, पृ. १०१ सिण्हा शव्द संस्कृत श्यै—शव्दाशी सम्बद्ध केला आहे व त्याने त्याची तुलना श्यान–शव्दाशी केली आहे. ध्वनिशास्त्रदृष्टया हे अमान्य आहे. हा शव्द पूर्वतर *स्निहा–शव्दाचा प्रतिनिधी असून त्याने आणखी जुन्या स्त्रीलिंगी धातुनाम स्निह्– शव्दाची जागा घेतलेली आहे (जसे दिशा शव्दाने दिश् शव्दाची, इत्यादी). अशाच प्रकारचा वर्णविपर्यय *स्निहा– > *सिह्ना– > *सिण्हा–, ज्या प्रकाराने स्नुषा– > *सुण्णा– > पाली सुण्हा– (सुणिसा रूपाखेरीज), झाला असे आपण मानू शकतो.

प्रत्यक्ष दृष्टिभूत अशी घटना न राहिल्याने, वहुतेक सर्वच नव्य आर्यभारतीय भाषांत 'वर्फा'-साठी असलेल्या शव्दांच्या अर्थात वदल झाला किंवा हे शव्द भाषांतून लोप पावले. अशाप्रकारे, ज्या प्रदेशात वर्फ ज्ञात आहे तेथे, संस्कृत हिम-शव्दाला मूळ अर्थ राहिला; असे अश्कुन ज़ीम्, खोवार हीम्, नेपाली हिउं, जिप्सी इव. उलटपक्षी गुजरातीत हिम 'दव, धुके' मराठींत हींव् 'थंडी, विशिष्ट काळाने येणारा मलेरियाचा ताप' असा वदललेला अर्थ रूढ झाला. प्राकृत सिण्हा—'वर्फ' याला कसलाही आधुनिक वारस नाही. षिना भाषेतील हिन्, तोरवाली हीन् हे *हिन्हा– < *हिस्ना < *स्निहा— याचे अवशेष आहेत असे मानण्याचा मोह होतो. परंतु हे पुल्लिंगी आहेत. अधिक संभवतः ते काश्मीरीतून ऋण असावेत. काश्मीरीत शीन पुं. 'वर्फ' याचे अधिक जुने रूप *हीन < संस्कृत शीन न. 'वर्फ' असे होते, किंवा यात हिम व शीन यांचा घोटाळा झालेला असावा.

एखादया भाषिक क्षेत्राच्या सीमान्त प्रदेशातील भाषांत अनेक वेळा साधारण आर्ष वैशिष्टये शेष राहिल्याचे आढळते. एका वाजूस जुनी आयरिश आणि दुसऱ्या टोकास आर्यभारतीय या भाषांत भारोपीय भाषेतील *स्नेइग्वह्—या मूळाचे त्यांच्या प्रतिनिधी दोन्ही भाषांत 'ओले' त्याच-

अनुक्रमणिका
मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

प्रमाणे 'बर्फ' हे अर्थ शिल्लक राहिलेले आहेत. या दोन्ही भाषांनी मूळ 'वर्फ' या अर्थापासून 'ओले' या अर्थाचा विकास स्वतन्त्रपणे केला, याची शक्यताच नव्हे तर सम्भव असण्याची गोष्ट डोळ्यांआड करता येत नाही. उलट पक्षी, हेही होऊ शकते की मुळात वावरत असलेले अर्थाचे द्वैत, काही मधल्या भाषांत लोप पावले तरी, या दोन भाषांत ते शेष राहिले. कदाचित ही गोष्टही यावर आधारित मध्य भारतीय भाषांत शेष राहिलेल्या दोन शब्दां-वरून मिळते.[५]

५. या गोष्टींकडे श्री अल्फ्रेद मास्तर यांनी कृपया माझे लक्ष वेधिले.

⊕ ⊕ ⊕

कल्पना दामले / **अनुभवाच्या तीन कविता**

नको आठवू त्या आठवणी
जखमा करणाऱ्या,
तुला ओठावरचे गीत गायला त्रास पडेल. .
नेमके त्याच क्षणी तिने मला पाहिले अन्
सारीच वीण उसवत गेली.
आता पुढचे धागे तर नीट बांधून घे
उगवत्या सूर्याच्या सहस्र रश्मींसारखे.

(२)

का चुरगळलेल्या मनाला
कुरतडत बसली आहेस ?
राहू दे त्या डोहाचे वांझ किनारे तसेच
तुझ्यातल्या उदास वेलींना उत्साह द्यायला
त्यातलेच पाणी उपयोगी पडेल.

(३)

उगवत्या सकाळी न्हालेली
केस मोकळे घेऊन उभी असताना
त्याने मला काळा गुलाब दिला
अन् तेव्हापासून माझ्या गंधारण्याला
काही अर्थच उरला नाही.

रत्ना महाजन / **मी**

मी
माझ्यापासून दूर
जाते निघून
नि:शब्द
विराण संध्याकाळी.
भटकत राहते अनाथ आसमंतात
मला ओळखणारे
कोणीच नसते.
कुणीतरी—काही तरी
विपरीत घडणार
असे सांगतच असते.
चिमूटभर मिळणारे
आर्द्र
डोळ्यांच्या कोपऱ्यांत
भरभरून घेते.
सांजवेळ टळलेली असते
स्मशानात जळणाऱ्या
प्रेताप्रमाणे
मी राख होत असते.

अनुक्रमणिका
मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

श्रीकांत तिडके / शिवकालीन शौर्याचे अक्षरस्तोत्र 'वीरायण'

कवी जन्मावा लागतो. कविता जगावी लागते. म्हणूनच तुकाराम महाराजांनी म्हटले आहे, 'तुका म्हणे झरा, आहे मुळचाची खरा' कवितेचे देण खेड्या-पाड्यात राहणाऱ्या सामान्यांनाही लाभते. पण मुद्रणाच्या खिळयांचा स्पर्श त्यांच्या काव्यबंधाला होत नाही. आणि ते कवी अज्ञाताच्या गर्तेत खितपत राहतात. मंगेश पाडगावकर, वसंत बापट यांच्याप्रमाणे भावमधुर कवितांची फुलबाग फुलविणारे कवी उ. रा. गिरी यांचा एकही काव्यसंग्रह प्रकाशित होऊ शकला नाही. महाराष्ट्रातील 'सत्यकथे'सारख्या वाङमयीन मासिकांनी त्यांच्या कविता आवर्जून छापाव्यात, कविसंमेलने गाजविणारा हुकमी एक्का म्हणून त्यांचा सर्वत्र गौरव व्हावा; पण त्यांचा 'पियानो' (काव्यसंग्रह) लाखपुरीसारख्या छोट्या खेड्यातील मातीच्या घरातच खितपत राहावा असाच जणू विधिसंकेत आहे. सेवानिवृत्त शिक्षक 'कवि पुंडलिक' (भाऊ खोकले) हाही कवी आपल्या कविता लाकडी 'संदुकें'त ठेवून, काळ्याशार शेतात, हिरव्यागार रोपट्याकडे पाहात आयुष्याची संध्याकाळ घालवीत आहे.

शिवशाहीर पुरंदरे मध्यंतरी मूर्तिजापूरला आले होते. कवी पुंडलिकांना भेटताच म्हणाले, 'काहो तुमच्या वीरायणाचे काय झाले? कुठल्या प्रकाशनाला दिले?' कवी पुंडलिक खिन्नपणे हसून म्हणाले 'मी लिहिलेली वीरगाथा माझ्या शरीराबरोबरच संपावी अशी त्या श्रींची इच्छा दिसते' कवी पुंडलिकाचे हे खंडकाव्य इतके उपेक्षणीय आहे का? शिवशाहीर पुरंदरे यांनीच या वीरायणाबद्दल लिहिले आहे, "श्री शिवचरित्रातील सर्व तेजस्वी प्रसंगांची काव्यमय गुंफण एखाद्या माळेसारखी सुंदर आहे. कवी पुंडलिक यांच्या परिश्रमाने व विषयतद्रूपतेने विस्मित झालो. सुंदर व प्रभावी शैलीत त्यांनी शिवचरित्राची मांडणी केली आहे. त्यांच्या रचनेत ओघ आहे, सहजता आहे, साधेपणा आहे आणि तेवढेच सौष्ठवही आहे," कै. वि. द. घाटे यांनाही पुण्याला जाऊन कवीने आपले हस्तलिखित दाखविले. त्यांच्या जवळील पत्रव्यवहारावरून वि. द. घाटे यांनीसुद्धा या वीरायणाची मुक्तकंठाने प्रशंसा केली आहे व काही मौलिक सूचनाही केल्या आहेत.

वीरायणाचे स्वरूप

वीरायण हे खंडकाव्य आहे. कवी पेशाने शिक्षक. हा शिक्षक त्यांच्या रक्तातच मुरला आहे. विद्यार्थ्यांना मराठी व इतिहास शिकविताना शिवोत्तर मराठेशाहीच्या अध्यापनास परिणामकारकता आणण्यासाठी पाठाच्या उपयोजनार्थ ज्या पंचवीस-तीस ओळी लिहिल्यात तेथूनच पुढे 'वीरायण' ही खंडकाव्यरूपी गंगा प्रवाहित झाली. शिवप्रभूंच्या भव्यदिव्य इतिहास—कथेचे बहुतेक सर्व ठळक प्रसंग या काव्यात वर्णिले आहेत. या खंडकाव्याचे केन्द्रस्थान शिवबाच आहे. म्हणून या काव्यास 'शिवायन' हे नाव अधिक संयुक्तिक व सार्थ ठरले असते, असे वाटते. पण कवीने प्रस्तावनावजा दोन शब्दांत लिहिले आहे, 'शिवबा स्वत: एकाधिकारशाहीचा पुरस्कर्ता नव्हता. त्याच्या जीवनातील प्रत्येक कार्यात सहकाऱ्यांचा सक्रिय सहभाग दिसतो.' त्याच्या इतकेच, नव्हे कुठे-कुठे तर त्याच्यापेक्षाही नेत्रदीपक साहस-शौर्य त्याच्या सहकाऱ्यांनी दाखविले आहे. नेताजी-तानाजी-येसाजी-बाजीप्रभू, मुरारबाजी, फिरंगोजी किती किती नावे या संदर्भात सांगता येतील. हे सर्वच कथानायकाच्या योग्यतेचे. शिवबांनी घडविलेला इतिहास हा जसा स्वराज्य-निर्मितीचा इतिहास आहे तसा तो वीरांच्या शौर्याचाही इतिहास आहे. जीवा न्हाव्यासारखी

अनुक्रमणिका

मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

प्रागमोलाची लहान-लहान माणसे शिवाजीच्या स्वराज्याच्या कामी आली. त्या वीरांचा हा इतिहास. कडे-कपारीत राहणाऱ्या अठरा पगड जातींच्या मराठमोळयांचा हा इतिहास. मराठी संस्कृतीतील हे उज्ज्वल पर्व म्हणून 'वीरायण' खंडकाव्याच्या शीर्षकातील सार्थता काव्य वाचताना पुरेपूर पटते.

मराठयांचा एकंदर सारा डौल राठ-कणखर! त्यात 'नाजनो नजाकत' नावासही नाही. कवी पुंडलिक ज्या शौर्याचा पोवाडा गाण्यास सिद्ध झालेत, त्या शौर्याला उचित चाल, साजेसे रूप प्राप्त व्हावे म्हणून त्यांनी चार-चार काव्य-पंक्तीच्या 'पुरका' या वृत्ताचा आधार घेतला आहे. त्यामुळे या खंडकाव्याला परिणामकारकता प्राप्त झाली आहे. तीन हजार काव्यपंक्तींच्या या खंड-काव्याला त्यामुळेच कुठेही कंटाळवाणे वा कृत्रिम स्वरूप आले नाही.

वीरायणातील व्यक्तिचित्रे :

शिवचरित्रातच नाटय आहे; काव्य आहे. एक प्रचंड युगकर्ते व्यक्तित्व होते शिववांचे. महाराष्ट्राच्या सांस्कृतिक-राजकीय घडणीत शिववांचे योगदान अपूर्व आहे, अतुल आहे. म्हणूनच —'शिवरायाचे आठवावे रूप। शिवरायाचा आठवावा प्रताप' हा संदेश आजही प्रेरक वाटतो. शिवाजीच नव्हे तर शिवाजीच्या सान्निध्यातील वीरांच्या जीवनातील एक-एक इतिहास प्रसंग म्हणजे शौर्यगाथा आहे. म्हणूनच शिवाजीच्या स्फूर्तिप्रद व्यक्तित्वाचे आकर्षण मराठी मनाला सतत वाटत आले आहे. शिवकालीन इतिहास सर्वश्रुत आहे. तो इतिहास मराठी मनात रुजला आहे. पण कवीचा दृष्टिकोन वेगळा. प्रसंगामागे, कर्तृत्वामागे उभे असलेले व्यक्तिमन, त्या व्यक्ति-मनात उठलेली भावनांची आंदोलने यांचा वेध इतिहासकार कसा घेऊ शकेल? 'परकाया प्रवेश' करणारा कलावंत मात्र त्या काळाची स्पंदने, व्यक्तिमने यांचा एका वेगळया पातळीवर शोध घेत असतो. त्यामुळेच न पाहिलेल्या दृश्यातून, न अनुभवलेल्या अनुभवातून प्रत्यय या आनंद रसिकांना मिळत असतो. कवी पुंडलिकांच्या खंडकाव्यातून असा परिणाम निश्चितपणे साधला आहे. त्याचे स्वरूप 'इतिहासकथन' करण नाही, एका सश्रद्ध मराठी कवीने गायिलेले शिववांच्या शौर्याचे अक्षर-स्तोत्र आहे.

'वीरायणा'चे तीन खंड आहेत. (१) शिवपूर्व (२) शिवसमक्ष (३) शिवपश्चात. पण प्रत्येक खंडात 'शिववा' हेच केन्द्रस्थान आहे. शिवोत्तर खंड विशेष लक्षणीय आहे. शिववानंतर काय घडले ह्याचे इतिहाससापेक्ष पण तितकेच भावपूर्ण चित्रण आहे. या खंडकाव्यात प्रसंगांतील सौंदर्यापेक्षा व्यक्तिचित्रांकडेच मन आकर्षित होते. लखुजी जाधव, मालोजी भोसले, राजमाता जिजाबाई, संभाजी या सगळ्या व्यक्तिरेखा कवीने खंडकाव्यातही समर्थपणे रेखाटल्या आहेत. स्वधर्माभिमान, अस्मिता, स्वराज्यनिष्ठा अशा संभाजीच्या अंगभूत गुणांचे सुंदर दर्शन या खंड-काव्यात घडते. स्वधर्मासाठी, स्वराज्यासाठी, सर्वस्व दान करणारा वीरपुरुष संभाजी ताकदीने वाचकांपुढे कवीने उभा केला आहे. रूढ इतिहासात कुठेही बदल न करता कवीला हे साधले, हे विशेष.

सुंदर प्रसंगवर्णने

'वीरायण' या खंडकाव्याचे तीन खंड आहेत. वीरायण या खंडकाव्याची सुरुवात 'उदे उदे श्रीमायभवानी जय जगदंबे उदे उदे।' या शिववांच्या आराध्य दैवताच्या स्मरणाने झाली आहे. या स्तोत्रानंतरच मराठयांच्या मुख्य कथेचा प्रारंभ होतो. आणि कवी पुंडलिकाची 'मराठी अस्मिता,' शिववाविषयीची श्रद्धा लक्षात येते.

'ऐक मराठ्या ऐक सांगतो,
तुझीच तुजला दिव्यकथा
अगा कोण तू। कवण पूर्वीचा,
घे ऐकुन तव प्राचिनता।'

मराठा म्हणजे मराठभूमीत राहणारा. या मातीशी इमानेइतबारे पुत्राचे नाते जोडून वर्तणारा. अशी ही मराठयांची कथा त्यांनी मराठी मनाला भाविकतेने ऐकविली आहे.

शिवपूर्वकाळाचे कथन करताना कवी खूप खूप मागे गेला आहे. अगदी शिववांच्या पणजोबा बाबा पाटलापर्यंत. 'वीरायणात' नुसतीच वीर

अनुक्रमणिका

मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

प्रसंगांची मालिका नाही. सुंदर रेखाटलेल्या व्यक्तिरेखा आहेत. तशीच भावनिक प्रसंगांची टवटवीत कमळेही या काव्यात फुललेली आहेत. रंगपंचमीनिमित्त सिंदखेडला जाधवांच्या दरबारात मालोजी राजे बसले आहेत—

'भरदरबारी पानसुपारी,
गुलालरंगाच्या हौसी ।
मालोजीसुत बाळशाहजी
बसला लखुराजा पाशी ।।
पाशिच होती जिजा सोनुली,
दो वर्षांची तदात्मजा ।
दोन लेकरे रंग उधळिती अन,
कौतुक करितो सर्जा ।।'

पण सरदार जाधव आपली कन्या मालोजी-सारख्या पाटलाच्या मुलाला कशी देणार? त्यांनी भोसल्यांचा अवमान केला. जाधवांनी तुमच्या तोडीचा होऊनच तुमच्या कन्येला मागणी घालायला येईन असे ठणकावून मालोजी भोसले दरबारातून कसे उठले? हे सगळेच वर्णन व पुढे जाधव-भोसले विवाह प्रसंगाचे वर्णनही प्रवाही आहे. पुढे शहाजी आणि जाधवांमध्ये वितुष्ट निर्माण झाले. गड माहुलीला मोगल-जाधवांच्या फौजेने वेढा घातला. शहाजीराजे जिजाबाईसह किल्ला सोडून जाऊ लागले. जिजाई गर्भवती आहे. मागे लांडग्यासारख्या जाधवांच्या फौजा लागलेल्या. सासर-माहेरच्या या संघर्षात जिजाईची केविल-वाणी अवस्था—

"निभाव नुरला ! काय करावे ?
सचिंत अगतिक पतिपत्नी ।
सती धैर्यदा वदे 'तुम्ही जा,
मज दैवावर सोडोनी ! !
कितीहि होवो क्रुद्ध रिपू तो,
परंतु रक्ताचे नाते ।
खचित मला हे बघुन असे,
मग सदयच होईल मातुल ते' ।।"

लखुजी-जाधव आणि शहाजी यांच्यात युद्ध झाले या इतिहासाला त्यांनी बदलविले. लखुजी जाधवांच्या मृत्यूनंतर जाधव कुळातील उत्तराधिकाऱ्यांशी शहाजीचे युद्ध झाले असे कवी पुंडलिकांनी खंडकाव्यात दाखविले आहे. कै. वि. द. घाटे यांनी हा इतिहासबदल संयुक्तिक असल्याचा निर्वाळा अभिप्रायात दिला आहे.

अफझलखान वध, बाजीप्रभूंचा आत्मयज्ञ, श्रीसमर्थांशी पत्रव्यवहार, राज्याभिषेक व शिव-पश्चात काळातील संभाजीचा राज्यकारभार; त्याला झालेला स्वकीयांचा उपद्रव या सगळ्याच घटना कवीने अतिशय तद्रूपतेने रंगविल्या आहेत. बाजीप्रभूच्या पावनखिंडीतील पराक्रम कथन करताना—

"हरहर, हरहर महादेव !
की उठला, फुटला कंठ नभा ।
खिंडित पाचर ठोकून रुतला,
मराठ फत्तर ताठ उभा ! !
आला हल्ला ! भला छाटला ! !
'अल्ला, तोबा', ध्वनि उठला ।
रिपुरक्ताचा प्रथम घोट तो
घुटकन खिंडीने गिरला ! !"

श्री समर्थांची शिवाजीशी झालेली भेट कवीने खूपच कल्पकतेने रंगविली आहे. समर्थांना छत्रपती म्हणतात, 'रघुपदी अहर्निश सेवा करण्याची आता इच्छा आहे. या संसारातील जंजाळाचा कंटाळा आला आहे.' त्यावर 'प्रपंची परमार्थ' दाखविणाऱ्या समर्थांचे हे उत्तर मार्मिक आहे —

किंचित हसले समर्थ आणिक,
"छे, छे !" वदती राजाला !
अगा गृहस्था, तू नच जगती,
भगवे ल्याया अवतरला !
तुवा धरियले असिधाराव्रत
दुष्टभंजना, खलदमना,—
परित्राणकारणे साधुच्या !
विष्णुकर्म हे घेई मना !

श्रीसमर्थ आणि छत्रपती यांच्या संवादातून कवी पुंडलिकांची शिवबाविषयीची अन्योन्य श्रद्धाच प्रगट होते. 'वीरायण' या खंडकाव्यात अशी सुंदर प्रसंग-स्थळे खूप आहेत. त्यामुळे

अनुक्रमणिका
मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

'वीरायण' केवळ शौर्याचा इतिहास न राहता मराठी मनाच्या अस्मितेचे मनोज्ञ दर्शन घडविणारे काव्यही ठरते.

शिवछत्रपतींचे निधन कशाने झाले? याचे नेमके उत्तर इतिहासाला सापडले नाही. कवी पुंडलिकांचे मराठी संस्कृतिप्रेम जसे वीरायणात दिसते, तसेच त्यांचे भारतीय अध्यात्मनिष्ठ मनही काही ठिकाणी प्रगट होते. शिवावाच्या मृत्यूविषयी—

"खरे काय ते शिवास वा त्या,
जिवास ठाऊक सत्य, अगा!
इतिहासाची ठीकळ ग्वाही की,
'रुग्णाचि', दुखला गुढगा!!
घडलेल्याचे कसे कळावे,
इत्थंभुत मज मर्त्याला?
कणभर जाणिव, मणभर नेणिव,
जिथे प्राप्त ही तुला मला!!"

शिवरायाच्या निधनाचे गूढ, इतिहासाला तरी उकलले आहे का?

"व्रणावरोनी विदर्णतेचे कयास,
कुठनी धाव कसा?
लुप्त पुरावा, गुप्तच अजुनी,
मुक्या नि बहिऱ्या इतिहासा!
शतशत तर्कच! व्यर्थ वावडचा!
वार्तालापहि स्फुरे, विरे!
कालप्रवाही गडप जीवकण!
पुनश्च संथच पुढे सरे!!"

असे हे 'वीरायण'. एका सश्रद्ध प्रतिभावान कवीच्या समर्थ लेखणीतून प्रगटलेले. दृष्टान्त, उपमा, रूपकांची सुंदर सजावट या खंडकाव्यात आहे. स्वभावोक्ती, वक्रोक्ती, अपन्हुती आदी रम्य अलंकारांची सुंदर पखरण वीरायणात झालेली आहे. आपल्या समर्थ काव्यशैलीने शिववाच्या व्यक्तित्त्वाचा इंद्रधनू कवी पुंडलिकाने समर्थपणे पेलला आहे. इतिहासदृष्टचा काही दोष—स्थळेही आहेत. पण सश्रद्ध कवी पुंडलिकाच्या या खंड-काव्यातील सौंदर्यस्थळेही खूप आहेत. असे हे वऱ्हाडातल्या कवीचे 'वीरायण' मुद्रित स्वरूपात रसिकांसमोर यायला मात्र हवे.

⊕ ⊕ ⊕

नंदकुमार शेंडगे / गाणे

गाण्याला पंख असतात
गाणे उडत असते; मद्यालयातून बागेत;
बागेतून वाळवंटात
वाळवंटातून कवरस्तानात.
गाणे उदास होते
मद्यालयातली धुंदी पूर्ण उतरलेली असते;
कवरस्तानात
गाणे शोकमग्न होऊन बसलेले असते
शब्दांच्या कबरीवर.
तेव्हा—
गाण्याला दिसत असतो आपला भकास मृत्यू.
गाणे गातच असते; गातच असते;
कंठ हरवेपर्यंत;
मृत्यूगान.
तरी गाणे अमर होते
शब्द मरून जातात—
गाणे त्यांना आपल्या खांद्यावर घेऊन उडत असते;
मद्यालये; बागा; वाळवंटे उध्वस्त करून
कुठल्यातरी विरक्तीने भारून
गवसणी घालते
क्षितिजाला.
गाणे खूप दूर गेलेले असते तेव्हा
गाण्याला वेगळेच अर्थ प्राप्त झालेले असतात—
गाणे शहीद होते
आपलेच पंख कापून घेऊन
रक्ताच्या चिळकांड्या उडत असतात पंखांतून;
क्रांतीची पताका फडकवत असते गाणे—
तेव्हा गाणे हे गाणेच रहाते
साधे सुधे गरीब वापुडे;
या मातीचे गुणगान गात
फिरत असते घराघरातून
गाणे.

अनुक्रमणिका
मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

वर्षा रेगे / मुखवटा

नागपूर, ५-९-७७

प्रिय उमास,

आप्पा गेल्यानंतर तू पाठविलेले सांत्वनाचे पत्र तावडतोब मिळाले. अशा पत्रांचा वर्षाव अजूनही थांबलेला नाही. पण उत्तरं फक्त तुलाच पाठवावंसं वाटलं ! खरं म्हणजे कितीतरी वर्षांत आपली भेटही झालेली नाही. अधूनमधून होणाऱ्या अशा पत्रोत्तरा-वरच समाधान मानवं लागतंय ! मी गेल्यावेळीच तुला लिहिलं होतं की मनमोकळेपणानं बोलण्यासाठी तरी मला एकदा कोल्हापूरला यावंसं वाटतंय ! योग येईल तेव्हा भेट होईलच, तोपर्यंत आज थोडं तरी मन मोकळं करू दे.

आप्पांना जाऊन आज एक महिना झालाय तरी भेटायला येणाऱ्या माणसांची रीघ संपत नाही. एक विद्वान पंडित ! इतिहासाचा थोर संशोधक ! निरनिराळ्या संस्थांचा आश्रयदाता अशा कितीतरी बिरुदावल्या मागं ठेवून आप्पा गेले. आम्हाला भेटायला येणारी प्रत्येक व्यक्ती हळहळत असते. त्यांच्या अभ्यासू वृत्तीचं, गाढ्या विद्वत्तेचं, त्यांच्या दातृत्वाचं तोंड भरून कौतुक ! त्यांच्या आत्म्याला शांती मिळावी म्हणून मूक श्रद्धांजली. आमच्या दु:खासाठी सहानुभूती ! प्रत्येक वेळी हाच कार्यक्रम ऐकून ऐकून कंटाळा आलाय. वाटतं एखादयावेळी ओरडून विचारावं की खरंच तुम्हा सगळ्यांना त्यांच्या कार्याबद्दल एवढी आस्था वाटत होती का ? त्यांच्या जिवंतपणी कुणी कधी कौतुक केलेलं मी तरी पाहिलेलं नाही. उलट त्यांच्या प्रत्येक संशोधनावर कडाडून हल्ले होत होते. आणि त्यांच्या विक्षिप्त स्वभावाचे ठायी ठायी वाभाडेच निघत होते.

मग आता ते मुखवटे सगळ्यांनीच का बदलले ? माणूस मेल्यावर त्याच्याबद्दल वाईट चिंतू नये किंवा वाईट बोलूही नये म्हणतात नाहीतर त्या माणसाच्या आत्म्याला शांती मिळत नाही म्हणे ! म्हणून हा खोटेपणाचा मुखवटा धारण करून त्या माणसाचं कौतुक करायचं का ? उमा, हे सगळं जग मुखवटयांचंच बनलेलं आहे का ग ? या मुखवटयांच्यामुळं माणसाचं खरं रूप कळतच नाही बघ ! तऱ्हेतऱ्हेचे मुखवटे ! त्यातला मीही एक आतापर्यंत धारण केलेला मुखवटाच होता ना ! जगाला दिसणारा हा मुखवटा आहे एका सुखी संसारातल्या सोज्वळ तृप्त गृहिणीचा ! कालच भेटायला आलेले ते इतिहासाचे प्राध्यापक म्हणाले, "खरं म्हणजे आप्पांची प्रेरकशक्ती तुम्हीच होतात म्हणून आप्पा संशोधनाचा हा हिमालय उभा करू शकले. संसाराचं सारथ्य तुम्ही उत्कृष्टपणे केलंत म्हणूनच आप्पांना पूर्णपणे या कार्याला वाहून घेता आलं !"

हे त्याचं बोलणं ऐकताना मनाच्या आतून कुठूनतरी आवाज येत होता की, 'हा नसता मोठेपणा मला चिकटवू नका. हे सगळं खोटं आहे. यातलं फक्त एवढंच खरं आहे की या सुखी संसाराचं नाटक मी यशस्वीरीत्या पार पाडलं.' त्यातली माझी भूमिका होती एका समंजस पत्नीची आणि प्रेमळ, कर्तव्यदक्ष मातेची ! तिला मी योग्य तो न्याय दिलाय. आता त्या नाटकावर काळानेच पडदा पाडलाय, त्यामुळं माझा अभिनय संपला ! जे काय आयुष्य उरलंय ते तरी आता माझं म्हणून जगायला मिळू दे !

खरं म्हणजे मन आता कुठल्याही संयमाला जुमानतच नाही आहे. डोळे असून बघायचं नाही आणि तोंड असून बोलायचं नाही ही अवघड शिक्षाच आता संपलीय ! आप्पा गेल्यावर मी असं बोलतेय हे बघून तुला आश्चर्य वाटेल ! लोक तर मला वेडीच ठरवतील ! ठरवू देत ! माझा नाही त्या आत्म्यावर विश्वास ! माणूस एकदा गेला म्हणजे संपलाच ! त्यातून हा माणूसच वेगळा होता; त्याचं जगही

अनुक्रमणिका

मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

वेगळंच होतं. स्वतःच्या ध्येयाच्या वाटा त्यांनी निश्चित केल्या होत्या. कुणी चुकून मार्गात आलंच तर त्याला सरळ लाथाडून मार्ग मोकळा करून घ्यायलाही ते मागेपुढे पाहात नसत. स्वतःच्या ध्यासापुढं त्यांनी कशाचीही पर्वा केली नाही.

आणि सोसाटयाचा वादळात एखाद्या नाजूक वेलीची वाताहात लागावी तशीच माझीही स्थिती झाली. वहायचं मनात नसलं तरी एकदा वेगाच्या प्रवाहात सापडल्यानंतर वहावंच लागतं ! अपेक्षांचा किनारा कधी गवसणारच नाही याची मनाला पक्की खात्री होती तरी प्रवाहाविरुद्ध जायचं सामर्थ्यच अंगात नव्हतं ! त्यामुळं इतकी वर्षं पिंजऱ्यात नुसतीच फडफड करण्यात गेली !

आप्पांच्या बरोबर लग्न झालं तेव्हा वाटलं होतं की शिक्षणाची आवड असलेलं घर आपल्याला मिळालंय. त्यामुळं परिस्थितीशी झगडून आपण थोडंफार जे शिक्षण घेतलंय त्याचा काहीतरी उपयोग होईल ! कमीत कमी चार पुस्तकं तरी वाचायला मिळतील ! पण नवीन घरात प्रवेश केला आणि अपेक्षांचे इमले धडाधड कोसळायला सुरुवात झाली. दिवस स्वयंपाकघरात चुली फुंकण्यातच जायचा ! बायकांनी उंबरा ओलांडून बाहेरच्या खोलीतसुद्धा यायचं नाही ही ह्या घराण्याची पद्धत होती.

परिस्थितीचा हा नवा सूर पकडताना फार दमछाक झाली. पण सूर तरी त्याला का म्हणायच ग ? त्यातून मीलनाचं संगीत कधी निनादलंच नाही. उलट ह्या बेसूर स्वरांनी जीवन मात्र अर्थहीन झालं! खरं म्हणजे चारचौघांच्या घरातून आलेली मी ! पडेल ते काम करायची अंगात धमक होती ! दिवसभर भिंगरीसारखं सासूबाईंच्या मागे धावणं ! धाकट्या दीर-नणंदांचे मानपान संभाळणं ! आणि आप्पांच्या विक्षिप्तपणाला तोंड देणं ! हेच माझं जीवन बनलं होतं !

सकाळपासून चहाचा हंडा उकळत ठेवायचा ! केव्हाही बाहेरून ऑर्डर आली की तावडतोब कपबशा भरल्याच पाहिजे ! आंघोळीला आत आले की घंगाळावर एवढासुद्धा डाग चालायच नाही ! चेहरा त्यात दिसायला हवा एवढं चकचकीत निखेपर्यंत घासावं लागायचं ! जेवायला बसले की डावी उजवी बाजू भरून भरून ताट असलं पाहिजे. बरोबर जेवायला किती लोक असतील ते आयत्यावेळीच कळायचं ! पण कुठं काही कमी पडून चालायचं नाही ! हे सगळं आवडीनं करायचं ! मग माणसानं एखाद्या प्रेमळ शब्दाची अपेक्षाही करू नये ?

पण त्यांच्या रुक्ष जीवनाला हळुवार प्रेमाच्या भावना भावतच नव्हत्या ! एक शरीरधर्म म्हणून उरकलेलं शरीरसुख ! भुकेलेल्या माणसानं अन्नावर तुटून पडावं तसं ! त्याला चवीची कुठं अपेक्षा असते ! ओरबाडून घेतलेल्या त्या सुखाची मी धास्तीच घेतली होती ! स्वप्नाळू मनाला हा कोंडमारा असह्य व्हायचा ! कसं हे सगळं सहन केलं मी ? आणि कां ?

घराची इभ्रत राखण्यासाठी ? की वडिलांची प्रतिष्ठा संभाळण्यासाठी ! कीं वहिणींच्या लग्नासाठी ?

या सगळया जाचाला कंटाळून एकदा आईला कळवळून म्हटलंही होतं, "मला त्या घरात परत पाठवू नकोस ग आई ! त्या माणसाची मला फार भीती वाटते ! मी पुढं शिकेन, नोकरी करेन पण त्या घरात पुन्हा जायची माझी इच्छा नाही आहे!"

आईनं आकाशपाताळ एक केलं, "मूर्ख कुठली, चार बुकं शिकलीस आणि चढून गेलीस तू ? स्वतःच्या नवऱ्याबद्दल असं बोलायला तुला लाज वाटत नाही ? ज्या घरात एकदा मुलगी दिली तेच तिचं सर्वस्व ! मी नाही का दुसरेपणावर संसार केला ! अग लोक काय म्हणतील ! आणि तूच अशी घरात राहिलीस तर पाठच्या वहिणींची लग्न कशी होतील ? काही तर विचार कर !"

मनातल्या आशेला आईनंच असा सुरुंग लावला ! शिक्षणही अर्धवट ! एकटंच वेगळं रहाणं-कुणाच्या आधाराशिवाय तर ते शक्यच नव्हतं ! मग कितीवेळा वाटलं अंगणातली विहीर आपली करावी ! पण मग छोटे दोघेजण समोर दिसायचे ! आणि मग वाटायचं मी जीव द्यायचा ? कां म्हणून ? या नवऱ्याच्या छळाला कंटाळून ? नाही

अनुक्रमणिका
मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

नाही ! काय वाटेल ते झालं तरी मुलांसाठी आपल्याला जगलचं पाहिजे. पण मारून मुटकूनच दिवस काढावे लागले. कधीतरी हळव्या मनांत भरून आलेले शब्द कागदावर उतरवण्याच्या नादात आप्पांची हाक कानावर पडायचीच नाही ! हातात कागदपेन्सिल दिसली की आप्पांच्या डोळ्यांत अंगार फुलायचा. कागदाच्या तुकड्याबरोबर मनाचेही तुकडे गोळा करताना पुरेवाट व्हायची.

मुलं मोठी झाली की हे सारं संपेल म्हणून आशेनं दिवस काढले ! काढले कसले ? ढकललेच! पण तेही सुख नशीबी नव्हतं ! नव्या शिक्षणानं मुलांच्या विचारांच्या दिशा बदलत गेल्या आणि त्यांच्यातली आणि आप्पांच्यातली वैचारिकतेची दरी रुंदावत गेली ! ती जोडण्यासाठी पुन्हा माझाच साकव ! आप्पा आपला हेका सोडणार नव्हतेच ! परवाचीच गोष्ट ! सूनबाईनं बाजारातून चांगल्या मोठ्या आणि आकर्षक प्लॅस्टीकच्या बादल्या आणल्या आणि मोरीतल्या घंगाळाचं उच्चाटन करूया म्हणाली. पण आप्पा घंगाळाशिवाय आंघोळ करणार नाहीत हे तिला समजविताना मला पुरेवाट झाली.

कुठल्याही गोष्टींचा आक्रस्ताळेपणानं विचार हाच आप्पांच्या स्वभावाचा स्थायीभाव ! पण मुलांच्या बाबतीत तरी जरा नको का ग मऊपणा? छोटीचं लग्न होऊन दोन वर्ष झाली पण तिकडच्यांची देण्याघेण्या-वरची कुरकूर काही संपत नव्हती. तर आप्पा परस्पर पत्र पाठवून मोकळे झाले, "मुलगी आता तुमची आहे, जे काय करायचं असेल ते करा !" एका विद्वान पंडिताचे हे बुरसटलेले विचार ऐकून जीवाची अगदी घालमेल झाली बघ ! आपल्या मताला घरात काही किंमत नाही हे माहीत असूनही मी विरोध केला तर आप्पांनी सगळं घर डोक्यावर घेतलं ! तुमचीच पोरीला फूस असेल असंही म्हणाले ! ऐकून घेतलं आणि गप्प बसले ! नाहीतरी इतकी वर्षं काय केलं ! मनासारखी एकतरी गोष्ट या घरात झाली का ? मारलेल्या मनानं आणि शिणलेल्या शरीरानं सजविलेला हा दिखाऊ सुखी संसार ! शेवटी समाधान एवढंच की या जिद्दी, एककल्ली, हट्टी माणसाला आजारानं अंथरुणाला खिळवून ठेवलं नाही !

शेवटी त्यांच्या जाण्यानं खोटेपणाचा मुखवटा आपोआप गळून पडला. इतकी वर्षं संयमांच्या कडीकुलूपात बंद केलेल्या मनाला खरं स्वातंत्र्य मिळालं. कितीतरी गोष्टी आयुष्यात राहिल्या. समुद्राच्या काठी बसून लाटांचं नर्तन एकाग्रतेनं हृदयात भरून घ्यायचं ! मग भरून आलेल्या त्या मनाला फुटलेले धुमारे कागदावर झरझर उतरायचे ! स्वयंपाक घरात पदार्थ चवदार करण्यासाठी आटा-आटी करण्याची आता गरज नाहीये. सुनांनी काहीही करावं आणि मला खाऊ घालावं ! मी आपली नातवंडांच्या बोबड्या बोलात, लडीवाळ चालीत आता रमणार ! मनात येईल तेव्हा उठून यात्रेला जाणार ! इतकी वर्षे या घरात देवांना बंदीशाळेत कोंडलं होतं त्यांना आता मानानं चांदीच्या देव्हाऱ्यात बसविणार !

मुख्य म्हणजे सासरच्या बंदीशाळेत अडकलेल्या माझ्या लाडक्या लेकीची आता मुक्तता करायलाच हवी ! तिला सरळ सांगायचं, इतर जाचाची पर्वा करू नकोस ! पण साथीदाराची प्रेमळ साथ जर तुला मिळत नसेल, त्यालाही प्रेमाच्या ऐवजी पैशाचीच भूक असेल तर मनाची कुचंबणा करून दिवस काढू नकोस ! इथंच कायम रहा ! हवा तो आधार द्यायला मी तयार आहे. ! वाटेल तेवढी शीक, नोकरी कर आणि स्वतःच्या पायावर ताठ मानेनं उभी रहा ! घुसमटून मरण्याची परंपरा माझ्याबरोबरच मरू दे ! तिचं बीज तुझ्या मनात रुजू देऊ नकोस, ही पिढी पुढे नेऊ नकोस. आणखी काय लिहू ? समक्ष भेटशील तेव्हा आपण मोकळे-पणानं बोलूच ! पण तोपर्यंत न आवरणारे मनाचे कढ असे नकळत बाहेर आले एवढेच ! तुला मनासारखा साथीदार मिळाल्यानं तुझ्या कर्तृत्वाच्या दिशा समृद्ध झाल्या ! गेल्यावेळी माझ्या संसाराचं तू तोंडभरून कौतुक करत होतीस पण तेव्हा मला काही बोलता आलं नाही ते आता मोकळेपणानं लिहिलंय ! पण हे सगळं मात्र विसरून जा ! उगीच विचार करीत बसू नकोस ! आता हा अध्यायच संपलाय ! कळावे,

मो. न. ल. आ.

तुझी मैत्रीण,
शांता.

अनुक्रमणिका
मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

वासुदेव बळवंत खापर्डे / "लोकमान्य ऑर प्रॉफेट ऑफ स्वराज्य" या नाटकाचा परिचय

मद्रासच्या श्री. एम्. के. आचार्य यांनी इंग्रजीत एक नाटक लिहिले असून त्याचे नाव "लोकमान्य, ऑर प्रॉफेट ऑफ स्वराज्य" असे आहे. हे नाटक प्रसिद्ध झाल्याचे ऐकिवात नाही. माझ्या संग्रही ह्या नाटकाची टाईप केलेली प्रत आहे. प्रतीत ११० पाने आहेत व चार अंक पूर्ण झाले असा शेवटी स्पष्ट निर्देश आहे. दि. २५-३-१९३७ रोजी श्री. आचार्य यांनी कै. ती. दादासाहेब खापर्डे यांना ही नाटकाची प्रत दिल्लीला अवलोकनार्थ पाठवली होती, असे पाकिटावरून दिसून येते. कै. दादासाहेब त्याकाळी व्हॉइसरायच्या सल्लागार मंडळात सदस्य होते. त्याचवेळी श्री. के. व्ही. रंगास्वामी अय्यंगार मुस्लिमेत्तर मतदार संघातून निवडून आले होते. दादासाहेब व अय्यंगार यांची वारंवार भेट होत असे. सर अय्यंगार व श्री. एम्. के. आचार्य यांची मैत्री होती. अर्थात श्री. एम्. के. आचार्य व दादासाहेब यांचा संबंध सर रंगास्वामी अय्यंगार यांच्या मार्फत आला, हे उघड आहे. श्री. आचार्य यांनी पाच अंकी नाटक लिहिले खरे पण दादासाहेबांना फक्त चार अंक पाठविले आहेत व तेवढेच सध्या उपलब्ध आहेत. पाचवा अंक मिळविण्याचा खटाटोप वाया गेला. पाचव्या अंकाचा आशय, अर्थात नाटकाचा शेवट कसा झाला असेल, हे चार अंकांच्या माहितीच्या आधारे सहज कळण्याजोगे आहे.

नाटकास सुरुवात लोकमान्य मंडालेच्या जेलमध्ये असताना त्यांना वृत्तपत्रातून धारपूरच्या जसवंतसिंह द्रवीड महाराजांविषयी वार्ता कळते व ते स्वगत संवाद बोलत प्रवेश करतात, येथून झाली आहे. दादासाहेबांनी अनेक संवाद काटले आहेत, अथवा दुरुस्त केले आहेत. स्पेलिंगच्या चुकासुद्धा दुरुस्त केल्या आहेत. त्याअर्थी असंबद्ध, लोकमान्यांच्या विचारसरणीशी विसंगत, ऐतिहासिक दृष्ट्या विसंगत माहिती, वगैरे येऊन नाटकाचे मूल्य कमी होऊ नये, याविषयी त्यांनी दक्षतेने इतकी काळजी घेतली असेल. पूर्ण चारही अंकांच्या अखेरीपर्यंत हा प्रकार आढळतो.

नाटक संवाद-प्रधान आहे, नाटक हे व्यक्तीसाठी नसून गर्दीसाठी आहे वगैरे नियम या नाटकाला लागू नाहीत. हे नाटक गर्दीसाठी नसून 'दर्दीसाठी' आहे, लोकमान्यांचे राजकारण, विचार, तत्वज्ञान ज्याला रुचेल, त्याच्यासाठी आहे. अर्थात राजकारणातल्या 'दर्दी' साठी आहे.

नाटकात खटकेबाज संवाद आहेत व ते ओघवती, ओजस्वी भाषेत आहेत. ह्यातून जो काय संघर्ष ह्यती येईल, तेवढाच. सागरासारख्या अथांग व हिमालयासारख्या भव्योदात्त हृदयाच्या, लोकमान्य टिळकांच्या मनात संघर्षाचे, हर्ष-अमर्षाचे कितीतरी प्रसंग येऊन गेले असतील. त्यातील काही प्रसंग ऐतिहासिक अस्सल स्रोतातून प्रवाहित होऊन आपल्यापर्यंत - वाचकापर्यंत आलेले आढळतात. पहिल्या अंकाची सुरुवात काव्यमय करण्यात आली असली तरी पुढे पुढे हा प्रयत्न लेखकाला सोडून द्यावा लागला. नाटकात घटना अशा घडलेल्या दाखविलेल्या नाहीतच; संवादातून अनेक घटनांचा उल्लेख आहे. कधी धावता, तर कधी ओझरता. अशा घटना वर्णन करताना विशेष भावनाभिव्यक्तीच्या वेळी लेखणी कविता पाझरू लागते. तार्किक विश्लेषणाच्या संदर्भात संवाद गद्यप्रधान असल्यास काहीच नवल नाही. दादासाहेबांनी दुरुस्त्या करताना ह्या सूक्ष्मतेकडे अजिबात दुर्लक्ष केलेले नाही. इतकेच नव्हे तर केव्हा केव्हा कविता अधिक सरस कशी होईल, याच हेतूने ओळ दुरुस्त केलेली दिसते.

लोकमान्य टिळक हे या नाटकाचे नायक आहेत. हे तर नाटकाच्या नावापासूनच लक्षात येऊ लागते. पण कुठेही खलनायक चित्रित केलेला नाही. काही कपट-कारस्थानात गुंतलेल्या क्षुद्र व्यक्तींचे खल-

अनुक्रमणिका
मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

नायकत्व लेखकाने ओघाओघाने दृष्टीस आणून दिले आहे, तेवढेच.

इंग्रज लोक व अधिकारी यांच्या वागण्या-बोलण्यातील सुसंस्कृतता व दरबारी अदब लेखकाने वेळोवेळी व्यक्तविली आहे. आणि ते हाडाचे स्वातंत्र्यप्रिय असल्यामुळे, एक व्यक्ती म्हणून प्रत्येक इंग्रज लोकमान्य टिळकांविषयी कमालीचा आदर बाळगीत होता, हे नाटकापुरते का होईना, पण पाहिल्यावर खूपच कौतुक वाटते. तुरुंगाधिकाऱ्या-पासून तर सर मॉंटेग्यू, सर बटलर, सर चेंबरलेन वगैरे उच्चतम अधिकाऱ्यांपर्यंत इंग्रज व्यक्ती अशा दिसतात. मुत्सद्देगिरीला हार न जाणाऱ्या ह्या आंग्लभाषीय लोकांच्या तोंडी त्यांच्याविषयी अनादर व्यक्त करावयाचा असल्यास कसे तोलून तोलून शब्द बाहेर पडत असतील त्याचीही दोन तीन उदाहरणे ह्या नाटकात पहावयास मिळतात.

पहिल्या अंकात पहिल्या प्रवेशात लोकमान्य टिळक, तुरुंगाधिकारी, व प्रो. विल्यम्स, दुसऱ्या प्रवेशात सार्वजनिक सभेतील दिवाणखान्यात विष्णुपंत, पोलीस अधिकारी, करंदीकर, तिसऱ्या प्रवेशातील धारपूर राजवाड्यात युवराज विजय-कुमार, राधाकान्त, गणपती व नोकर इतकी पात्रे आहेत. तीस टंकलिखित पानांचा पहिला अंक आहे.

पहिल्या प्रवेशात लोकमान्यांचे देशविषयक चिंतन, त्यांचे संक्षिप्त चरित्र व त्यांचे काही स्फुट विचार, प्रतिसहकाराचा सिध्दान्त, कर्मयोगाचा सिध्दान्त, उच्चन्यायालयातील ती अमोल वाक्ये, श्री भगवद्गीता रहस्याची रचना, मातृभाषाप्रेम, आणि अपमानास्पद अटींवर सुटका करून घेण्यास नकार, प्रा. विल्यम्सचा सुटकेसाठी आग्रह, हे विषय आले आहेत.

दुसऱ्या प्रवेशात पोलीस अधिकारी राधाकान्त बाबू चौधरी, कलकत्ता, यांची चौकशी करतात, कृपाबाई प्रा. विष्णुपंतांना स्त्रीविषयक सुधारणांची कल्पना देते, करंदीकर वकील इंग्रज अधिकाऱ्यांकडून शिवाजी उत्सवास होणाऱ्या अडथळ्यांची जाणीव देतात, काही इंग्रज लोक शिवाजी उत्सवास निधी पाठवितात, कृपाबाई स्त्री-स्वयंसेविका तयार करण्याची प्रतिज्ञा करते, इतके विषय आहेत.

तिसऱ्या प्रवेशात सर जेम्स पोलोक हे युवराज विजय कुमाराचा पक्ष घेऊन सर्वोच्च न्यायालयात विजय मिळवितात, गणपतीकडून विजय व महाराज यांच्यातील बेबनावावर प्रकाश, इंग्रजांनी धारपूर संस्थान वारसा हक्क कायद्याखाली कसे गिळंकृत केले व त्याबद्दल युवराजांचा अर्थात अप्रत्यक्षपणे नव्या उमलत्या पिढीचा संताप, मवाळ पुढाऱ्यांबद्दल त्यावेळच्या तरुण पिढीत असणारी चीड, विज्ञाना-धिष्ठित युरोपीय संस्कृतीत आढळणारा मागासलेपणा मानवतेचा संहार करणारी युद्धप्रियता, ह्या दोहों-विषयी युवरांनी व्यक्त केलेला तिरस्कार, हे विषय आले आहेत.

पदोपदी राष्ट्रीय प्रवृत्तीच्या लोकांविषयी अभिमान, देशहित व राष्ट्रभक्ती जागृत करणे हे लेखकाचे उद्दिष्ट सफल झाले आहे.

इंग्रजी भाषा म्हटली म्हणजे वाक्प्रचार व वाक्संप्रदाय यांची रेलचेल आलीच. लेखकाने शक्यतो अस्सल इंग्रजी वाक्संप्रदाय व शब्दसंपदा वापरलेली असली तरी, काही काही ठिकाणी लेखकाने आपली स्वतःची वैशिष्ट्यपूर्ण शब्दरचनाही केली आहे व ती दादासाहेबांसारख्या जाणत्या व्यक्तीने मान्य केली आहे. या शब्दांमुळे नाटकात सजीवता व अर्थवाहिता आली आहे. द डिव्हाईन् संकल्प, मॉडस् ऑम्नीशिएंट हॅन्ड, द लॉ ऑफ नॅशनल कर्म, वन मॅन्स फीस्ट अमीडस्ट अ स्टार्व्हिंग होम, वगैरे नमुन्यादाखल पाहावेत.

ह्या नाटकातून लोकमान्यांचे दर्शन होते. राधा-कान्त, विजयकुमार, गणपती, विष्णुपंत, करंदीकर, कृपाबाई वगैरे कोण होते, कोणते विचार लोकमान्यांचे, कोणते लोकमान्यांच्या तोंडी लेखकाने घुसडलेत व लेखकाने लिहिलेले काढून किंवा बदलून दादासाहेब खापर्डे यांनी त्यात भर कोणती घातली व कां घातली, यात त्यांचा उद्देश काय, हे सर्व विचार मी उत्तरार्धात चर्चेस घेणार आहे. वाचकांना माझी अशी नम्र विनंती आहे की वरील व्यक्तींविषयी त्यांच्या नजरेस काही वाचण्यात आले तर त्या पुस्तकाचे नाव मला खालील पत्त्यावर कळवावे. लोकमान्य टिळक यांच्या विचारांच्या विविध पैलूंसंबंधी पुस्तके पाठवू शकल्यास उत्तमच होईल. मी सर्वांची पुस्तके जबाबदारीने परत करीन. केवळ चरित्रे नकोत ही नम्र सूचना. कोणी वेचक उतारे टिपून पाठविले तर फारच उत्तम होईल. सर्वांचे आगाऊ आभार.

वा. ब. खापर्डे, न्यू हायस्कूल मेन, जोग चौक, अमरावती ४४४ ६०१.

⊕ ⊕ ⊕

अनुक्रमणिका

मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
मकर संक्रांत, १९२३
विदर्भ साहित्य संघ

भा. त्र्यं. परांजपे / **रामाचा अश्वमेध**

युगवाणीच्या फेब्रुवारी-मार्च, १९७८ च्या जोड अंकातील 'प्राचीन भारतीय महायुद्धे आणि रणनेतृत्व' या शीर्षकाच्या माझ्या लेखात प्राचीन वैदिकांची ईश्वरोपासना यज्ञद्वारा आणि यज्ञप्रधान असल्याचे सांगून राजसूय यज्ञ आणि अश्वमेध यज्ञ हे दोन यज्ञ राजकीय यज्ञ असल्याचे विधान केले आहे. आणि सुदासाने केलेल्या अश्वमेध यज्ञामुळेच दाशराज्ञ-युद्ध झाले असे म्हटले आहे. त्याला अनेक आधार आहेत.

राजसूय यज्ञाचा दुसऱ्या राज्याशी संबंध नसला तरी तो राजकीय हेतूंनीच केला जात असे. डॉ. जयस्वाल Hindu Polity या ग्रंथात म्हणतात, "हिंदू राजनीतीमे अनभिषिक्त शासक बहुतही उपेक्षा या घृणा सूचक है। जब तक अभिषेक नही होता था तब तक कानूनि दृष्टीसे शासन या राज्य का अस्तित्व नही माना जाता था।" अभिषेकाने मान्यता मिळाली तरी, तेवढ्याने त्या राजाला राज-मंडळाची म्हणजे दुसऱ्या राजांची राजा म्हणून मान्यता मिळत नसे. म्हणून अभिषिक्त राजे राजसूय यज्ञही करीत असत. हा राजाने आपल्या राज्यापुरताच करावयाचा एक समारंभ असे. हा यज्ञ लहान मोठा कोणीही राजा करू शकत असे. यात कोणाला कोणतेही आव्हान देण्याचा हेतू नसून, फक्त राजा म्हणून मान्यता मिळावी एवढाच हेतू असे. या यज्ञाचे राजकीय स्वरूप मर्यादित होते. अलिकडील राज्यशास्त्राच्या भाषेत या यज्ञाचा हेतू राजकीय (Political), धार्मिक (Religious) तसेच सामाजिक (Social) अशी त्रिविधमान्यता (sanction) प्राप्त करून घेणे हा होता.

गागा भट्टांनी श्री शिवाजी महाराजांच्या राज्याभिषेकाकरिता करावयाच्या विधीचा जो ग्रंथ तयार केला होता, त्यात राजसूय यज्ञाच्या विधीचा अंतर्भाव केला होता असे तज्ञ म्हणतात. त्याशिवाय राजसूय यज्ञ करण्याची प्रथा बंद होऊन फार मोठा काळ लोटलेला होता. सम्राट हर्षवर्धनानंतर कोणी राजसूय किंवा अश्वमेध यज्ञ केल्याचे आढळत नाही. यज्ञ हा आपल्या स्वतःच्या तसेच आपल्या राज्याच्या उत्कर्षासाठी आणि कल्याणासाठी केला जात असे.

'नास्ति सत्यात्परो धर्मः' असे सांगणारे पितामह भीष्म म्हणतात, "अश्वमेध सहस्रं च सत्यं च तुलया धृतम्। अश्वमेध सहस्राद्धि सत्यमेव विशिष्यते ।।" हजारो अश्वमेध यज्ञ आणि सत्य यांचे तोल केले तर सत्यच अधिक भरले. यावरून हे उघड होते की हा यज्ञ धर्माच्या त्या योग्यतेचा नाही. कारण उघड आहे. हा यज्ञ एक आक्रमक क्रिया आहे. आपली सम्राटपदाची व्यक्तिगत महत्वाकांक्षा पूर्ण करण्यास्तव हा यज्ञ केला जात असे. त्यात आपल्या राज्याच्या उत्कर्षाचा अथवा कल्याणाचा काहीच 'भाग' नाही. हा केवळ 'मत्स्य न्याय' होता.

'Ideologies of War and Peace in Ancient India' या ग्रंथात श्री. इन्द्र म्हणतात, "With the advent of Political Society, it (अश्वमेध) became an instrument of establishing territorial rights and other claims of sovereignty." समाज राजकारणशील झाल्यावर प्रादेशिक हक्क आणि सार्वभौमत्वाचे इतर सर्व अधिकार प्रस्थापित करण्याचे अश्वमेध हे साधन झाले.

वैदिक आर्यांना सर्व विश्व आर्य करून सोडावयाचे होते. ही त्यांची महत्वाकांक्षा सांस्कृतिक धार्मिक तशीच राजकीयदेखील होती. महाभारताच्या सभापर्वाच्या १५ व्या अध्यायात श्री व्यास महर्षी म्हणतात, "गृहे गृहेहि राजानः स्वस्य स्वस्य प्रियंकराः। नच साम्राज्यमाप्तास्ते सम्राट शब्दोहि कृच्छ्रभाक्।।" घरोघरी राजे आहेत आणि ते (अल्प संतोषाने) स्वतःच्या नुसत्या राजेपणातच खूष आहेत. परंतु त्यांना सम्राटपद मिळाले नाही. राजधर्माची ही व्यास वाणीची 'चोदना' सम्राटपद मिळविण्याच्या इच्छेच्या मुळाशी आहे. आक्रमणा-

अनुक्रमणिका
मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

शिवाय सम्राटपद मिळणे शक्य नसते. कोणीही आपणाहून येऊन कोणालाही सम्राट म्हणणे शक्य नाही.

एक इंग्रजी ग्रंथकार म्हणतो, "All the Wars were acts of pure aggression and Ashwamedha was only another act of glorification of aggression." सर्व युद्धे शुद्ध आक्रमणे होती आणि अश्वमेध यज्ञ आक्रमणाचे उदात्तीकरण करण्यासाठी केला जात असे. रामानेही अश्वमेध केला होता.

रावण वध झाला होता. सीता शुद्ध होऊन परत घेतली गेली होती. रामाचे अवतारकार्य संपले होते. आर्यावर्तातील राजमंडळाचा रावण-निर्दाळणाचा मनसुबा (असल्यास) पार पडला होता. राम सीतेसह आयोध्येला परत येऊन रामराज्य सुरू झाले होते. काही काळाने रामाने प्रजानुरंजनार्थ सीता गर्भवती असताना, आणि तिला विश्वासात न घेता, तिचा कायमचा त्याग केला होता. सीता-वियोगाने अर्थातच राम अतीशय दुःखी होता. आणि एके दिवशी रामाला राजसूय यज्ञ करावयाची इच्छा झाली. वाल्मिकी रामायणाच्या उत्तर कांडाच्या ८३ व्या सर्गात असे सांगितले आहे की, भरत आणि लक्ष्मण या दोघांना बोलावून आणून रामाने त्यांच्याजवळ आपली ही इच्छा व्यक्त केली. रामाच्या तोंडी हे किंवा या अर्थाचे शब्द आहेत :– " .आता राजधर्माची परम सीमा असलेला राजसूय यज्ञ करण्याची माझी इच्छा आहे. राजसूय यज्ञ अक्षय आणि अविनाशी फळ देणारा आहे. तो धर्माचे पोषण करणारा व सर्व पापांचा नाश करणारा आहे". रामाची ही या यज्ञाविषयीची समजूत बरोबर दिसत नाही. त्याने भरत आणि लक्ष्मण यांना सल्ला विचारला. भरताने राजसूय यज्ञ करू नये, असा सल्ला दिला. भरताच्या तोंडी हे किंवा अशा अर्थाचे शब्द आहेत :– "महाराज ! राजसूय यज्ञ करण्यात राजवंशाचा नाश दिसत असताना आपण राजसूय यज्ञ कसा करणार ? महाराज ! पृथ्वीवर ज्या ज्या लोकांनी पुरुषार्थ गाजविला आहे, त्या सर्वांचा यज्ञाच्या वेळी संहार होईल. भूतलावरील लोकांचा विनाश करणे उचित होणार नाही" यावरून भरताला तर या यज्ञाविषयी भलतीच विपरीत माहिती मिळालेली असल्याचे दिसते. या यज्ञाचा आणि राजवंशाच्या नाशाचा मुतराम संबंध नाही. आणि लोकांचाही विनाश नाही. संहार-विनाश व्हावयाचा, तो फक्त त्या यज्ञीय अश्वाचा. परंतु तेही बरोबर नाही. 'हवी' म्हणून यज्ञाग्नीला अर्पण केलेला भाग्यवान पशू इथे जरी गतप्राण झाला, तरी त्याला स्वर्गवास मिळतो, तो अमर होतो, असा वैदिकांचा विश्वास आहे. भरताचे हे बोलणे ऐकून रामाने राजसूय यज्ञ करण्याचा आपला बेत रद्द केला.

पुढच्याच ८४ व्या सर्गात, लक्ष्मणाच्या तोंडी हे किंवा अशा अर्थाचे शब्द आहेत :– "रघुनंदना ! अश्वमेध यज्ञ सर्व पापांचा नाश करणारा, परम पावन आणि दुष्कर आहे. तो यज्ञ आपण करा." अश्वमेधाचा पाप-पुण्याशी काहीही संबंध नाही. हे लक्ष्मणाला माहीत नव्हते असे दिसते. तो यज्ञ दुष्कर आहे हे मात्र खरे आहे. या यज्ञात विघ्ने येण्याची शक्यता असते. मोकळा सोडलेला घोडा कोणी अडविला, तर या यज्ञात विघ्न येते. अडवणाराशी युद्ध करून तो घोडा मुक्त करावयाचा असतो. युद्धात संहार होणारच. लढाईत यश मिळून तो घोडा मुक्त होणे, दुष्कर ठरू शकते आणि अपयश आले तर यज्ञ थांबतो; आणि सम्राटपद दूरच राहते.

राम, लक्ष्मण व भरत या तिघांनाही या दोन्ही यज्ञांची खरी अशी काहीच माहिती नव्हती असे दिसते. त्यांनी – रामाने तरी निदान राजपुरोहिताला विचारल्याचा कोठेही उल्लेख नाही. परंतु ९१ व्या सर्गात रामाच्या तोंडी असे शब्द आहेत :–– "लक्ष्मणा ! वसिष्ठ, वामदेव, जावाली, काश्यप ह्या अश्वमेध यज्ञ करणाऱ्यांना बोलावून त्यांच्याशी विचारविनिमय करून, मी शुभलक्षणसंपन्न घोडा सोडीन." कोणता यज्ञ करावा असे रामाने या धर्मज्ञास विचारल्याचा रामायणात उल्लेख नाही. रामाने अश्वमेध यज्ञ करण्याची इच्छा प्रकट केली; आणि त्या ब्रह्मवृंदाने ती मान्य केली असाच प्रकार दिसतो.

शेवटी रामाने यज्ञ-दीक्षा घेतली. वैदिकाच्या धर्मकार्यात यजमान पत्नीची उपस्थिती आवश्यक असते. सीता त्या वेळी हजर असू शकत नव्हती.

अनुक्रमणिका
मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

म्हणून तिच्या निर्जीव मूर्तीने काम भागविले. रीतीप्रमाणे वर्षभर हा यज्ञ चालला. मोकळा सोडलेला घोडा कोणी अडवल्याचा वाल्मिकी रामायणात उल्लेख नाही. (रामपुत्र कुश व लव यांनी हा घोडा अडविल्याचे कथानक दुसऱ्या रामायणात आहे. सर्ग ९१–९२). रामाचा हा अश्वमेध निर्विघ्नपणे यथासांग पार पडला.

हा यज्ञ चालू असतानाच रामाने सीतेला आपल्या शुद्धत्वाचा दुसऱ्यांदा पुरावा देण्यास पाचारण केले होते. त्याप्रमाणे विश्वामित्रासह ती आली. (यज्ञ सुरू करण्याच्या आधीच रामाने सीतेला असे आमंत्रण का पाठविले नव्हते, ते समजत नाही). ९७ व्या सर्गात शुद्ध सीतेला पृथ्वीने आपल्या उदरात सामावून घेतल्याचे वर्णन आहे. आणि ९८ व्या सर्गात रामाला झालेल्या सीतेच्या तिसऱ्या अखेरच्या वियोगाचे वर्णन आहे. नंतर काळपुरुष आणि दुर्वास यांचे आगमन आणि त्यातून रामाला करावा लागलेला लक्ष्मणाचा त्याग हा कथाभाग येतो.

लक्ष्मण नाहीसा झाल्यावर मात्र राम शरयूप्रवेश करतो (म्हणजे सध्याच्या भाषेत आत्महत्या करतो). परंतु सीता डोळ्यादेखत भूमीत गडप होत असताना आणि नंतर, नुसते उर बडविण्याशिवाय काहीही करीत नाही. यावरून सीतेपेक्षा लक्ष्मणावर रामाचे प्रेम अधिक होते, हे स्पष्ट होते. लक्ष्मणाने सुचविल्यावरून रामाने अश्वमेध यज्ञ केला आणि तोही सीतेच्या गैरहजेरीतल्या, विषण्ण मन:स्थितीत ! रामाला सम्राटपदाची लालसा होती म्हणून रामाने ते पद मिळवून देणारा अश्वमेध केला, असे मर्यादा पुरुषोत्तम रामाविषयी कसे म्हणता येईल ? रामाचा अश्वमेध हा एक विचित्र प्रकार-नव्हे कोडेच आहे !

⊕ ⊕ ⊕

नंदकुमार शेंडगे / **उत्खनन**

अखेर मी माझ्या मेंदूचेच उत्खनन केले
पार स्मृतिकेंद्रापर्यंत येऊन पोहोचलो
तेव्हा कुठे तुझ्या आठवणींची शवपेटी मिळाली.
मी अलगद वाहेर काढली; मेंदूच्या—
आठवणींचे सांगाडे झाले होते
काही आठवणींची लक्तरे पेटीच्या कोपऱ्यात
लटकत होती;
खूप झटकण्याचा प्रयत्न केला मी
पण,
लक्तरांना छिद्रंच पडत गेली
वेदनांची.
त्या छिद्रांतून आरपार दिसणारा
तुझ्या अस्तित्वाचा ठसा;
खूप पुसण्याचा प्रयत्न केला मी
पण व्यर्थ.
मेंदूत मात्र एक पोकळी निर्माण झालीय
तेव्हापासून.
स्मृतिकेन्द्रातल्या काळोखात कुठले चांदणे पेरू ?
की तुझ्या आठवणींची लक्तरे परत गोळा करू ?

सु. मा. कुळकर्णी / **खुंटचा**

या अशाही खुंटचा
माथ्यावर मारल्या जातात...
तेव्हा रक्तासोबत संवेदनाही गोठून जातात
छिन्नविछिन्न डोक्यातील प्रश्नांच्या चिंध्या
धुमसत धुमसत जळत असतात
धुरांची रोंगट पिवळी वलये
हृदय गुदमरून टाकताना
वेलीवरून गळणाऱ्या कळचांच्या
अश्रुपातात सायंकाळ भिजलेली असते.
जीवन जाणीव थिजलेली असते
वंदिस्त वर्फाच्छादित कबरीतून
वळिवा कुरतडत असतो तिच्या मुड्याला !
लांबच लांब सावल्या झाडांच्या
ओक्साबोक्सी रडत असतात
छाती वडवायला हातही नसतात...
फक्त खुंटचा मारल्या जातात
छातीवर. .हातावर. .माथ्यावर. !

अनुक्रमणिका
मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
मकर संक्रांत, १९२३
विदर्भ साहित्य संघ

सुभंत दिनकर रहाटे / **सुरुवात**
(भंडारा)

भानू ठेकेदाराच्या घराच्या अंगणात अतिशय गर्दी होती. भानू ठेकेदार अंगणातल्या चौथऱ्यावर बसला होता. त्याच्या पुढ्यात दोन रजिस्टरं होती. जमिनीवर पांघरलेल्या एका कपड्यात नोटांच्या चळती होत्या. आणि एका कपड्यात पाचोळ्यासारखी चिल्लर होती. त्याच्या घराच्या पडवीत पिवळा रंग लावलेल्या भिंतीचाच फुगलेला भाग असल्याप्रमाणे विड्यांच्या पानांच्या पुळक्यांचा एक खाकी रंगाचा बोद भिंतीशी टेकला होता व खुंटीवर खचून गेलेल्या माणसा-प्रमाणे तंबाखू मोजण्याचा तराजू एका बाजूला झुकला होता. ठेकेदाराच्या भोवती बाया-माणसांचा घोळका होता. ठेकेदार एकेकाचं नाव घेत होता. एकेकजण पुढे येत होते. रजिस्टरावर सही करीत होते अगर आंगठा लावीत होते आणि हातात वटवडा घेऊन आनंदून जात होते. तो मात्र दूर खांवाला दोरखंडाने बांधल्याप्रमाणे टेकून बसला होता आणि चुकारा घेऊन झाल्यावर जाणाऱ्या माणसा वा वाईमुळे पानांसारख्या हालणाऱ्या घोळक्याकडे तटस्थपणे पाहत होता. संतू घोळक्यातून बाहेर पडला आणि बसलेल्या बकाला म्हणाला, "बका ,अरे नंबर लावून घे ना."

"लावतो. एवढी घाई कायची आहे ?"

"घाई नाई तर काय ? अरे तव्बल पाच हप्त्यां-नंतर चुकारा भेटून राहचला"

तो गप्प झाला. पाच हप्त्यांनंतर चुकारा भेटत होता, यात आनंदून जाण्याचे काय कारण होते ? त्याला समजेना. उलट ही शरमेची गोष्ट होती. पाच-पाच हप्ते चुकारा रुकतो, तंबाखू बरोबर भेटत नाही, पत्ता बरोबर मिळत नाही, ठेकेदार बेगुमानपणे वागतो, कितीही चांगल्या विड्या केल्या तरी छाटीत घालतो, विड्यांत तंबाखू बरोबर भरत नाही म्हणतो, आणि आम्ही शांतपणे हा अन्याय सहन करतो. त्याला चीड आली. स्वतःची आणि त्या मजुरांची. पाच वर्षे झाली. परशाच्या कारखान्यात आपण विड्या करीत होतो. साठ मजूर होते. आणि या साठ मजुरांचा दोन महिन्यांचा चुकाराच्या चुकारा परशा घेऊन पळाला. तव्वल तीन वर्षांनंतर परतला तेव्हा आपण काय केले त्याचे ? आत्म-निर्भत्सना करीत तो उठला आणि ठेकेदाराच्या दिशेने चालू लागला. आता तिथे कोणीच नव्हते.

"ये, बका," ठेकेदार म्हणाला.

ठेकेदारानं रजिस्टरची पानं उलटवली. थोडावेळ त्याचं नाव शोधलं. आणि त्याच्या नावासमोर आडवी रेघ मारून रजिस्टर बकाच्या समोर केलं. आडव्या रेघेवर त्याने सही केली व ठेकेदाराने दिलेले पैसे तो मोजू लागला. त्याने प्रश्न केला, "ठेकेदार, एवढाच चुकारा माह्या ?"

"एवढा म्हंजे किती ? चुकारे रुखले तवा अडवान्स कोणं देल्ला ?"

"ते अडवान्साचे पैसे जाऊन मले पंचाहत्तर रुपये पाहिजे होते ठेकेदार".

"बरोबर हाय, पर मी व्याजाचे दहा रुपये काटले. चुकारा रुखला म्हंजे मालक थोडी देते अडव्हान्स. अरे मी देतो. ते माह्या व्याजाचे पैसे हायत"

बका मुकाटपणे उठला. दूर हरदास एल्. एन्. नगरातल्या ताडाच्या झाडाकडे त्यानं पाहिलं. तिथेच त्याचं घर होतं. एकीकडे काळ्या रिबना-सारखी सडक आणि दुसरीकडे वाहत असलेला नाला यांच्या चिमटीत हरदास एल्. एन्. नगर होतं. त्या मोहल्ल्यातल्या त्या उंचच्या उंच छत्रीसारख्या झाडाकडे गावातून कुठूनही पाहिलं तरी ते घरांच्या छपरातून उगवल्यासारखं दिसे.

अनुक्रमणिका
मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

नाल्याच्या पलिकडे मैदान होतं. आणि तिथे हत्तीच्या झोपलेल्या पिल्लांसारखे मोठे मोठे काळे दगड ठिकठिकाणी पसरलेले होते. माणसे तिथे हगायला जात. वारा आला की झाडाच्या तरवारीसारख्या पानांची सळसळ होई आणि झाड एवढं हले की ते जिथे अगदी निमुळते होते तिथून तुटून पडेल की काय असे वाटे. पावसाळ्यात वाऱ्याच्या आणि पावसाच्या माऱ्यामुळे त्या झाडाची क्रिकेटच्या चेंडूसारखी फळे बदाबदा पडत व मुले ती गोळा करीत. एकावर एक असलेली शिंपल्या-सारखी आवरणे काढून आणि ती फळे फोडून मुले आतला खोबऱ्यासारखा गर खात. सूर्य पश्चिम दिशेला आला की झाडाच्या खोडाची लोखंडी गजासारखी सावली विस्कटलेल्या केसांसारखी होऊन ज्यांच्या अंगणात संपे ते बापू गडकरी त्या मोहल्यात एकटेच तालेवार होते. त्यांचा विटांचा धंदा होता. घरी शेती होती. गुरेढोरे होती. ते त्या मोहल्यात खूप उंच भासत. खूपच उंच! भोवतालच्या खुज्या झाडातल्या त्या उंच ताडा-सारखे! लहान मुलं जमली की हटकून त्यांचा विषय निघे. ताडाच्या झाडाच्या जन्माविषयी चर्चा रंगत. कुणी म्हणत ते झाड ऐंशी वर्षांचे आहे. कुणी म्हणत पंच्यांशी वर्षांचे आहे. कुणी म्हणत शंभर वर्षांचे आहे. त्या चर्चेत त्या झाडाच्या वयाबाबत मतभेद होत. मग कोणीतरीच एकशे पाच वर्षे वयाच्या बापू गडकऱ्यांचा त्या ताडाशी संबंध जोडे. तो म्हणे की जेव्हा हे झाड कोसळून पडेल तेव्हाच बापू गडकऱ्यांचा मृत्यू होईल, असे एका ज्योतिषाने सांगितले आहे. पण बापू गडकरी संपून गेले. तरी ते झाड मात्र संपले नाही! बापू गडकरीच काय कित्येकांना त्याने संपलेले पाहिले होते. निर्विकार म्हाताऱ्याप्रमाणे ते झाड उभे होते!

घराच्या दिशेने तो झपाझप पावले घालत होता. त्याच्या हातात पासष्ट रुपये होते. पाच आठवड्यांची कमाई! काय काय करायचं या पैशात? किराण्याचे पैसे फेडायचे की सावकाराचे द्यायचे? दिवाळीचे दिवस. मुलांना गोड धोड करून नाही घालायचं? आणि मग पैसे उरतील किती? दिवाळीच्या सुट्यांत कारखाना बंद राहील, सुट्यात पैसे पुरायला नकोत? आणि मग त्याला पोरांचे स्मरण झाले, "बा, आमच्यासाठी फटाकं आणजो गा" तो विचारात बुडून गेला. शाळा केव्हा मागं गेली, हे त्याला कळलंच नाही. घराजवळचे दगड दिसू लागले आणि उन्हाळ्यात तलावातल्या तापल्या पाण्यामुळे उसळ्या मारणाऱ्या मासोळ्यांप्रमाणे विचार त्याला असह्य होऊ लागले. त्याला वाटलं, उन्हाने तापलेल्या दगडांवर जावे आणि साऱ्या देहाला चटके द्यावेत. पण हे त्या चटक्यापेक्षाही असह्य विचार नकोत. घराकडे जाणाऱ्या गल्लीत न वळता तो तसाच पुढे गेला. सावकाराचे रुपये त्याला द्यायचे होते. किराण्याची उधारी फिटवायची होती. रस्त्यात टोकतात साले! सावकाराचे, किराण्याचे पैसे त्याने दिले. तो पंधरा रुपये घेऊन घराकडे वळला. आणि उद्याचा विचार करू लागला. का म्हणून आलो आपण या शहरात? आपलं गाव सोडून? आपले नातेवाईक सोडून? गावच्या रामाला कापडाच्या गिरणीत नौकरी लागलेली पाहून? नोकरीच्या आशेने? गावी पाटलाच्या घरी नोकर होतो. स्वयंपाकघरातल्या कामापासून तो शेतीच्या कामापर्यंत कामे करीत होतो आणि ढोरावाणी राबत होतो. पाटील आपणाशी तुसडेपणानं वागत. पण तेच बरं होतं. पोटभर मिळत तरी होतं. कुठून दुर्बुद्धी सुचली आणि गाव सोडलं? त्याचं संपूर्ण शरीरच एक फोड असल्याप्रमाणं ठसठसू लागलं. तो पुलाजवळ आला. काही पोट्टे कंचे खेळत होते आणि समोरून भारदू हातात मेलेली कोंबडी घेऊन येत होता "कागा, बका कोठून येतस गा?"

"चुकारा घेऊनशान."

आणि भारदू बोलण्यात गुंतवेल म्हणून वेग वाढवून तो पुढे गेला. पण मेलेली कोंबडी त्याच्या मन:चक्षूंसमोर तरळत होती. अशीच पाळी येईल आपल्यावर मेलेली बिमार कोंबडी खाण्याची? कोठून भारदूनं लायसन्स मिळवलं कोण जाणे? पण बका या मोहल्यात आल्यापासून भारदूला

अनुक्रमणिका
मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

स्पिरीट विकताना पाहत होता. भारद्र स्पिरीटची बाटली आणायचा. पाणी मिळवून गिऱ्हाईकाला विकायचा आणि स्वतःला जड झालेलं म्हातारपण कसं तरी पुढं ढकलायचा. भारद्रूला कोणीच नव्हतं. कितीतरी दिवस झाले. भारद्रूनं मटन कधी विकत घेतलं नाही. वस्तीतली कोंवडी झिमून मेली आणि पाल्याच्या खातावर फेकली गेली की तो ती आणायचा आणि मटन करायचा. तो दिवस त्याचा सणाचा दिवस असे.

तो ताडाच्या झाडापाशी आला. प्रथम त्याने बापू गडकऱ्यांच्या घराकडे पाहिले. बापूंच्या नंतर घराची कशी दुरवस्था झाली होती ! आणि नंतर ताडाच्या झाडाकडे पाहिले. ज्यावेळी प्रथम तो त्या झाडाच्या काळ्या उभ्या तोफेसारख्या खोडाच्या पायथ्याशी टेकला होता त्यावेळी सूर्य डोक्यावर होता. झाडाच्या पानांची सावली त्या झाडाच्या बुंध्याशी पडली होती. तो त्या अपुऱ्या सावलीत उभा राहिला. त्याच्या समवेत त्याची बायको अनू, त्याची मुले नत्थू, फत्थू व काशी होती. दोन गंज चढलेल्या ट्रंका व एक गाठोडे एवढा त्या अपुऱ्या सावलीसारखा प्रपंचाचा सरंजाम घेऊन पोट भरण्यासाठी बका घराच्या बाहेर पडला होता आणि या मोहल्यात आला होता. उन्हाळ्याची दुपार होती आणि ती सारी तहानेने व्याकुळ झाली होती. त्या वस्तीतली बाया-माणसे त्यांच्या भोवती जमली आणि पर वेटाळात गेलेल्या कुत्र्याकडे त्या वेटाळातील कुत्री जशी पाहतात तशी त्यांच्याकडे पाहू लागली. त्या माणसांच्या अपरिचित चेहऱ्यामुळे बका वावरा होऊन गेला आणि आपली तहान विसरून गेला. पण आता समोरच्या घराचा बंद दरवाजा उघडला गेला आणि बापू गडकरी खाकरत बाहेर आले. भरलेले पोते पाठीवर असलेल्या हमालाप्रमाणे ते वाकले होते आणि टक्कल पडलेल्या त्यांच्या डोक्याच्या मागे मानेवर पांढऱ्या केसांचे तोरण रुळत होते. मुंगीच्या पावलांनी ते आले आणि बकाला त्यांनी विचारले, "कोंच्या गावचा रे बावा तू ?"

"काटेवणीचा"

बापू गडकऱ्यांनी हा जो जिव्हाळा दाखविला तो मरेपर्यंत तसाच कायम ठेवला. ज्यावेळी बकाने बापू गडकऱ्यांच्या भव्य घरात प्रवेश केला त्यावेळी बापू गडकऱ्यांच्या औदार्याने तो दडपून गेला. त्याला त्या भव्य घरासारखेच बापू गडकरी भव्य वाटले. त्यांनी त्याला स्वतःच्या किराण्याच्या दुकानात हिंग-जिऱ्याच्या पुड्या बांधायला ठेवला. बकाने त्या वस्तीत एका भाड्याच्या खोलीत आपला संसार थाटला. किराण्याचे दुकान बंद झाले की बका घरी येई. घराजवळचा गणू त्याला विड्या करण्याचे शिकवी. थोड्याच दिवसांत त्याने आणि त्याच्या बायकोने विड्या वळण्याची कला आत्मसात केली. गिरणीत नोकरीचेही प्रयत्न सुरू होते. बापू गडकरी वारले आणि त्यांच्या वैभवाला उतरती कळा लागली. मुलांना रान मोकळे झाले. त्यांनी व्यसनात खोऱ्याने पैसा गमावला. बापू हयात होते तेव्हा त्यांचा मुलांवर दबदबा होता. पण आता शेती गेली. विटांचा धंदा बुडाला. किराण्याचे दुकान बंद पडले. गुरेढोरे विकली गेली. भव्य घर केवळ बापूंच्या वैभवाचा अवशेष म्हणून शिल्लक राहिले. बका पुन्हा आधारहीन झाला. नोकरीही लागत नव्हती. परंतु आता तो विड्या करण्याचे शिकला होता.

गतस्मृती जिवंत करीत तो घरी आला. काही कोंबड्या दाणे टिपत होत्या आणि पायांनी जमीन उकरत होत्या. त्यामुळे जमीन पावसाचे तुरळक थेंब पडल्यावर दिसते तशी दिसत होती. त्याचा मुलगा नत्थू अंगणातली गर्द हिरव्या सुपासारखी धोप्याची पानं विळ्याने कापीत होता व फत्थू घराच्या भिंतीशी हळदीसारखं पिवळं मुतत होता. एरवी तो संतापानं बोलला असता. पण आता जीभच बधिर झाल्याप्रमाणे अबोल राहिला. तो दिसताच मुले आली आणि त्याला विलगली. "बा आमच्यासाठी बंदुकगी आणलास का गा ?" काहीच न बोलता तो ओटचावर बसला. बापाच्या मौनाने मुले हिरमुसली आणि पूर्वीप्रमाणेच खेळात रमली. छोटी काशी त्याच्या जवळ आली, अंगाखांद्यावर खेळू लागली. पण तो तिला प्रतिसाद देतच नव्हता. नाहीतर तो तिला उचलून घ्यायचा. प्रेमाने कुरवाळायचा. आपल्याला मायेने भिजवणारा

अनुक्रमणिका
मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

आपला हा बाप आज थंड का, तिला कळेना. तरीही ती त्याच्या अंगावर खेळत होती. वारा सुटला होता आणि वाऱ्याच्या तालावर तिचे कुरळे केस नाचत होते. पण त्याकडे त्याचे लक्ष होते कुठे ? अनू आली आणि त्याला म्हणाली, "आणला चुकारा ?"

त्याने तिला पैसे दिले. आश्चर्यचकित होऊन तिने विचारले, "इतकाच भेटला चुकारा ?"

आता मात्र ओल्या नारळावर प्रहार केल्यावर त्यातून पाणी निघावे तसे त्याच्या तोंडून शब्द निघाले, "त मंग काय ? पैसे दारूत उडवतो की जुव्यात ?".

"असं काय करता ? अन मी तसं कवा म्हणलो ?"

"मंग का म्हणतेस ?"

"ग्येवढ्या पैंशात का कराचं व ?"

"काईही कर. चल जा. माह्या मांगं कटकट नोको लावू ?" अनू विषण्ण होऊन घरात गेली. बका विचार करीत तिथेच बसला. अंगणात कोंबड्या जमीन उकरतच होत्या. त्याने एक दगड घेतला व त्यांच्या दिशेने फेकला. कोंबड्या जमिनीने झटकून टाकल्याप्रमाणे वर उडाल्या. कासवाच्या तोंडाप्रमाणे दोन्ही नाकपुड्यांतील शेंबूड आत बाहेर करीत व फाटक्या पँटीतून पोस्टाच्या मोठ्या शिक्क्याप्रमाणे दिसणाऱ्या कुल्ल्यांची लगबग करीत त्याचा मुलगा फत्त्यू आला व त्याला जेवायला उठवू लागला. पण जणू त्याची भूकच मेली होती. त्याने जेवायचे नाही म्हणून सांगितले. तो पुन्हा अणकुचीदार विचारांनी विव्हळू लागला. अंधार पडू लागला तसे त्याच्या विचारांचे टोक बोथट होऊ लागले आणि एका नव्याच विचाराने त्याच्या मनात फणा काढला व तो पक्का रुतून बसला. त्याचे मन स्वस्थ झाले. घशात अडकलेला मासोळीचा काटा काढल्यावर जसे वाटते तसे त्याला हलके वाटू लागले.

"अनू मंगानूचे पैसे दे. पंधरा रुपये" तो म्हणाला.

"काय करता ?"

"दे म्हणतो न".

तिने त्याच्याकडे पैसे दिले आणि ती नवऱ्याकडे भयचकितपणे पाहू लागली. पंधराच तर रुपय आहेत आपल्या जवळ या दिवाळीच्या दिवसांत. तो जुव्यात तर नाही बसणार ? दारू तर नाही ढोसणार ? पण आजपर्यंत तर त्यानं असं काही केलं नाही. मग त्याने पैसे का मागितले ? पैशाचं काय करणार आहे तो ?

"कोणच्या हेपाचा असंल हा माणूस ?" ती पुटपुटली, वैतागलीही व शक्तीच संपल्याप्रमाणे मटकन खाली बसली.

बका रामूच्या घरी आला.

"वैनी अव वैनी"

"कोण हाय ?"

"मी बका ?"

"का मंता जी?"

"भाऊ आहे का ?"

"आहेत घराच्या मांगं गिऱ्हाईकायले दारू देऊन रायले."

"बोलवा बरं."

बका घरातल्या बल्लीला टेकून बसला. रामूच्या बायकोच्या मागोमाग त्याचे मन जाऊ लागले व अर्धांगवायूने गलितगात्र झालेला रामू त्याला दिसू लागला. चहात भिजवलेल्या व मऊ झालेल्या टोस्टप्रमाणे रामूचा निर्जीव, लुळा डावा हात त्याच्यासमोर हलू लागला. रामू विड्यांच्या कारखान्यात विड्यांच्या बंडलांना लेबल लावण्याच्या कामावर होता. अर्धांगवायूने त्याचा डावा हात व पाय पार बेकाम करून टाकला. लहान-लहान मुलांच्या उदरभरणासाठी दारूचा धंदा करण्याशिवाय त्याला तरणोपाय उरला नाही. मागून कोणीतरी धक्का देत असल्याप्रमाणे संपूर्ण शरीर हिंदकळवत रामू आला. बका त्याला म्हणाला, "भाऊ, एक शिशी केवढ्यात आणतं गा ?"

"दोन रुपयात. अरे पर तुले काय गरज ?"

"आहे"

रामू स्तिमित झाला, गोंधळून गेला व रस्त्यावरून चालणाऱ्या हत्तीकडे लोक कुतुहलाने पाहतात तसा त्याच्याकडे पाहू लागला.

"काय म्हणतंस काय येड्या ?"

अनुक्रमणिका

मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

"भाऊ, मीवी दारु इकणार आहो"

"तू ?"

"हो, मी. कवा आणाले पाठवतंस माणूस ?"

"तसा आताच पाठवतो".

"माहीबी, वोलव, हे घे पंधरा रुपये," त्याने कडोसरीचे पैसे काढले आणि त्याच्या हातात दिले.

"अरे पर रवरी उर्शी लागते न ?"

"आज तुहृयाजवयची वापर. पुढं मी घेईन"

"वरं बरं."

वका उठला आणि चालू लागला. रामू त्याच्याकडे पाहू लागला. वका काळोखाच्या आ वासलेल्या जवडयात शिरू लागला आणि जवडा बंद झाल्यागत दिसेनासा झाला.

घरी परतल्यावर अनू त्याला सामोरी आली आणि त्वेषाने म्हणाली, "काय केल्या पैशाचं ?"

"भेवू नोकोस अनू".

"पर सांगाल त ?"

"आता आपुन खूप पैसे कमवणार आहो".

"म्हंजे ?"

"आपुन दारु इकणार आहोत."

"दारू ?"

"हो."

"नोका, असं नोका करू."

"असं नोका करू त काय करू ?"

"आपुन विडचा वांधू."

"विडचा वांधू. तुहा इचार वरावर हाय. पर तंवाखू त वरावर भेटाले पाहिजे. चुकारे त भेटाले पायजे."

"मजुरी करू."

"मजुरी ? मजुरीत आपलं साऱ्यायचं पोट भरणार आहे का ?"

"पर मले भेव लागते."

"भेव ? तो रामू धंदा करते. तो विठ्ठल धंदा करते. त्यायले लागत नाही भेव ? तुलेच लागते."

"तुमी सापडल्या त ?"

"अरे सापडलो त तू वाहीर रायसील. तवा तू करशील. अनु आतं भेवा-गिवाचं सोड. तो रामू पाय. दारूच्या धंदा करते. खाऊन-पिऊन पैसा जोडला आहे त्यानं. त्याचं काय विघडलं ?"

नवऱ्याचे हे बोल ऐकून अनू दुःखी झाली. तिचे अंतःकरण विदीर्ण झाले. हवा नसलेल्या फुग्याप्रमाणे तिचा चेहरा सुकून गेला. ज्याचा अभिमान धरावा असं काय उरलं नवऱ्यात ? कोऱ्या आयुष्याच्या आकाशात कलंकाचा एक काळा ढग घेऊन वावरावं लागणार होतं. आणि ही कल्पनाच तिला असह्य होत होती. तिच्या मनाच्या चिंध्या जळत होत्या. तिला आतून जाळत होत्या.

दारू आली तशी त्यानं शिशांत भरली आणि कुदळ फावडं घेऊन तो घराच्या मागं नाल्याच्या पलिकडे गेला. हिरव्या केसासारख्या गवताने व्यापलेली जमीन त्याने खोदली, खड्डा केला, त्यात शिशा दडवल्या आणि जमीन जशीच्या तशी केली. दुसऱ्या दिवशी तो दिवसभर गिऱ्हाईकांची प्रतीक्षा करीत होता. पण नवा नवा धंदा. कोण येणार ? अंधार दाटू लागलेला. तो अंगणात नव्या निर्धारानं वसलेला तेवढ्यात कल्ला करीत काही पोट्टे त्याच्या समोरून धावत गेले. त्याला कळेना, काय झाले ते. एका पळणाऱ्या पोराला त्यानं विचारलं, "काय झालारे ?"

"रामूला पोलीसायनं पकडला ?"

त्याला दरदरून घाम फुटला. हिंमत करूनच तो उठला आणि रामूच्या घराकडे गेला. पोलिस त्याला वांधून नेत होते. काहींनी हातात शिशा धरलेल्या होत्या. म्हणजे रामूचा मालही सापडला होता. आणि रामू हेलकावे खात वाळल्या फांदीसारखा डावा पाय फरफटत चालत होता. त्याची वायका मुलं मिटीमिटी पाहत होती. रामूला पहिल्यांदा पकडलं तेव्हाचा प्रसंग त्याला आठवला. ज्यावेळी पोलिसांनी रामूला पकडलं तेव्हा बायका-मुलांनी केवढा आकांत केला होता. पण त्यानंतर तो कितीदातरी पकडला गेला आणि ते सारे निर्ढावले. आता त्यांना रामूला पकडण्याचं काहीच वाटत नव्हतं. तो घरी गेला आणि एक विचार त्याच्या मनात येऊ लागला. पण त्याचाच विचार त्याला पटत नव्हता. तसं जर विचारलं तर रामूच्या बायकोला काय वाटेल ? आताच तर तो पकडला गेला. परंतु त्याला तिचे

अनुक्रमणिका

मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

निर्ढावलेपण आठवले आणि तो तिच्याकडे गेला.

"वैनी !"

"काजी !" विड्याच्या बंडलात एक विडी घुसवत ती उत्तरली.

"भाऊ पकडला गेला. त्याचं मले वाईट लागते."

"काय वाईट वाटाचं आहे त्याच्यात ? धंदा करते. पकडला गेला" चिमणीच्या प्रकाशात तिच्याविषयीचं कौतुक आणि आत्मविश्वास स्वच्छपणे त्याच्या मुखावर दिसू लागलेला.

"मंग माह्य एक ऐकता ?"

"बोला"

"दारू त सारी सापडली. तुमचे गिऱ्हाईक माझ्याकडं पाठवता का ?"

"बरं बरं."

रामूच्या बायकोकडून आश्वासन मिळाल्या-बरोबर तो घरी आला आणि गिऱ्हाईकांची अधीर-पणे वाट पाहू लागला. त्याला वाटलं, बरं झालं. रामू पकडला गेला. आता आपल्याकडे गिऱ्हाईकं तरी वळतील. पण या विचाराने तो स्वतःच मनात लाजला, थोड्याच अवधीत रामूने पाठव-लेली गिऱ्हाईक आली. आणि एकाएक एकतर्फी युद्ध तहकूब केल्याप्रमाणे विजेचे दिवे विझलेले. आकाशात परशूप्रमाणे असलेली चंद्रकोर. तो घराच्या मागं गेला. जमीन उकरली. शिशी घेऊन आला. थरथरल्या हातानं तो ग्लासात दारू ओतू लागला. आणि अकस्मात 'ठहरो' म्हणत पोलिसांनी त्याला गराडा घातला.

वका पकडला गेला.

आणि भयभीत होऊन त्याच्या पोरांनी एकच गलका केला. त्यांचा तो गलका ऐकून अनू बाहेर आली आणि तिने एक दीर्घ किंकाळी फोडली. पोलिस त्याला घेऊन जाऊ लागले तसा तो एका पोलिसवाल्याला म्हणाला, "अजी मले थोडंसं बायकुशी बोलाचं आहे." त्या समजुतदार पोलिसाने त्याला संमती दिली, तो अनूजवळ आला आणि तिला धीर देत म्हणाला, "अनू रडू नोकोस, पोरायनु तुमीबी रडू नोका. अनू, आता थांबा नाई."

तो पोलिसांना म्हणाला, "चला."

आणि सारं आसमंत राक्षसासारख्या, नित्य अंधाराने भरलेलं. सारी सृष्टी अंधारात लपेटलेली, अस्तित्वहीन झालेली. आकाशाला अगणित डोळे फुटलेले. तो ताडाच्या झाडाजवळ आला. त्याने क्षणभर ताडाच्या झाडाकडे पाहिले. झाडाचा वरचा भाग छाटल्याप्रमाणे अंधारात लुप्त झाला होता. ताडाच्या झाडाने अजून एक अनुभव गाठी जोडला.

आता वका सुटला आहे. व्राष्ट्यांने आणि बेमुर्वतखोरपणे दारू विकतो आहे आणि त्याची बायकामुले निर्ढावली आहेत. सात-आठदा तो पकडला गेला आहे. पण त्याच्या बायकामुलांना काहीच वाटत नाही. शरीरावर असलेल्या तिळा-सारखा पकडल्या जाण्याचा अनुभव त्यांच्या जीवनाचा एक भाग झालेला आहे. आणि सुरुवातीचा अनुभव त्यांनी काळ्या केशकलापातून पांढरा केस उपटून काढावा तसा आपल्या जीवनातून पुसून काढला आहे.

⊕ ⊕ ⊕

अनुक्रमणिका
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

ज. शा. देशपांडे / मराठी वाङमय कोश
(मुंबई)

बऱ्याच वर्षांपूर्वी मराठी ग्रंथकारांची सूची करावी असे मनात येऊन मी पुष्कळ माहिती गोळा करून ठेवली, पण एकतर त्यात वेळ जाऊन दुसरी कामे अडू लागली व असले मोठे काम पार पाडण्यास आपणाजवळ साधने व आर्थिक बळ नाही याची जाणीव झाली आणि मी गोळा केलेले गठ्ठे बाजूला सारले. अजून त्यातले काही भाग माझ्याजवळ आहेत. नंतर अशी सूची करावी अशी आकांक्षा बाळगणारे दोघेजण मला भेटले. त्यांनी मला सुचविले की या कामात त्यांना मदत केल्यास माझा उल्लेख केला जाईल. या दोघांनी विद्यापीठाची पायरी पाहिलेली नव्हती. मराठी वाङमयाचे हे काम फार मोठे आहे हे तेव्हा त्यांना सांगण्याचा माझा प्रयत्न फुकट गेला. परंतु हे काम कोणीतरी करावे असे फार वाटू लागले. जेव्हा नागपूर विद्यापीठ हे काम करीत आहे असे मला कळले, तेव्हा मला आनंद झाला.

अशा तऱ्हेचे कार्य संशोधन-स्वरूपाचे असते. त्यासाठी संशोधक वृत्ती व चौफेर माहिती लागते. प्राचीन वाङमयाचे ज्ञान लागते. पण या गोष्टी असणारांना जरूर ते सहाय्य मिळत नाही. उलट पैसा उपलब्ध झाला की अल्पशिक्षित अथवा सेवानिवृत्त लोक आपली आमरण सोय व्हावी म्हणून लटपटी करून अशा कामात घुसतात व स्वतःला काही माहिती नसल्याने त्यांना कारकुनांवर अवलंबून राहावे लागते, काम रेंगाळते व सार्वजनिक पैशाचा लाखांनी चुराडा होतो. नागपूर विद्यापीठातले हे काम अशा तऱ्हेचे नसून जाणत्या लोकांनी आपली इतर कामे सांभाळून उरल्या वेळात केले आहे. असा प्रयत्न अन्यत्र विद्यापीठाने केल्याचे ठाऊक नाही.

असा ग्रंथ तयार करणे हे कठीण काम आहे. त्यासाठी जाणते संशोधक-वृत्तीचे लोक हवेत, संदर्भ ग्रंथ उपलब्ध असावेत, माहितीचे एकसूत्रीकरण व संपादन करणारा कुशल संपादक पाहिजे व आर्थिक साहाय्यही हवे. या सर्व गोष्टी कुठेच एकत्र येत नाहीत. नागपूरसारख्या ठिकाणी सर्व ग्रंथ मिळणे दुरापास्त ही अडचण उघड आहे. त्यामुळे व अन्य कारणांनी या ग्रंथात अनेक उणीवा असणार हे संपादकांनी प्रस्तावनेत स्पष्टच सांगितले आहे. तरी काही गोष्टी सांगाव्याशा वाटतात.

प्रत्येक ग्रंथकाराखाली संदर्भ दिले नाहीत ही महत्त्वाची उणीव आहे. त्याने पाने वाढली असती तरी हे करणे जरूर होते. मोठ्या ग्रंथकारांतली महत्त्वाची माहिती आलेली नाही. मुकुंदराजाशी संबंधित जैत्रपाळाचा खेरली भोपाळाच्या आलेखातला उल्लेख आलेला नाही. विष्णुदास नामा हे नाव अनेकांनी वापरले ही गोष्ट स्पष्ट केलेली नाही. 'दगडो शिवदास' ऐवजी 'दगडो शिवराम' लिहिले असून तापीनाथाचे लापीनाथ झाले. आनंदतनय स्वतःला आनंदसुतही म्हणवत. तेव्हा आनंदसुत, आनंदतनय, आनंदनंदन, आनंदात्मज हे एक काय, या प्रश्नाकडे जरा खोल पाहणे जरूर होते. अभंगवृत्त ही नामदेवांची देणगी आहे हे विधान बरोबर नाही. अशा अनेक गोष्टी आहेत.

तरीही या ग्रंथाला कमी लेखता येणार नाही. अशा तऱ्हेचा हा पहिलाच प्रयत्न आहे. या पाचशे पृष्ठांच्या ग्रंथात ग्रंथकार-विभाग व ग्रंथविभाग असे दोन विभाग असून 'परिशिष्टा'त प्राचीन मराठी वाङमयाशी संबंधित स्थळांची उपयुक्त माहिती दिली आहे. ग्रंथात पाल्हाळ न करता जरूर ती माहिती दिल्याने ग्रंथ आटोपशीर झाला आहे. ग्रंथ सहज चाळतानाही पुष्कळ उपयोगी माहिती मिळते. नागपूर विद्यापीठात डॉ. वि. वा. प्रभुदेसाई, प्रा. म. शं. वावगावकर, डॉ. म. रा. जोशी यांच्यासारखे संशोधक आहेत. तेव्हा विद्यापीठाने असली आणखी कामे पार पाडावीत असे वाटते.

मराठी वाङमय कोश प्राचीन खंड
मुख्य संपादक डॉ. अ. ना. देशपांडे,
नागपूर विद्यापीठ प्रकाशन, नागपूर, १९७४
पृष्ठे दहा + ५१६.
मूल्य साठ रुपये.

⊕ ⊕ ⊕

अनुक्रमणिका
मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
मकर संक्रांत, १९२३
विदर्भ साहित्य संघ

मधुकर वाकोडे / **रंगगंधा**

आजच्या मराठी कवितेत आपल्या मोजक्याच गुणवैशिष्ट्यांनी प्रा. सरोद्यांची कविता लक्ष वेधून घेते. कवितांच्या जत्रेत काही चेहरामोहरा हरविलेल्या, काही शब्दबंबाळतेतून रक्तबंबाळ बनलेल्या, काही आक्रस्ताळेपणाने झिपऱ्या सोडून थयथयाट करणाऱ्या, काही वैतागून घरून निघालेल्या, काही विद्रोहाचे पाणी पिऊन विवस्त्रा झालेल्या, तर काही अजूनही परंपरेचा पदर घेऊन बावरलेल्या स्थितीतही तोल सावरलेल्या दिसतात. सरोद्यांची कविता या शेवटच्या गटात आपले स्थान राखून आहे.

आभाळ—आसक्ती हे सरोद्यांच्या कवितेचे वेगळेपणाने उठून दिसणारे वैशिष्ट्य. या आभाळाच्या शाश्वत अस्तित्वाचे कितीतरी अशाश्वत ऐंद्रिय ठसे (Sense impression) त्यांच्या मन:पटलावर उमटलेले प्रामुख्याने जाणवतात. नभ, आकाश आणि आभाळ—वेगवेगळ्या संदर्भात येणाऱ्या या शब्दांना स्वतंत्र चेहरेमोहरे प्राप्त होताना दिसतात. 'सांजावले नभ आणि वाट वाटेत विरली' अशी ते नभाला पाहून सौंदर्यात्मक अनुभूती विशद करून जातात. त्यांच्या कवितेतील आभाळाचे संदर्भ व्यावहारिक मूल्यांशी निगडित असतात. हे आभाळ विशाल जरी असले तरी त्याचे 'इवलेसे मन' (आभाळ) कविमनाला पोखरताना दिसते. कधी कधी हे आभाळ इतके कद्रूपणा दाखविते की चन्द्रदिवाही 'जपून जपून' उजळतो.

तरीही कवी आभाळास दूरस्थ मानत नाही. कारण हेच आभाळ कधी कधी मावळण्याचे दान पदरात टाकते. दिशा जरी दुरावल्या तरी आभाळ साथ देईल अशी वेडी आशा कवी उरीपोटी बाळगतो. पण हे आभाळ व्यवहारी आहे हे कवीला क्वचितच जाणवते. आणि त्याक्षणी 'साथ देईना आभाळ' अशी कवी तक्रारही मांडतो.

आकाश मात्र कवीला पंचत्वार्पकी एक संवेदनक्षम तत्व वाटते. हे आकाश धरा चुंबण्यासाठी तोल गमावतेही नि सावरतेही. वेळप्रसंगी कुरकुरणारे हे आकाश कवीच्या मुठीतली व्यथा 'सौदा' न करता स्वीकारते. आभाळाच्या अनेक अनुभवांचे संकलन सरोदे पेश करून जातात.

प्रा. सरोद्यांची प्रकृती मूलत: मोठी सुजाण आहे. ह्या निरोगी प्रकृतीचे हुंकारही आशावादी असेच आहेत. दु:ख उन्मळून आले तरी कवी उन्मळून कोसळत नाही. वस्तुत: दु:ख उन्मळून येणे, व्यथेला न साधता येणारे तडे जाणे, डंखगत वेदनांनी व्याकुळ होणे;—— असा कवीचा जीवनानुभव कटू असला तरी कवी——

रोज पिऊन मी ऊन
झालो आहे आता सूर्य (घोट)

असा ताठपणे दावा करतो. कारण कवीजवळ सुईसारखी जपून ठेवलेली एक जिन्नस आहे की त्यामुळे कवीला आशेचा खोल कोंभ टरारून वर येण्याइतपत ओल मिळविता येते. आणि ती 'जिन्नस' म्हणजे——

उसवल्या दु:खालाही
टाके घालणारे मन !

पांढरपेशा वर्गाचे प्रतिनिधित्व कवी आपल्या कुवतीनुसार पार पाडतो. स्वप्नांच्या मनोऱ्यात झुलणारे, प्रतिष्ठेचा पोकळ कोश स्वत: निर्माण करणारे, त्या कोंडवाड्यात जाणता-अजाणता गुदमरून निघणारे पांढरपेशी मन कवी शब्दबद्ध करतो. कुरूपतेला दिलेला 'न'कार हा सुरूपतेला पर्यायाने दिलेला 'हो'कार जरी असला तरी तिच्या अभावी——

कोंडलेला जीव आता
उभे आकाश कोरतो !

मनाची अशी जीवघेणी स्थिती होते. कवी असा कोंडमारा साहता साहता निसटण्याची धडपड करतो.

अनुक्रमणिका
मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
मकर संक्रांत, १९२३
विदर्भ साहित्य संघ

कवीला आपल्या मर्यादांची जाणीव असल्याने तो परिस्थितिसापेक्ष आपल्या माफक अपेक्षाही व्यक्त करतो. वाळवंटात तडफडणाऱ्या तृषित मनाची दोन अश्रूंच्या थेंबांनी तृप्ती होते. ठेचा खाण्याचे प्रसंग वारंवार उद्‌भवल्याने––

जरा पाहून चालतो
मनी माझ्या खूणगांठ (खूणगांठ)

अशी कवी प्रांजळपणे कबुली देतो. एकंदरीत सरोद्यांचा पिंड सोशिक, समंजस नि आशावादी आहे हे निश्चित.

सरोद्यांची कविता एकाअर्थाने मनमोरणी आहे. मनाचे विविध विभ्रम तिच्यात आढळतात. मूलतः हे मन एक, पण विभ्रम अनेक. उदासीन क्षण वेचित बसणारे, दान स्वीकारताना संभ्रमात सापडणारे, अंगभर ओथंबणारे, भोळाभाव बाळगणारे, वाळवंटात होरपळणारे मन शेवटी खऱ्याअर्थाने––

स्थितप्रज्ञ मनाचे या
सारे तोडलेस बंध

असे स्थितप्रज्ञ ठरते. अनेकदा हे मन छंदात रमते. रंगारंगात न्हाऊन निघते.

कवीला व्यथांचेही असेच अनाठायी आकर्षण वाटते. अनेकदा तरल प्रतिमांच्या माध्यमातून कवी या व्यथांच्या अस्तित्वांचे दर्शन घडवितो. आणि पाहता पाहता त्यांना आध्यात्मिकतेची डूबही देतो. 'माया' या सर्वांगसुंदर मुक्तकात––

दूर दूर जाते तरी
येते बुंध्यापाशी छाया !
नाही आटत आटता
कधी रक्तातली माया !

अशा प्रकारे कवी 'माया-ब्रह्मा'चे आभासात्मक चित्रणही करतो. 'बुंधा' बुंधा न राहता त्याला ब्रह्मपद प्राप्त होते. 'छाया' मायारूप धारण करून त्याला झाकविण्याचा, जोजविण्याचा हेतुतः प्रयत्न करतांना दिसते. स्वतंत्र अस्तित्व नसलेली, बुंध्याला आश्रयून असलेली ही छाया मूलतः अभावरूप असूनही, अनुभवाला येत असल्याने भावरूपच वाटते.

बुंधा आणि छाया यांच्यात प्रेमाने उत्पन्न झालेली जखडणूक आभासात्मक जरी असली तरी तात्त्विक दृष्ट्या त्यांचे अस्तित्व भिन्न वाटत नाही. छायेचा हा लपंडाव तिने मांडलेला एक डाव वाटतो. या डावातीलच रक्ताची ममता आटता आटत नाही. अतिशय समर्थ असे हे शैलीदार–पाणीदार मुक्तक ठरते.

वेचक शब्दातून वेधक आशय व्यक्त करण्याचे सामर्थ्य सरोद्यांच्या अनेक मुक्तकात आढळते. उदा––

तुझा सहवास
डोह खोल खोल !
मन झुकलेले
कसा तोलू तोल ? (मन झुकलेले)

या मुक्तकात तोल–ताल यांची खऱ्या अर्थाने कमाल दिसते. 'सहवास' हा शब्द कितीतरी आशयांना आकार देतो. प्रियेचा सहवास हा हवाहवासा वाटणारा असाच. आद्यन्त 'स' वर्णांच्या चिमटीत सापडलेला हा सहवास एका हव्यासाची निर्मिती करून जातो. 'खोल' या शब्दाची पुनरुक्ती झाल्याने डोहाची अथांगता–घनता जशी कल्पनेला जाणवते तशी त्याची भयावहताही स्पर्शून जाते. त्या डोहात सापडण्याचा फक्त अवकाश, संपलेच सारे सावकाश. पण अशाही परिस्थितीत मनाचा तोल ढळलेला, तो गेलेला तोल कसा तोलायचा हा यक्षप्रश्न कवीला सतावतांना दिसतो.

अर्थाचे असे अनेक पदर सरोदे प्रामुख्याने मुक्तकातून उलगडताना दिसतात. त्यांचे 'पैंजणे' हे मुक्तकही या संदर्भात मोठे लक्षणीय वाटते. प्रतीक्षेचा पातळपणा कवी चित्रित करून जातो. सोबत––

सांजावले नभ आणि
वाट वाटेत विरली !
सूर धरून पैंजणे
दूर नादावत गेली !

असा एक तरल–द्रवणारा जीवनानुभवही व्यक्त करतो. 'सांजावले' हा शब्द इथे अतिशय प्रसरणशील वाटतो. तो 'ओलावले' या अर्थाची छटा तर व्यक्त करतोच करतो शिवाय द्रवविण्यालाही हातभार लावतो.

अनुक्रमणिका
मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

'वाट' हा विविध अर्थांना आकार देणारा शब्दही असाच. मार्ग आणि प्रतीक्षा. ही मार्ग-प्रतीक्षा मुळी प्रतीक्षेतच विरल्याने तिची वासलात लागली आणि वाट वाटेतच विरल्याने तिचीही विल्हेवाट लागली. शेवटी सूर नादावतच गेले. हा नाद स्वतःच क्षीण बनतो असे नव्हे तर, कवी मनालाही क्षीण बनवितो.

काही कवितांतून सरोद्यांनी लोकतत्त्वांचा (Folk Elements) मागोवा घेतलेला दिसतो. कवी अजाणता प्रादेशिकतेच्या पाउल खुणा उमटवून जातो. या संदर्भात 'बाळापुऱ्या वयलारे' आणि 'आले मिरगाचे दिस' या दोन कवितांचा उल्लेख करता येईल —

वाळापुऱ्या वयलारं
आता पडतील धारा !

हा वर्षाविषयक पारंपारिक कृपिसंकेत आकोटच्या परिसरात प्रचलित आहे. बाळापूरच्या दिशेला आभाळ भरून आल्याने आता जोरदार पाऊस पडणार या कल्पनेने जी कृषकांची शेतीत तारांबळ उडालेली दिसते तिचे जिवंत वर्णन सरोदे करतात. सहदेव-भाडळी यांच्या वर्षाविषयक सूत्रांशी ही लोक प्रामुख्याने निगडित आहेत.

'वाळापुऱ्या वयला' म्हणजे त्या दिवशी नक्कीच पाऊस येणार हा जसा लोकसमज, तसा—

कावळ्यांनी केले खोपे
वाहिरच्या निंबावर !
आनी म्हणून अवंदा
लई पाऊस येनार !

हा सुद्धा एक लोकसमजच ! कावळ्यांच्या घरट्यांवरून वर्षा ऋतूत कसा आणि किती पाऊस पडणार याचे काही ठोकताळे ग्रामजीवनात प्रचलित असतात. सरोद्यांनी ह्या लोक तत्त्वांनाही शब्दबद्ध करून आपले नाव सार्थ केले.

राहू द्या रे राहिलेले
नका घेऊ 'खुरपन' !
घ्यारे डोईवर आता
'जावं आणिक जूपनं' !

अशा सारख्या ओळी सरोद्यांच्या शब्द-सामर्थ्याची आणि अर्थ सौंदर्याची चुणूक दाखवून जातात. कृषि साधनांच्या निर्देशातून एका ममताळू कास्तकाराचे अंतरंगही उलगडून दाखवितात.

'जावं' आणि 'जूपनं' ही कोळप्याशी संबंधित साधने जरी असली तरी इथे एका वेगळ्या आशयाला आकार येतो. पाऊस नुकताच येऊन गेल्याने जंगल निसरडा झालेला असणार म्हणून 'तुम्ही आता सारे 'जावं जपून'—वजेवजे जपून जाऽऽ !' असेच घरधनी सांगत असल्याचा आभास निर्माण होतो.

ह्याव्यतिरिक्त स्त्री मनातील मुग्धकल्पना सरोदे प्रतीकांच्या माध्यमातून खुबीने व्यक्त करताना दिसतात. विशेषतः संस्कारित स्त्रीमन ते कौशल्याने चित्रित करतात. हे स्त्रीमन भाळी चन्द्रकोर रेखता यावी म्हणून परिणीता व्हावयास अधिर होणारे, चन्द्रकोरी सारखे कलेकलेने पूर्णत्वाप्रत जाऊ पाहणारे नि चन्द्र 'कळा' भोगता भोगता कुंकवाच्या थेंबामध्ये सौख्य सामावल्याची भावना बाळगणारे असे आहे.

अशी ही सरोद्यांची 'रंगगंधा' अंतरंगाने जशी मनःपूत तशी गो. रा. वैराळेंचे आकर्षक मुखपृष्ठ लाभल्याने बहिरंगाने देखिल शुचिर्भूत बनल्याने, खऱ्या अर्थाने योजनगंधाच ठरते.

रंगगंधा बजरंग सरोदे,
सेवा प्रकाशन, अमरावती,
मूल्य सहा रुपये.

⊕ ⊕ ⊕

अनुक्रमणिका
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

दिनकर बेडेकर / एक टिपण अरुण कोलटकरांच्या कवितांसंबंधी

'अरुण कोलटकरच्या कविता' हे अशोक शहाण्यांच्या प्रास प्रकाशनाने प्रसिद्ध केलेले पुस्तक एक दिवस माझ्या हाती आले. हाती येताच सहज चाळून पहावेसे वाटावे इतपत सुरेख गेटअप असलेले हे पुस्तक म्हणजे एक चॅलेंज आहे ह्याची कल्पना मला त्यावेळी नव्हती. पूर्वी वाचलेल्या काही पुस्तकांच्या वैशिष्ठ्यपूर्ण मुखपृष्ठांच्या संदर्भात अरुण कोलटकरांचे नाव अधिक ऐकलेले होते. त्यांच्या फक्त काहीच कविता वाचलेल्या होत्या. कोलटकरांची खरी ओळख झाली ती त्यांच्या 'चरित्र' ह्या कवितेमुळे. अति सामान्य जीवन जगणाऱ्या माणसांच्या प्रतिनिधीचे हे चरित्र. कविता वाचताना जाणवलेला तिचा बालगीतासारखा नाद. जन्मापासून सुरू झालेला रोकडा व्यवहार, आयुष्यभर मानेवर एखाद्या अटळ ओझ्यासारखं लादले गेलेले डिप्रेशन हा ह्या कवितेचा गाभा.

अरुण कोलटकरांच्या कवितांचे हे पुस्तक वाचल्यानंतर एक गोष्ट ठळकपणे आणि सहज लक्षात येते ती ही की कुठल्याही प्रकारच्या पूर्वग्रहांशी ह्या कवितेची बांधिलकी नाही. अरुण कोलटकरांच्या कवितांमध्ये जी अनुभवांची विविधता दिसून येते त्यामागचे हेही एक कारण असावे. शिवाय अनुभवांचे जे आघात मनावर उमटतात त्या संबंधीची कवीची प्रतिक्रिया काही प्रमाणात कवितेत उमटत असते. मात्र पोझिंगमुळे अशा खऱ्या प्रतिक्रियेला वाव मिळत नाही. मग तोचतोपणा कृत्रिमता वगैरे प्रकार येतात. आणि कवितेचा नैसर्गिक विकास थांबतो. अरुण कोलटकरांची कविता ह्यापासून सर्वार्थाने मुक्त आहे. ती एखाद्या अतिशय संवेदनाक्षम इंडिकेटरसारखी असल्याचे आपल्याला सतत जाणवते. शिवाय तिच्या उपजत ताजेपणामुळे बाह्य बंधनांचा त्रासदायक जाचही तिला होत नाही. उलट निर्मिति प्रक्रियेविषयी विचार करताना अरुण कोलटकर स्वतः म्हणतात —

'बेहद्द नाममात्र घोडा
त्याचा उगम आणि विकास गूढ.
कॅन्सर सारखा. त्याच्या हाडामासाने
मातीशी द्रोह पत्करलेला.
त्याच्या खोडदौडीच्या वळणदार वणव्याला
वेग एखाद्या हल्ल्याच्या अफवेचा.
त्याच्या ओवीबद्ध टापांचे
खणखणीत बोल
भाकरतुकड्याइतके ढळढळीत'

पण नकली नाण्यांचे बुरसटलेले विश्व उधळून लावण्याचे अंगभूत सामर्थ्य त्याच्या टापांमध्ये आहे. लगेचच येणारी एक कविता त्यांच्या सर्जनशील प्रतिभेचा फार सुरेख प्रत्यय देते. एक खोली आणि तिचे तावदानातील प्रतिबिंब यावरची ही कविता. खोलीतील सर्वकाही ह्या तावदानातही आहे, पण तिथे ते आपल्या तावदानाच्या कक्षा ओलांडून जात नाही. वस्तू आपापले त्रिमिती आकार सोडून देऊन केवळ लांबी आणि रुंदी ह्या परिमाणात येऊन बसल्या आहेत. ह्या तावदानाच्या देशातील तो रिवाजच आहे. खरीखुरी जाईची फुले मात्र ह्या तावदानाच्या लेखी केवळ कागदाची. कृत्रिम त्यांना सुगंध नाही, नैसर्गिकता नाही. शिवाय तिथे संवेदना नाही. त्यामुळे तिथे स्पर्शाने शिराशिरी येणार नाही. ओरडलात तरी आवाज होणार नाही. असे एक विलक्षण शिस्तबद्ध जग उभे करणारी ही कविता. वरवर पाहता साध्या वाटणाऱ्या विषयातूनही असामान्य व्यक्त होत असते ते केवळ प्रतिभेच्या भरवंशावर आणि मग हा विषय सुचलाच कसा, एवढ्यापुरते आश्चर्य सीमित रहात नाही.

एखादी साधी प्रक्रिया घेऊन तिची इंटरप्रिटेशन्स देणे हा प्रकार अरुण कोलटकरांच्या कवितेत प्रथमच आढळतो. मेणबत्ती आणि तिचे जळणे ह्या प्रक्रियेची कोलटकरांनी दिलेली तीन इंटरप्रिटेशन्स ह्यासाठी पाहावीत —

अनुक्रमणिका
मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
मकर संक्रांत, १९२३
विदर्भ साहित्य संघ

'वितळलेल्या मेणाचा कढत ठिपका
कढत सही करतो देहांत स्थानी
कोऱ्या प्रतिज्ञापत्रकावर. पत्करतो
जन्मठेप मेणवत्तीच्यावतीने. काळोख
मरणाच्या ओंजळीने चरित्रे पितो.'

मेणाच्या थारोळ्यात ज्योत बुडून विझलेल्या मेणवत्तीची ही स्थिती. प्रथम, द्वितीय आणि तृतीय अशा तीन प्रहरांत विभागलेल्या रात्रीला वाहिलेली ही मेणवत्ती झिजून झिजून शेवटी नाश पावते. इथे ईश्वराचे रहस्य समजावून घेण्यासाठी सारे आयुष्य खर्ची घालणाऱ्या साधकाची आठवण व्हावी. वास्तविक देवाच्या मायेचे स्वरूप हे गुप्तीत लपलेल्या तलवारीप्रमाणे आहे; पण हे शेवटपर्यंत गुपीतच राहते. मग चरित्रे अशी नेमलेल्या जागी केवळ स्तब्ध उर्भी असतात. त्यांचे सत्व, तेज नाहीसे होते. कारण देवांच्या साम्राज्यातील सारे व्यवहारच मुळी क्षीण प्रकाशात चालतात. जन्मठेपेच्या प्रतिज्ञा पत्रकावर प्रारंभीच सही केलेल्या ह्या मेणवत्तीलाही मग चरित्रांचे रुक्ष निरीक्षण ह्याहून अधिक कर्तृत्व उरत नाही. कारण देवांचे जग ह्यापेक्षा जास्त संधीच देत नाही. तिथे बाकीचे नाकासमोर चालत आले म्हणून स्वतःही त्या लोंढ्यात तितक्याच आंधळेपणाने सामील होणाऱ्यांचीच नितांत आवश्यकता असते. आणि देवांचे जग, न होणाऱ्या प्रलयाच्या धाकावर असे जिवंत असते.

ह्यानंतरची कविता मेणवत्तीचे जळणे ह्याला एक नवाच अर्थ शोधते. मेणवत्तीचा जन्म वास्तविक प्रकाशदानासाठी. त्यागासाठी. तिला भोगाव्या लागणाऱ्या प्राक्तनाची रेषा साधी, सरळ. ही वात हेच तिचं आयुष्य. हे तक्रारविहीन आहे. पण हीच मेणवत्ती कधी फार वेगळे रूप घेऊन येते. मीलनासाठी धडपडणाऱ्या पतंगाला ती हूलकावण्या देते. नेहमीची सर्वस्व दानाची भावना इथे दिसत नाही. पतंग आणि ज्योत ह्या पूर्वापार चालत आलेल्या दृष्टांताला एक नवाच आयाम ह्या कवितेमुळे मिळतो. इथे पतंग केवळ तेजाच्या स्पर्शानेच आकसून जातो. दिपून जातो. केवळ मेणाचाच पल्ला गाठतो. प्रखर तेजोमयी ज्योतीची निःशंक भेट घ्यायला तो धजावतच नाही.

तिसऱ्या कवितेत सती जाणाऱ्या स्त्रीचे रूपक आहे. जन्मभर पातिव्रत्याची एकच वाट ठाऊक असणारी ही स्त्री स्वतःच स्वतःचा स्वतःच्या वाटेवरचा वाटखर्च होत असते. स्वतःच्या देहाची जबरदस्त किंमत देऊन मिळणारी सतीची वस्त्रे हेच तिचे बहुमोलाचे दागिने असतात. यातून मिळणारी मुक्ती आणि मोक्षप्राप्ती ह्यासाठीच तिचे सारे आयुष्य असते.

अत्यंत संपन्न जाणीवांची साक्ष देणाऱ्या ह्या तीन कविता.

कोलटकरांना आग हे चैतन्याचे प्रतीक वाटते. सिगारेट पेटवण्यापासून तर मढं जाळण्यापर्यंत सर्वत्र ह्या चैतन्याची छोटीमोठी रूपं आपल्याला दिसतात. कधी ही आग विराट होऊन पाप नष्ट करते तर कधी होळी होऊन मोडकं टेबल, लंगडी खुर्ची, तुटकं दार ह्यांचा एकच घास घेते. कधी ही पांडव अडकलेल्या लाक्षागृहाभोवती भडकलेली अवध्य आग असते. हिच्यापुढे यज्ञ, यजमान, वेदी, पुरोहित, स्थंडिल, आहुती सारे एकच 'समरपयामि'. कधी ही एखाद्या सर्कशीतल्या पोटभरू सिंहापुढे 'दैनंदिन जळती मोकळीक' होऊन येते. मात्र गिधाडांनी काबीज केलेले महाप्रचंड इमारतींचे हे शहर पांगवण्याचे सामर्थ्य फक्त तिच्यातच आहे. आणि निदान तेवढ्यासाठी तरी तिने जळत राहिले पाहिजे. नाहीतर हे शहर हिंस्रपणे अंगावर चालून येण्याची शक्यता आहे.

चरित्र आणि त्याच-धर्तीच्या आणखी दोन कविता ह्या संग्रहात आहेत —

"चिखल ठरलो भिक्षापात्र भटकलो भाग्यहीन
वाक्यहीन वाळवंटी अनवाणी आकाशवाणी
पिऊन आरशांची निवळी
झालो गोसावी सावकाश
सूर्याच्या भूकेचा झाडपाला ओरवाडला.
अंगाखांद्यावर खेळवला महारोग निखली सावली.
डोंगर तबेला थंड बंड उनाडलो दरी."

खप्पड गालफडे विसरून केलेला हा दाहीदिशांचा प्रवास आहे. इथे पाय प्रत्येक वाटेवर अकस्मात उचलला जातो. इथे आस्तित्व ही 'विश्वाच्या मशीवरची कालातीत खबर' आहे. आणि 'शुभ्र ईश्वरी उतारी शुभ्र हात हुकुमाचे' असा अंत आहे.

अनुक्रमणिका
मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ
मकर संक्रांत, १९२३

मात्र मुंबई ते कोपरगाव हा प्रवास अगदी वेगळा आहे. ह्यात धवधव्याच्या गावी पाण्यासाठी विकावे लागलेले ब्लँकेट, भूकतहानेपायी गाडीवाल्या-कडून ऐकावी लागलेली जळो जीणे वगैरे वांझ सुभाषिते. पुरेसे निर्लज्ज झाल्याशिवाय इथे पाऊल टाकता येत नाही.

एकीकडे ही पोटभरू नीती आहे तर दुसरीकडे केवळ डिप्रेशन आहे. ऑफिस पासून घरापर्यंत सगळीकडे तो शिकार होतोय. घरी त्याच्या षंढपणावर चिडून बायको लंड पकडून कापून टाकायच्या धमक्या देतेय तर दुसरीकडे ऑफिसात चक्क अन्याय करून बॉस म्हणतोय, सॉरी मिस्टर नेने; इलाज नाही. समाजाचा प्रत्येक लहानमोठा घटक त्याला भरडतोय. ह्या समाजाचा व्यवहारही रोकडा. तो तर जन्मापासूनच पाठी लागलेला. रोगांनी जर्जर झालेल्या शरिराचीही सुटका नाही. पायावर पाय देऊन लोक 'सॉरी' म्हणणार, डोळ्यात छत्री घालून 'माफ करना' म्हणणार, अंगावर ट्रक घालून खेकसणार 'दिखता नही, मादरचोद दिखता नही ?'

अकारण भावनाविवशतेचे जू कोलटकरांनी कधीच मानेवर घेतलेले नाही. 'पर्शियन मिनिएचर', 'एकटी' सारख्या कवितांमधून हे जाणवते. पर्शियन मिनिएचरमध्ये तो तिला पर्शियन मिनिएचरसंच्या धर्तीवरचं स्वतःचं एक चित्र काढायला सांगतो. बेशुध्द सिंहांच्या ढिगावर तो बसलाय, इष्कभोर तृप्त डोळ्यांचा. कृष्णमधाच्या त्यक्तडंख पोकळ्या-सारखी त्याची सत्वाढय वक्षघोळ दाढी. माथ्यावर समजुतदार सूर्य. उन्हाचीच आणि धुळीची रंग योजना. वाऱ्याची सूचनाही नाही. फक्त पोषा-खावरली नक्षी. एखादेच झाड: क्वचित एखादा पक्षी. हे चित्र तिच्या खोलीत आणि तिथून तो पहातोय तिच्या दिवसांचा उदास हिंदोला. विलक्षण तरल, अमूर्त भावाशयाने संपन्न असलेल्या ह्या कविता साहजिकच रूढ, ढोवळ, भावगीत टाईप प्रेमकविते-पेक्षा कितीतरी श्रेष्ठ ठरतात.

खंडोबा आणि त्याची राणी ह्यांच्यावरची 'तू यक्षिणी' ही कविता आपल्याला एका गूढ, भारलेल्या विश्वात घेऊन जाते. तिथे आपल्याला निरनिराळ्या आख्यायिका भेटतात. आणि हिप्नो-टाईज्ड होऊन आपण त्या मिथ्‌स्‌चे बोट धरून हिंडत राहतो. (कोलटकरांनी जेजुरीच्या देव-स्थानावर लघुचित्रपट निर्माण करण्याची योजना तयार केली होती आणि त्यांनी ह्याच देवस्थानावर 'जेजुरी' हे इंग्रजी कवितांचे पुस्तक लिहिले आहे. हे ह्या संदर्भात लक्षात घेण्यासारखे आहे).

अरुण कोलटकरांच्या हॉस्पिटलमधील कविता बहुतांशी डॉक्टरांच्या रिमार्कस् वरल्या प्रतिक्रियांनी व्यापलेल्या आहेत. इथे असोसिएशन्सचा विचारही व्हायला हरकत नाही. कारण डॉक्टरांनी लिहिलेल्या विशिष्ट रिमार्कस्‌वरून, किंवा संभाषणांमधून मनात जागी झालेली असोसिएशन्स ह्यामध्येसुध्दा ह्या कवितांचे मूळ असू शकते. डॉ. ची मोठाल्या मिशांवरची कॉमेंट आणि पुढे लिहिली गेलेली लावणी ह्या दृष्टीने पहावी.

टचकन उमलणाऱ्या बेवारस तृप्तीची कोलट-करांना मनस्वी चीड आहे. अशा उथळपणाविरुद्ध लढताना त्यांच्या लेखणीला कठोर उपहासाची धार येते. हिशेबी, दिखाऊ, व्यवहारी कलात्मकता, नसानसात चिवचिवणाऱ्या व्हीनसला चिरडून टाक-णाऱ्या निर्लज्ज घोडीसारखी त्यांना वाटते. आणि मग दैवत सारख्या कवितेत कोलटकर ह्या चतुर पोपटपंचीची खिल्ली उडवतात. ज्ञानेश्वरांच्या समाधीपुढे केवळ आंधळेपणाने डोके टेकवून, न आलेल्या अलौकिक अनुभूतीची पानपान भरून भुक्कड वर्णने करणाऱ्या बाजारू लेखकांपेक्षा—

'पांगले अवघ्या वैष्णवांचे भार
ओसरला ज्वर मृदंगाचा.
मंदावली वीणा विसावले टाळ
परतून गोपाळ घरी गेले
स्थिरावला हार वाळली पाकळी
गुंतली फासळी निर्माल्यात'

हे कोलटकरांचे विचार अधिक खरे व विचार करायला लावणारे वाटतात.

अशा ह्या कविता. भन्नाट. यातील कुठलीही कविता अटळपणे दुर्बोध नाही तर कविता समजून

अनुक्रमणिका
मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

घेण्याची व समजण्याची शक्यता ज्यामुळे असते असे काही धागे कवितेत अवश्य असतात. मात्र ह्या आधारावर कोलटकरांची कविता सर्वार्थानं कळली असा दावा करणे जरा धाडसाचेच ठरेल. कारण आपल्याला प्रतीत होणारे तिचे स्वरूप हे संपूर्ण असेलच असे म्हणता येत नाही. त्यामुळे आशयही प्रत्येकाला वेगवेगळा जाणवू शकतो. शिवाय कुठल्याही कलाकृतीच्या बाबतीत अजिबात न आवडणे पासून अद्वितीय वाटणे येथवरची मते व्यक्त केली जाणे अपरिहार्यच असते. मात्र अरुण कोलटकरांच्या प्रतिभेचे वेगळेपण ह्या कवितांमधून निर्विवादपणे सिद्ध होते. विलक्षण नादमयी, चित्रमयी शब्दकला लाभलेला हा कवी आहे. क्वचित् उपहासाच्या सुरात बेगडी जीवनाची थट्टा उडवणारी ही कविता एकीकडे जीवनाचा, त्यातील वास्तवाचा अतिशय सखोल, समग्र वेध घेते. यातही कवीची भूमिका सहचराची (Companion) आहे. ज्या प्रश्नांची उत्तरे कोलटकरांची कविता शोधते आहे ते प्रश्न आजचे आहेत, सार्वत्रिक आहेत. त्यांची कोलटकरांना मिळालेली उत्तरे आपल्याला पटोत न पटोत, त्यांचे महत्त्व कमी होत नाही, कारण कोलटकरांचे प्रयत्न फार खरे आणि अस्सल असतात.

⊕ ⊕ ⊕

निरंजन उजगरे / **सायकलरिक्षावाला**

'चढाचा रस्ता आहे सगळा,
पोटाला पाहून भाडं ठरवा'
कपाळाचा घाम पुन्हा
चिव बाहीने पुसून घेतो,
सायकलरिक्षा सुरू होतो—
चढावावर हातांनी खेचतो,
उतारावर शीळ घालतो.
कोवळा पोरगा,
पोटरीवर घट्टा, तळव्यांवर भेगा,
खाकी शॉर्टपँटला ठिगळांची सजा.
अनेक सवाऱ्या
घासाघीस करणाऱ्या,
बाजारात उतरून ताटकळत ठेवणाऱ्या,
कुजबुजीत लाजणाऱ्या,
कानात फाया ठेवणाऱ्या,
हातात गजरा माळणाऱ्या,
संध्याकाळी शाळेतून
किलबिलत निघणाऱ्या,
शिकण्याच्या स्वप्नाला उजाळा देणाऱ्या.
सूर्य येतो—सूर्य जातो,
मालकाशी हिशोब पुरा होतो.
आभाळ चांदणे ढाळत असते,
देवाघरी गेलेली आई
रिक्षावाल्याच्या स्वप्नात येते.
तो तिच्या कुशीत शिरून सांगतो,
'हल्ली छातीत दुखत असते!'
आईचा हुंदका सोसत नसतो
रिक्षावाला झोपेत रडत असतो.

श्रीकांत गोडबोले / **जाग**

मी आता लिहू नये
असे शब्दजीवी.
आता हृदये दगडांची व्हावीत;
आणि स्वप्नसंकुल डोळ्यांना
स्वच्छ रस्त्यांची जाग यावी.
आता केवळ लिहू नये
असे शब्दजीवी.

अनुक्रमणिका

मराठीचा विकास : महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

दिलीप देशपांडे / **जी. एं. ची कथा**

'जी. एं. ची कथा' हा डॉ. पंडित आवळीकरांचा एक लहानसा समीक्षापर ग्रंथ. मुळात ही त्यांची भाषणे मुंबई मराठी साहित्य संघाने आयोजित केलेल्या कै. वा. म. जोशी स्मारक व्याख्यानमालेत गुंफलेली. जी. ए. कुळकर्णी यांच्या कथेचा विचार त्यांनी शैली, रूप आणि दृष्टांत या तीन दृष्टींतून केलेला आढळतो.

जी. ए. कुळकर्णी यांचे आतापर्यंत आठ कथा-संग्रह प्रकाशित झालेले आहेत. डॉ. आवळीकर स्थूलमानाने त्यांचे तीन टप्प्यांत विभाजन करतात. 'निळासावळा', 'पारवा', 'हिरवे रावे' आणि रक्तचंदन, हा पहिला टप्पा. 'काजळमाया' हा दुसरा. तर 'रमलखुणा', 'सांजशकुन' आणि 'पिंगळा-वेळ' हा तिसरा.

जी. एं. च्या एकूण सर्व कथांसाठी डॉ. आवळीकर 'एक अनन्यसाधारण कलाकृती' किंवा 'जी. एं. ची कथा' असा शब्दप्रयोग वापरतात. त्यांना जी. एं. ची कथा ही 'सहस्रपाकळ्यांच्या, परंतु एकेका पाकळीने उमलत राहणाऱ्या, अजून पुरत्या न उमललेल्या पुष्पासारखी' वाटते. जी. एं. च्या कथेतून डोकावणारे संवेदनाशील आणि सृजनशील 'मन' डॉ. आवळीकरांना जाणवते. जी. एं. ची कथा समजण्यासाठी त्यांच्या शैलीचा विचार व्हायला पाहिजे असे डॉ. आवळीकर सुचवितात. जी. एं. ची शैली केवळ 'भाषा' शैली नसून 'वाचा' शैलीही आहे. 'भाषा' ही तशी मूर्त संकल्पना आहे. पण 'वाचा' हा तिचा प्रसंगानुरूप होणारा बहुरूपी आविष्कार आहे. (पृ. ३) भाषेचा नाद, वाक्यरचना, शब्दांच्या जातींचा (विशेषणे, सर्वनामे, क्रियापदे इत्यादी) विशिष्ट उपयोग, शब्दसंग्रह, संदर्भ आणि प्रसंगानुरूप भेद इत्यादींचा विचार शैलीविचारात महत्त्वाचा ठरतो. (पृ. ४) डॉ. आवळीकरांनी जी. एं. च्या शैलीविषयी विचार करताना जी. एं. ची कथानिवेदनपरता, काव्यात्मकशैली, शीर्षकाची अन्वर्थकता, औपरोधिक शैली इत्यादींचे उदाहरणांसहित विवेचन केलेले आहे. विविध भाववृत्तीं बरोबर जीवनवृत्ती देखील प्रकट करणारी जी. एं. ची शैली खऱ्याखुऱ्या अर्थाने 'वृत्ती' आहे असे आवळीकरांना वाटते (पृ. ८) 'क्षण' दर्शन आणि 'दर्शन' क्षण हे शब्द त्यांना जी. एं. च्या शैलीच्या संदर्भात महत्त्वाचे वाटतात.

'सांजशकुन' या संग्रहाच्या मलपृष्ठावर अवतरण चिन्हात जो एक परिच्छेद दिलेला आहे त्यातून रूप - विचाराची निकड (की भानगड ?) निर्माण झाली. या कथांना 'रूपकथा' म्हणू नये; त्याऐवजी त्यांना 'दृष्टांतकथा' म्हणावे असे सुचविणारे विधान त्या परिच्छेदात आहे. त्याचा परामर्श डॉ. आवळी-करांनी घेतला आहे. 'प्रतिमा, रूपक आणि प्रतीक' यांचा सेंद्रिय - वाढीच्या स्वरूपाचा अर्थविस्तार म्हणजे 'रूपककथा' किंवा 'Allegory' एवढे सांगून डॉ. आवळीकरांनी जी. एं. च्या कथांना येणारे Allegorical स्वरूप आणि जी. एं. कुळकर्णी यांच्या कथेला Allegory हे रूप कसे येते याचे थोडक्यात विवेचन केलेले आहे. 'संदिग्धता' हे जी. एं. च्या कथेचे महत्त्वाचे रूप असल्यामुळे त्याचेही विस्ताराने विवेचन 'रूपविचारात' केलेले आहे.

जी. एं. च्या कथेत अस्तित्ववाद आहे. जी. एं. ना नुसते जीवनाचे नव्हे तर अस्तित्वाचेच जे 'दर्शन' घडले आहे, घडते आहे, ते 'दर्शन', ते vision, ते 'क्षणात नाहीसे होणारे दिव्य भास' त्यांच्या कथात आहे या अर्थाने जी. एं. ची कथा ही दृष्टांतकथा आहे अशी डॉ. आवळीकरांची कल्पना आहे. (पृ. ३५) जी. एं. च्या अस्तित्ववादाचे विवेचन करताना जी. एं. च्या कथेत दिसणारे दुःख, वासना, रौद्रभीषणता, मरणजन्म इत्यादींचे विवेचन त्यांनी केलेले आहे.

डॉ. आवळीकरांनी आस्वादकाच्या भूमिकेतून जी. एं. ची कथा उमलते कशी आणि त्याआधी ती स्फुरते कशी या दोन प्रश्नांच्या उत्तराची दिशा दाखविण्याचा प्रयत्न या पुस्तकातून केलेला आहे. 'जी. एं. च्या कथे' विषयी केलेले हे विवेचन अभ्या-सकांना निश्चितच उपयोगी पडेल यात शंका नाही.

जी. एं. ची कथा, डॉ. पंडित आवळीकर, कॉंटिनेंटल प्रकाशक, पुणे, १९७८; पृ. ६६; मूल्य ४ रु.

अनुक्रमणिका
मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

व्ही. पी. दामले / **मानवावतार**

जीवशास्त्राचा अभ्यास करताना व नंतर शिकविताना वारंवार वाटून गेले आणि विद्यार्थ्यांनाही विषयानुरूप, प्रसंगाप्रसंगांनी विशद केले की सजीवांच्यात अनंतकाळ होत गेलेल्या (व पुढेही घडत राहाणाऱ्या) नवनवीन युक्त व पोषक आनुवंशिक फेरबदलामुळे झालेल्या उत्क्रान्तीची (आपल्यापुरती प्राण्यांच्यातील) परिणती संवेदनाक्षम मानवाची जडण-निर्मिती होण्यात झालेली असली, तौलनिकदृष्टचा सर्व प्राण्यांत तो सभोवतालशी अधिक मिळे-जुळे असा सयुक्त, लायक (fit in the struggle for existence) बनत आलेला असला, म्हणजेच जीवसृष्टीतील मनुष्याचे नियतीनुरूप स्थान जरी अनन्य साधारण असले तरी त्याने स्वकरामतीवर मिळविलेला मान मात्र अगदी सर्व साधारणच गणावा लागेल !

जीवाची कार्ये त्याच्या दोन प्रवृत्तींतून उद्भवतात. एक स्वतःला टिकवून धरणे व दुसरी स्वतःच्या वंशावळीचे सातत्य राखणे. त्यानुसार त्यांची अन्न-निवाऱ्यासाठी खटपट चालते. शरीरान्तर्गत क्रिया घडून वाढ होते, विशिष्ट जीवनावस्थेत आल्यावर त्याचे कडून पुनरुत्पादन घडते आणि अखेर त्याची जीवनयात्रा आटोपते पण हे सारे तंतोतंत इतर प्राणीमात्रांकडूनही घडतच असते, नाहीं का ? मग मानवाचे असे उत्क्रान्त वैशिष्टच ते कोणते ? तर त्याला प्राप्त झालेली बुध्दी-मन-भावना ज्या साधनांच्या करवी त्याला साध्य झालेली कार्य-कारणभावांची अटकळ, विचारपूर्वक-संयमी आणि भावनात्मक वागणूक. त्यांच्या सहाय्याने त्याने इतर प्राण्यांपेक्षा उजवेपणा दाखवावयाचा-तेच त्याचे अवतार-कार्य आहे. तसे नसेल तर त्याच्यात व इतर प्राण्यांत फरक राहाणार नाही व तो त्यांच्याच योनीत मोडेल. पण असे असून, जाणत्यांनी अनुभवांती निष्कर्ष म्हणून व्यक्त केलेले विचार - "जो जो माणसाच्या प्रकृतीं-प्रवृतींची ओळख (होऊ) पटू लागते तो तो वाटते पशू बरे" – काय दर्शवितात ?

खरंच, मला वाटते जीवन हे एक नाटक आहे; आणि त्यातील प्राणीमात्रांत आपल्या वाटचाला नायक-नायिकांची (माणसांची) भूमिका आलेली आहे. तर मग आपल्या निवडीबाबत धन्यता मानून (म्हणूनच, 'असा काय नरदेह येईल पुन्हा !') आपल्याकडे दिलेले (इतर प्राण्यांहून भिन्न व उन्नत असलेले आपले मानवाचे) काम उत्तम, यथार्थ व सार्थ वठविणे हे नव्हे का आपले आद्य कर्तव्य ? तेच माणसाकडून होत नाही ही या नाटकातील शोकांतिका आहे !

प्राण्यांकडून, वयपरत्वे, जीवनकर्तव्ये (देहधर्म) घडवून आणली जात असतात - म्हणजे त्यांना त्या त्या जीवनावस्थेत ती-ती कार्येच करण्याची काय ती ऐपत (intuition) जडलेली असते. 'ते कार्य (मुकाटचाने) करा. नाही पेक्षा मरा' हाच त्यांचे बाबत नियतीचा अलिखित आलेख असतो. जसें, ऋतुमानान्वये, अवतीभवतीच्या वातावरणात, ठराविक तपमान, दाब, आर्द्रता या सारखी परिस्थिती आली की उत्तर-दक्षिण ध्रुवाकडन विषुववृत्ताकडे पक्षांच्या भ्रमंत्या (migrations) सुरू या व्हावयाच्याच. त्यावेळी त्यात सामील व्हावे-न व्हावे हे त्यांच्या 'पंखी' नाही ! त्या जीवघेऊ, वेगवान, मैलोगणतीच्या झुंड आयोजनात कित्येक पक्षी यदृच्छया मरणही पावतात. पण म्हणून, कोणत्या का कारणाने असेना, त्या विशिष्ट कालावधीत नियत असलेले स्थलांतर ज्यांच्याच्याने होणार नसेल, जे मूळस्थानी अगर वाटेत मागे रेंगाळतील त्यांनी नीर्वाणाप्रतच जायचे. आसमंतात विशिष्ट परिस्थिती आली की (टोपली खाली झाकलेला का असेना) कोंबडयाकडून आरवणे हे घडायचेच. त्याच प्रसंगी (अनायासे) सूर्यप्रकाशही फाकू लागलेला पाहून आपण म्हणतो, 'कोंबडा

अनुक्रमणिका
मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

आरवला अन् सूर्य उगवला' फुलपाखरांच्या अविकसित बाल्यावस्थेत ती आळी रूपात असतात. त्यावेळी त्यांना दृष्टी नसतेच. केवळ गंध-स्पर्शानुवर्ती ती पानाफुलांकडे खेचली जात त्यांचा फन्ना उडवीत असतात. हे जीवनकार्य उरकवण्यात जर-तर त्यांच्यातोंडी नाही!

पुनरुत्पादन क्रियेची ही तऱ्हा तीच. पावसाळ्याच्या सुरवातीला साचलेल्या डबक्यांतून, बेडूक 'ड रॉऽऽऽ व' चा कल्लोळ उडवीत असलेले ऐकले असेल ना? त्यातही त्यांची 'इच्छापूर्ती' (purposive action) वगैरे काही एक नाही. त्या आवाजाच्या व मुख्यत्वे वासाच्या मागोव्याने नर-मादी निकट आणली जातात. त्यानंतर नराच्या पुढील पायांचा मादीच्या पोटाला विळखा, त्या दवावामुळे मादीच्या पोटांतील शेकडो अंड्यांचा पाण्यात निचरा व त्या थारोळ्यावर नराकडून रेतन-सिंचन घडत असते. यात वर म्हटल्याप्रमाणे भाववंधनाचा लोभ मुळी सुध्दा नाही. किंबहुना प्रयोगान्ती सिध्द झालेले आहे ते हे की मादीच्या पोटाला विळखा घालण्याची क्रिया ही जशी नराच्या 'मनावर' नाही तसेच ती पकड सोडणे हे ही त्याच्या 'हाती' नाही! कारण त्या काळात मादी नच गवसली तरी त्याचे सोयरसुतक नराला नाही; हाताला लागलेल्या जिनसांना-मग तो गुळगुळीत लाकडी ठोकळा अगर दगड का असेना-नराकडून विळखा हा घातला गेलाच पाहिजे व नंतर यथावकाश त्याचे कडून नर-बीजांचे सिंचन हे घडलेच पाहिजे. येवढेच काय, पण नरबीज सिंचनाच्या आधीच्या स्थितीत नराचे मुंडके किंवा मागील पाय छाटले तरी त्याच्या हातांचा विळखा येवढासाही ढिला होत नाही! हे येवढे विस्ताराने अशासाठी निवेदिले की प्राण्यांच्या जीवन अवस्थांतील एका नंतर एक घडावयाचे व्यवहार (क्रिया) त्यांच्या स्वतःच्या 'अक्कल-हुशारी' शिवाय घडतच जायचे असतात. मानवाचे व्यवहार त्याप्रमाणे तेवढेच घडले तर तो सरसकट प्राणीवर्गात बसेल, विशिष्ट अशा मानव योनीत नव्हे. कारण त्याच्या बुध्दीमुळेच त्याला प्राणीमात्रांमधे श्रेष्ठत्व, नव्हे अव्दितीयत्व प्राप्त झालेले असल्यामुळे त्याच्या कडून कृती घडावयाच्या नसतात तर त्याने त्या बुध्दीचा तर-तम जाणून, तावून मुलाखून, (सद्) हेतु पुरस्पर करावयाच्या आहेत. म्हणजे हेच की उत्क्रान्तीच्या सोपानावर त्याची पायरी, स्थान, प्राण्यांहून वरचढ असल्याने त्याने, वर वर्णिल्याप्रमाणे, जीवन कर्तव्यांचाच केवळ दास न बनता त्याचा स्वामी व्हावयास हवे आहे. भूक लागली म्हणून सारेच प्राणी खाण्यासाठी बळाचा वापर करीत धडपडतात; पण मुलांना, लहानांना दिल्याशिवाय, भूक लागली असून, न खाणारा, रंजल्या-गांजलेल्यांना आधी सुखी करणारा, तशी भावना बाळगणारा जो प्राणी त्याला माणूस असे म्हणतात. या प्राण्याचे मनुष्यत्व सामान्य प्राण्यांसारखी प्रयोजक म्हणून जीवन कर्तव्येच केवळ करण्यात नसून युक्त-अयुक्ततेकडे बघत ती करण्यात व विशेषत: ती कर्तव्ये न करू शकणाऱ्यांच्या जीवनोपयोगी व्यवहारात हातभार लावण्यात आहे. जो स्वत:च्या जीविताकरिताच केवळ झटतो तो प्राणी पशू. त्याचे सगळेच कसे यांत्रिकी वैचारिक भावभावनात्मक वगैरे शून्य. जो भावनेच्या संयमाच्या बळावर स्वत:करिता व त्या आधी दुसऱ्यासाठी झटतो त्या प्राण्यालाच श्रेष्ठत्व, मनुष्यत्व बहाल केले जावयाचे असते. त्याच्यापाशी जीवाच्या (कार्य करण्याच्या) दोन प्रवृत्ती नसतात असे नव्हे पण केवळ तेवढ्यात नसाव्यात. मानवावताराचे हेच कार्य, त्यातच त्याची महत्ता.

लहान वयात बुध्दीचा विकास होऊन 'समज' येण्याच्या आधी जीवनकार्ये प्राण्यांच्या सारखीच स्वत:पुरती, पोटार्थी असतात. त्यात अनुकरणाला प्राधान्य असल्यामुळे त्यांच्यासमोर वागताना मोठ्यांनी विवेक ठेवावयाचा. मोठेपणीची कार्ये 'माणसा' सारखी म्हणजे संयमी हवीत. पालकांकरवी व आपण होऊन शाळा-कॉलेजात नाव दाखल करून घेतल्यावर, किमान नियमित हजेरी व शिक्षकांनी सांगितलेला अभ्यास करण्याची दृष्टी विद्यार्थ्यांकडून अपेक्षिली तर त्यात विरोध कशाला? साऱ्या वर्षभर चालतेच, पण उन्हाळ्याच्या सुटीत शाळा-कऱ्यांची (त्यात बाप्यांची भरही कमी नाही), इतरांच्या घरांभोवतालची तिन्हीत्रिकाळ वर्दळ—ज्या झाडांची निगा राखण्यासाठी हात कष्टविले नाही

अनुक्रमणिका

मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

की वेळ खर्चिला नाही त्यांची फुले तोडणे, दगड मारून फळें पाडणे (मग त्यात घरांची कौले फुटली, इलेक्ट्रिक बल्बज् फुटले, कुणाला इजा झाली तरी त्याची ना पर्वा!), जळणासाठी काटक्या जमविणे, आकडीने झाडांच्या फांद्या छिनून बकऱ्या-गुरे चारणे या सारखी–बेमुर्वत कारवाई चाललेली पाहून पालक वर्गाची बेपर्वाई झोंबते. सामाजिक नीतिमत्तेची पायमल्ली करीत इमारती, रस्ते, बागा, थिएटर्स, आगगाड्यांचे डबे विडचाच्या पिचकाऱ्यांनी, विडीच्या थोटकांनी, फळें-सालपटींनी, कागद-चपेटचांनी गंधी करणारे, दिलेल्या शब्दांची व्यवहारात चाड घालविणारे, परोपकार तर राहोच पण स्वार्थी व्यवहारात इतरांना कष्ट-दुःख न होईल याकडेही न बघणारे, एक-दोन बालकांचीसुद्धा निगा राखण्याची ऐपत नाही याची जाण अधूनही पोरवडा उभारणारे पालक, कंगाल मनाचे गर्भ श्रीमंत–ही कसली आली आहेत माणसे? यांना कसे संबोधावे माणसे? 'सारेच करतात' या सोयीच्या कारणापायी सहसा हे चालते. ऐकिवात आहे की या तऱ्हेने फुकटचा माल मिळविण्याला व मनासारखे वागायला लहानग्यांना मोठे भाग पाडीत असतात. फुकट मिळकतीची लहानपणी लागलेली (का लावलेली?) ही चटक मोठेपणी सहजासहजी मनाला स्वार्थापायी बेरड बनविते व ह्यातून चोरी-मारी, दरोडे-खून घडविते. यात कसली आली आहे मनुष्यत्वाची चाड? असे सांगतात, फाशीची शिक्षा झालेल्या खुन्याला त्याची अखेरची इच्छा पुसता, त्याने "आईला भेटवा", म्हटले म्हणून त्या माऊलीला आणून त्याचे पुढे उभे केले. "अंतर्यामीचे केवळ तिच्याशीच बोलतो" म्हणत तिच्या नजीक कैदी गेला अन् तिचा कानच त्याने चावून तोडला! रक्तबंबाळ आईची आरडा-ओरड झाली. पोलिसांनी फटके मारीत कैद्यालाही जायबंदी केला. जमिनीवर विव्हळत लोळत कैदी व्याकुळतेने म्हणाला, "आई कसली? याच चांडाळणीने मला लहानपणी उचलेगिरी करण्याला मारहाण करून भाग पाडले आणि परिणामी मी बेरड-खुनी बनलो. माझ्या पुढून हटवा हिला". काय दर्शविते हे गाऱ्हाणे? केवळ पोटासाठीचे, वंशावळीच्या सातत्यासाठीचे (स्वार्थी) व्यवहार हे मनुष्याचे जीवन कर्तव्य नव्हे. मनाची शिदळकीच नराचा वानर करीत असते. मनाची श्रीमंती म्हणजेच स्वत्व, राष्ट्रीयत्व, विश्वबंधुत्व; आणि त्याची जोपासना निस्वार्थातच होताना दिसत असते.

सगळे मित्र मदत करायला तयार असून, ते गळ घालीत असून, कैदेतून निसटून जाणे हे अधार्मिक, अप्रमाणिक, पळपुटेपणाचे (तत्कालीन) कायद्याविरुद्ध आहे म्हणून नकार देणारा सॉक्रेटिस; सुळावर खिळे ठोकून जिवे मारणाऱ्यांच्या तर्फेही क्षमा मागणारा (Forgive them, My Lord; They know not what they do) जीझस्; शिकलेल्या धनुर्विद्येची सारी किमया हाताच्या बोटात आहे हे पक्के ठावे असून, गुरूने सुचविलेली गुरुदक्षिणा म्हणून आंगठा कापून देणारा एकलव्य; 'आधी कोंडाण्याचे मग माझ्या रायबाचे लगीन' म्हणत स्वराज्य निर्मितीत स्वखुषीने धारातीर्थी झेपावणारा तानाजी; शिवबा राजांच्या सुरक्षिततेसाठी त्यांना विशाळगडपर्यंत पोहोचण्याला लागणारा वेळ मिळावा म्हणून घोडखिंडीत मोगल फौज थोपविण्यात रक्त सिंचणारा बाजीप्रभू; स्वराज्य संपादण्यासाठी केलेल्या प्रयत्नांत खडतर शिक्षा लीलया भोगणारे लोकमान्य; अहिंसक कायदेभंग सत्याग्रहाचा आपला कार्यक्रम परराजवटीला आधीच कळवून धर्मयुद्ध खेळण्यात कष्टणारे महात्माजी; परकीय राजकर्त्यांना दे माय धरणी ठाय करण्याच्या राष्ट्रकार्यात अमानुष छळ सोसतांना न डगमगता, हसतमुख, "बुध्याचि वाण करि हे धरिले सतीचे" म्हणणारे स्वातंत्र्यवीर; उत्तुंग कर्तृत्वाचे म्हणून (परकीय) राज्यकर्ते मोठ्या मानाच्या-पगारांच्या जागासाठी विनवून बोलावीत असतानाही, स्वबांधवांच्या भल्यासाठी, त्यांना सबुद्ध करण्यासाठी केवळ १००–१५० रुपयांवर आजीव सदस्य म्हणून स्वनिर्मित शिक्षण संस्थांत राबणारे निष्ठावन्त, चिरंजीव सोनोपंत दांडेकर, दत्तोपंत पोद्दार, रँगलर परांजपे–महाजनी किंवा लढाईच्या काळात इंग्लंडवासियांचा एकमेव त्राता-नेता, लढाईनंतरच्या निवडणुकीत पराभव झालेला पण स्वराष्ट्राचा मध्यस्थी म्हणून अमेरिकेला आल्यावर कुणी पत्रकाराने विचारले

अनुक्रमणिका
मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ
मकर संक्रांत, १९२३

"तुम्हाला डालवून चाललेल्या तुमच्या राष्ट्राच्या व्यवस्थापनेबद्दल तुम्हाला काय म्हणावयाचे आहे ?" तर त्याला "हा प्रश्न इंग्लंडमध्ये विचारलात तर मी उत्तर देण्याचा प्रयत्न करीन. आत्ता मी माझ्या राष्ट्राचा प्रतिनिधी म्हणून आलेले आहे. मी असताना होती तितकीच आत्ताही इंग्लंडमध्ये आबादी आबाद आहे"–असे उत्तर देणारा चर्चिल; ही माणसे. याला म्हणतात मानव्याची शान, स्वत्व, राष्ट्रीयत्व. यातून मानवावतार गवसतो.

या प्रसंगी मला, माझे जेष्ठ बंधू (अॅडव्होकेट वा. पु. दामले, बुलढाणा) यांनी केलेली ईश्वरी अवतारांची कार्यकारण मीमांसा स्मरते–श्रीरामचन्द्र हे जर सर्वज्ञ, सर्वसाक्षी, सर्वशक्तिमान श्रीविष्णूचे अवतार तर खरं म्हणजे, सीतेचे हरण करून अनंत योजने पळालेल्या, रावणाचे तो जिथे असेल तिथे, दिव्यास्त्राने ते हनन करू शकत नव्हते का ? किंवा श्री शंकरासारखे तिसऱ्या डोळ्यातून अग्नीचा झोत टाकून त्यांनी रावणाचे भस्म करण्यात कोणती अडचण होती ? पण श्रीरामचन्द्राच्या अवतारातून देवाचे देवत्व प्रकट करण्याचे ध्येयच नव्हते मुळी. म्हणून सर्वसामान्य माणसासारखे, सीता विरही राम, तिच्या शोधार्थ रानांवनांतून वणवणले, त्यांनी (वा) नर सेना बनविली, लंकेत सीता आहे हे कळल्यावर रामेश्वर-लंका सेतू बांधला आणि रावणाशी युद्ध करून त्याचा (म्हणजे पृथ्वीवरील अन्याय, अनीतीचा) अन्त केला. तसेच श्रीकृष्णाचेही. तो सुद्धा सर्वज्ञ विष्णूचा अवतार. मग त्याने कशाचे नव्याने ज्ञान संपादावयास हवे ? पण मानवासारखे त्यानेही गुरूची (सांदीपनींची) सेवा करीत विद्याध्ययन केलेच ना ? मानवाचे रूप घेतलेल्या परमेश्वराचे दैवी सामर्थ्य त्यांना दाखवावयाचेच नव्हते. त्या ईश्वरी अवतारांचे प्रयोजन नर स्वप्रयत्ने कसा नारायण होऊ शकतो ह्याचे मानवापुढे प्रत्यक्ष उदाहरणच उभे करणे–हेच ईश्वरी अवताराचे कार्य. तेव्हा पुरुषोत्तम बनणे हे प्रत्येकाच्या हातातच आहे. त्यासाठी बुध्या, विवेकाने व निष्ठेने प्रयत्न मात्र करावयास हवेत. मानवावताराची (मानवाकडून) हीच अपेक्षा.

रवींद्रनाथ टागोरांचे भाष्य किती बोलके आहे, नाही ? ते म्हणतात–"प्रत्येक बालक जन्मतो तो ग्वाहीसह की मनुष्याच्या मानव्याबद्दल, त्याच्या कर्तृत्वाबद्दल जगदीश्वर अजून निराश झालेला नाही !"

⊕ ⊕ ⊕

श्रीकृष्ण राऊत / स्वतःच्या खांद्यावर

स्वत:ला मेलो इतके सुतकी राहू नये कधी !
व्यथेच्या ऐनेमहालात प्रिया, पाहू नये कधी !
येणार असते चांदणी अनाहूत अंधारात;
निखळत्या उल्केच्या वाटेला जाऊ नये कधी !
हरेक ओठांना चुंबीत नसते रे गझल;
खुशालीत तिच्या, तिला गाऊ नये कधी !
उमलत्या फुलाचे आहे निर्माल्य ठरलेले;
उगाच दोष उन्हाला लावू नये कधी !
आपसूक रंगत जाते मेंदी रक्तात पेटून;
स्वत:च्या खांद्यावर चितेला वाहू नये कधी !

अनुक्रमणिका
मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

नीलिमा कुलकर्णी / **वेडगळं**

'वेडगळ' ही जयवंत दळवी ह्यांची अलीकडे प्रसिद्ध झालेली कादंबरी. प्रश्नचिन्हाने सुरू होणारी अन् प्रश्नचिन्हातच संपणारी अशी एका वेडया विश्वाची कथा !

आई वेडी असणारा, एक घरंदाज शाळामास्तर–दिगंबर. अगदी लहानशा गावात राहणारा. ही कथा शांता आपटेच्या काळातील– धोतर नेसणारे पुरुष अन् पातळ नेसणाऱ्या बायका यांच्या काळातील ! दिगंबरची आई वेडी होती म्हणून त्याच्या बहिणींची लग्नं जमत नाहीत. अन् लग्नं जमत नाहीत म्हणून त्या दोघीही वेडयासारख्या वागायला लागतात. एक तर अगदीच वेडयासारखी हसते, वागते; दुसरी मुग्धपणे स्वतःतच दंग राहते. ह्या तीन मुख्य वेडयांशिवाय दिगंबरला भेटलेले वेडे म्हणजे दिगंबरच्या मित्राचा भाऊ–महेश्वरबाबा, एक रस्त्यावरची वेडी–मुक्ता आणि स्वतःला भूत समजणारा जकात नाक्यावरील कारकून सुभाष व त्याची आई ! एवढा वेडयांचा बाजार 'वेडगळ' मध्ये आहे.

पण समाजातला प्रत्येक जण हा कशाच्यातरी बाबतीत वेडा असतो आणि एरव्ही शहाणा असला तरी केव्हा ना केव्हा वेडयासारखा वागणारा प्रत्येक जण तो 'वेडगळ' !

वेडया घराण्यात जन्मलेला दिगंबर आपण वेडगळ आहोत असे कोणाला वाटू नये म्हणून इतका सावध राहातो की प्रत्येक कृती करतांना दचकतो, घाबरतो. तरीही घराण्याच्या वेडाबद्दल अपमान सोशीत जगत असतो. त्या अपमानाच्यापोटीच त्याला रस्त्यावरच्या वेडया मुक्तेबद्दल कोणी वाईट बोललं तरी सहन होत नाही. तिची बाजू घेऊन तो बोलतो. त्या चिडण्यातून निराळे अर्थ काढले जातात शहाण्या समाजात ! कारण ह्या शहाण्यांपैकी जवळजवळ प्रत्येकाने मुक्ता वेडी असली तरी सुंदर आहे म्हणून तिचा उपभोग घेतलेला असतो, निदान तिचं नग्न स्वरूप पाहाण्याचा आनन्द मिळवलेला असतो. तरी ती गरोदर असताना तिला आधार देण्याचं धाडस एकातही नसतं. शेवटी तिला आधार मिळतो दिगंबरच्याच घरात ! दिगंबरच्या बहिणी तिला घरात आणतात. न्हाऊ माखू घालतात तेव्हा ती म्हणते, "आज माझा वनवास संपला". तिचं बाळंतपणही त्या करतात. बाळाच्या रडण्याने ते वेडं घर पावन होतं. दिगंबराच्या बहिणी आपलं वेड विसरतात. तेथे कादंबरी संपते.

वेडयांच्या सहवासात दिगंबरलाही वेड लागायची पाळी येते. जगातील तथाकथित 'शहाणे' जेव्हा वेडं करतात तेव्हाची ही अवस्था जयवंत दळवींनी विलक्षण प्रभावी रेखाटली आहे. अगदी नव्या आशयाची व नव्या पद्धतीची ही कादंबरी ! संदर्भावरून वाचकांनी निष्कर्ष काढायचे अशा रीतीने कथानकाची गुंफण केली आहे. ह्या पद्धतीमुळे व्यक्तीचित्रणे धूसर वाटली तरी ती समर्थ आहेत. विशेषतः माणुसकीची जाग जाणवावी असं हवालदार साटमचं पात्र मनाच्या कोपऱ्यात कुठेतरी स्थिरावतं ! पण कादंबरीचा शेवट मात्र प्रश्नांकित आहे. मुक्ताला आधार दिल्यावर समाज दिगंबरला सुखाने जगू देईल का ? मुक्तेमध्ये प्रत्येकाला interest आहे. त्या सर्व गिधाडांना तोंड देतांना दिगंबर कसा जगतो ? तो वेडा कां होत नाही ? हे प्रश्न अनुत्तरित आहेत. शिवाय बाळाच्या आगमनाने दिगंबराच्या बहिणी वेड विसरल्या आहेत पण मुक्ता हातातून निसटल्यावर समाजातील शहाण्या वेडगळांचं काय ? महेश्वरबुवाचा ह्या संदर्भात रोल कोणता ? मुक्ताचे मूल कोणाचे ? हे बारके प्रश्न तसेच सोडून दिले आहेत. तरीही कादंबरीच्या वेगळया वळणासाठी ती एकदा तरी वाचावी अशी उतरली आहे.

(वेडगळ, लेखक–जयवंत दळवी, प्रकाशक–केशव विष्णु कोठावळे, मॅजेस्टिक बुक स्टॉल, मुंबई, पृ. १५३, किंमत–१४ रुपये).

⊕ ⊕ ⊕

अनुक्रमणिका

विदर्भ साहित्य संघ

कार्यवृत्त (१ जुलै, १९७८ ते २० ऑगस्ट, १९७८)

गो. स. देहाडराय, सरचिटणीस

१. कार्यालय व्यवस्थापन

१.१ दि. ३०–७–७८ ला कार्यकारी मंडळाची सभा केंद्रीय कार्यालयात झाली. पंचावन्नाव्या वर्षाचा वार्षिक वृत्तांत, १९७७/७८ सालचा जमाखर्च व १९७८/७९ सालचे अंदाज पत्रक यांवर विचार झाला.

१.२ सर्वसाधारण सभा वि. सा. संघाच्या सभासदांची वार्षिक सर्व साधारण सभा दि. ३०/७/७८ ला सायं. ४-३० वाजता गडकरी सभागृहात झाली. त्या सभेमध्ये पंचावन्नाव्या वर्षाचा वार्षिक वृत्तांत, १९७७/७८ सालचा तपासलेला जमा-खर्च व १९/७८७९ सालचे अंदाज पत्रक मंजूर करण्यात आले.

२. आजीव सभासद

डॉ. दामले वासुदेव पुरुषोत्तम, वर्धा.
प्रा. मनोहर यशवंत राजाराम, नागपूर.

३. मराठी साहित्य महामंडळ

३.१ दि. १–७–७८ ला मराठी साहित्य महामंडळाच्या कार्यालयाचे उद्घाटन डॉ. मधुकर आष्टीकर यांच्या हस्ते झाले. महामंडळाचे अध्यक्ष श्री. आ. रा. देशपांडे (अनिल) ह्यांनी महामंडळाची रूपरेखा सांगितली. महाराष्ट्र साहित्य परिषदेचे चिटणीस म. श्री. दिक्षीत, पुणे, ह्यांनी परिषदेचा स्वाधीन असलेला रेकॉर्ड कोषाध्यक्ष श्री. गो. स. देहाडराय यांना दिला.

४. सांस्कृतिक कार्यक्रम

४.१ दि. ६–७–७८ ला 'स्त्री' मासिकाच्या संपादिका श्रीमती विद्या बाळ, पुणे, यांनी गडकरी सभागृहात महिलांशी चर्चा केली. स्त्री मासिकाचे कार्य, स्त्रियांच्या समस्या आदी विषयांवर प्रश्नोत्तर रूपी चर्चा झाली. ह्या कार्यक्रमात 'अभिव्यक्ती' ही संस्था सहभागी होती. संचालन सौ. कमल आंबेकर यानी केले.

४.२ दि. २६–७–७८ ला "प्रचलित विनोदी वाङमय आणि त्याची फलश्रुती" ह्या विषयावर परिसंवाद आयोजित करण्यात आला. ह्यामध्ये श्री. चंद्रकांत कुळकर्णी, सौ. तारा सावंगीकर यांनी भाग घेतला. अध्यक्षस्थानी डॉ. आष्टीकर होते. कार्यक्रमाचे संचालन सौ. वर्षा रेगे यांनी केले.

५. स्मृति–दिन व जयंती

५.१ दि. १–८–७८ टिळक पुण्यतिथीनिमित्त 'आम्ही असंतुष्ट आहोत' ह्या विषयावर परिसंवाद आयोजित केला होता. प्रियदर्शन माडखोलकर, कु. मेघना मेढेकर, रवींद्र पाठक व कु. सुनीती मोहरील यांनी भाग घेतला. संयोजन सौ. कमल आंबेकर यांनी केले. श्रीमती सुमतीदेवी धनवटे प्रमुख अतिथी होत्या. संघाध्यक्ष डॉ. आष्टीकर ह्यांनी समारोप केला.

अनुक्रमणिका
मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

५.२ दि. १३–८–७८ आचार्य अत्रे यांचा ७९ वा जन्मदिन साजरा झाला. ह्या दिवशी डॉ. ना. कृ. शनवारे, डॉ. वि. स. जोग व प्रा. भास्कर नंदनवार ह्यांनी परीसंवादामध्ये भाग घेतला. या कार्यक्रमाचे संयोजन श्री. अक्षयकुमार काळे यांनी केले.

५.३ दि. १५–८–७८ स्वातंत्र्यदिनानिमित्त ध्वज-वंदनाचा कार्यक्रम डॉ. मधुकर आष्टीकर यांच्या हस्ते झाला.

६. **संगीत समिती**

६.१ दि. २३–७–७८ ला संगीत मंडळाचे उद्घाटन प्रा.श्री. राजाभाऊ कोकजे यांच्या गायनाने झाले. त्याचवेळी नागपूर महाविद्यालयात संगीत विभागाचे प्रमुख म्हणून त्यांची पदोन्नती झाल्यानिमित्त त्यांचा शाल व श्रीफळ देऊन सत्कार करण्यात आला.

७. **नाट्यसमिती**

महिला एकांकिका स्पर्धा

७.१ दि. १५, १६, १७–७–७८ ला या स्पर्धा घेण्यात आल्या. यात ११ संस्थांनी भाग घेतला होता. एकांकिकांचे परीक्षक श्री. विनोद कुळकर्णी, सौ. सुनंदा गोळवलकर आणि सौ. सुहासिनी कुळकर्णी हे होते. संयोजन सौ. कमल आंबेकर यांनी केले. पारितोषिक समारंभ डॉ. सौ. कुसुम वांकर ह्यांचे हस्ते दि. १८–७–७८ ला झाला. संगीत सामर, रेखा दंडिगे धार्मिक राठोड यांची नृत्ये झाली. श्री. नाना ढाकूलकर लिखित 'प्रेमाचा केन्द्र बिंदू' हे प्रहसन श्री. कलाधर रानडे, महेश पातुरकर व सौ. कमल आंबेकर यांनी सादर केले. खालीलप्रमाणे पारितोषिके देण्यात आली :—

प्रथम क्रमांक— 'युकॅलिप्टस', महिला समाज, रामनगर, रु. १०१/- व 'व्यंकटेश ब्रम्हदेव जागिरदार' फिरती ढाल.

द्वितीय क्रमांक— 'म्हैस आणि महिला मंडळ,' नाट्य किरण उत्कर्ष कला मंदिर. रोख बक्षीस रु. ७५/- व फिरती ढाल.

तृतीय क्रमांक— "निर्णय," हर्णे महिला समाज, रोख बक्षीस रु. ६१/-.

उत्तेजनार्थ— 'का ? असे कां ?' ॲमॅच्युअर आर्टीस्ट कंबाईन्ड.

अभिनयाची तीन पारितोषिके प्रथम—श्रीमती कुमुद कुकरेजा, 'स्वप्न एक वांझोटे,' रोख बक्षिस रु. २५/- व मनोरमाबाई पोतदार पारितोषिक रोख रु. ५१/-.

द्वितीय—कुमारी अंजली गोखले "कां ? असं का ?" रोख बक्षिस रु. २०/- व प्रशस्तिपत्र.

तृतीय—श्रीमती कुंदा पंराजपे, "युकॅलिप्टस," रोख बक्षिस रु. १६/- व प्रशस्तिपत्र.

दिग्दर्शनाची दोन पारितोषिके

प्रथम—कुमारी प्रभा पणशीकर, "युकॅलिप्टस," वि. सा. संघाचे व यशोदाबाई मोरे पारितोषिक. रोख रु. २५/-.

द्वितीय—श्रीमती चंद्रप्रभा दिवेकर, 'निर्णय' रोख बक्षिस रु. १५/-.

उत्तेजनार्थ—कु. चंदा गोदे, 'गोल गोल आगगाडी' रोख बक्षिस रु. ११/-.

लेखन पारितोषिक

श्रीमती प्रतिभा कुलकर्णी, 'निर्णय' रोख बक्षीस रु. २५/-.

अनुक्रमणिका
मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

बाल कलाकार कु. देवयानी गोगटे "सोन्याचा रथ" ह्यांना श्रीयुत चंद्रकांत कुलकर्णी यांच्या तर्फे त्यांच्या मातोश्री कै. सुशीला बाई कुळकर्णी यांच्या स्मरणार्थ रोख बक्षीस रु. २५/-.

७.२ घर-अंगण दि. १२–८–७८ "घर-अंगण" ह्या योजने अंतर्गत "नव प्रभात", रामनगर, ह्या संस्थेने 'पोस्टमॉर्टम' ही एकांकीका सादर केली. अशा तऱ्हेचे कार्यक्रम दर महिन्यात एक ह्याप्रमाणे घेण्याची योजना आहे.

८. श्रीमती इंदिराबाई खरे, शालेय वक्तृत्व स्पर्धा

दि. १९।२० ऑगस्ट, १९७८ रोजी घेण्यात आल्या. वक्तृत्व स्पर्धेमध्ये एकंदर १३ शाळांनी भाग घेतला होता. स्पर्धेसाठी परीक्षक म्हणून श्री. सुरेश देशपांडे, श्री. गोविंद गोडबोले व सौ. स्वाती शहाणे यांनी काम केले. बक्षीस समारंभ श्री. आर. एस. जांभुळे, चेअरमन, एस. एस. सी. बोर्ड, नागपूर डीव्हिजन, नागपूर, यांचे हस्ते झाला.

बक्षिसे प्रथम क्रमांक—कु. संध्या वामन कोलते, रु. ५१/- (धनवटे नगर विद्यालय), द्वितीय क्रमांक कु. अर्चना मदनराव दशपुत्र, रु. ३१/- (लोकांची शाळा), तृतीय क्रमांक कु. माधवी चाफेकर, रु. २१/- (हडस हायस्कूल).

उत्तेजनार्थ (१) कु. वीणा लोहोकरे, रु. ११/- (लोकमान्य कन्या विद्यालय, वरोरा), (२) विलास मनोहर, रु. ११/- (महाराष्ट्र अध्ययन मंदिर).

९. श्री. शिवाजी संदर्भ ग्रंथालय

९.१ दि. १ जुलै, १९७८ पासून एम. ए. च्या विद्यार्थ्यांना मार्गदर्शनाचे कार्य सुरू झाले.

९.२ श्री शिवाजी संदर्भ ग्रंथालयाचे अपूर्व यश वि. सा. संघाच्या श्री. शिवाजी संदर्भ ग्रंथालयात एम. ए. (मराठी) चा अभ्यास करणाऱ्या विद्यार्थ्यांनी यंदा नागपूर विद्यापीठाच्या परीक्षेत अपूर्व यश प्राप्त केले. खाजगीरीत्या परिक्षेला बसून श्री. शिवाजी संदर्भ ग्रंथालयाच्या विद्यार्थिनी सौ. कमल पांढरीपांडे या पहिल्या वर्गात पहिल्या आल्या. तसेच रमेश कांवळे, कु. नीलिमा दाणी आणि सौ. नीलिमा कुळकर्णी, कु. चारुलता फत्तेखानी हे विद्यार्थीही गुणानुक्रमाने पहिल्या पाच क्रमांकात उत्तीर्ण झाले. श्री. रमेश कांवळे व कु. चारुलता फत्तेखानी यांनी विदर्भ साहित्य संघाच्या 'साहित्य पारंगत' परीक्षेत पहिल्या वर्गात उत्तीर्ण होऊन यश प्राप्त केले. यंदा संदर्भ ग्रंथालयाच्या अभ्यास मंडळाचा फायदा एम. ए. परीक्षेसाठी जवळजवळ १०० विद्यार्थ्यांनी घेतला. याशिवाय ३० विद्यार्थी पदव्युत्तर संशोधन कार्य करीत आहेत.

१०. परीक्षा समिती

१०.१ प्रथम सत्रातील सर्व परीक्षा दि. २६ व २७ ऑगष्टला झाल्यात. १६ केन्द्रांत ५०० हून अधिक परीक्षार्थी सम्मीलित झालेत.

१०.२ प्रथम सत्रातील शासकीय व साहित्य पारंगत परीक्षा २३–९–७८ रोजी होतील. १० सप्टेंबर पर्यंत आवेदन पत्रे स्वीकारली जातील.

१०.३ आगामी द्वितीय सत्रातील सर्व परीक्षा २७ जानेवारी, १९७९ ला होतील. १५ ऑक्टोबर पर्यंत आवेदन पत्रे पाठवावीत.

१०.४ १९७९ पासून होणाऱ्या सर्व परीक्षांचा अभ्यासक्रम बोर्ड व विद्यापीठाशी समरूप राहील.

१०.५ किमान ३० परीक्षार्थी असल्यासच नव्याने केन्द्र देता येईल. त्यासाठी १५ ऑक्टोबर पर्यंत अर्ज आवश्यक आहेत.

अनुक्रमणिका
मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

११. शाखावृत्त

११.१ गोंडवन शाखा, चंद्रपूर दि. २०–८–७८ ला गोंडवन शाखेची सभा झाली. त्या संस्थेतर्फे "अखिल भारतीय मराठी साहित्य संमेलन," चंद्रपूर, येथे घेण्याचा निर्णय घेण्यात आला व रीतसर निमंत्रण महामंडळाच्या कार्यालयाकडे पाठविण्यात आले.

११.२ मूर्तिजापूर ३०–७–७८ रोजी वि. सा. संघाची सभा होऊन खालील कार्यकारीणी निवडण्यात आली. अध्यक्ष–रामदास एन. तिडके, उपाध्यक्ष–प्रा. जगदीश पांडे, प्रा. भाऊराव नवले, सरचिटणीस–भाऊराव भटकर, चिटणीस–शरद कुमार भटकर, कोषाध्यक्ष–लक्ष्मण भंगाळे.

११.३ लाखनी दि. ३०–७–७८ रोजी सभा होऊन खालील कार्यकारीणी निवडण्यात आली. अध्यक्ष–र. स. गिऱ्हेपुंजे, उपाध्यक्ष–फा. शं. देशमुख, कार्यवाह–द. सा. बोरकर, सहकार्यवाह–शि. बा. फटिंग, कोषाध्यक्ष–भा. गो. वंजारी व ८ सदस्य. ह्याच सभेत दिवंगत साहित्यिकांना मूक श्रद्धांजली अर्पण करण्यात आली.

११.४ गोंदिया दि. १३–८–७८ डॉ. मधुकर आष्टीकर यांनी शाखेला भेट दिली. नामदार छेदीलाल गुप्ता, वनमंत्री, महाराष्ट्र राज्य, यांचा दि. १३–८–७८ ला वि. सा. संघातर्फे सत्कार केला.

११.५ यवतमाळ दि. २९–७–७८ प्राचार्य वा. म. पेशवे यांच्या "ग्रामीण भागातील सत्ताधिष्ठित वर्ग व सत्तेची संकल्पना" व प्राचार्य सौ. माणिक पाटील यांच्या "अर्वाचीन संस्कृत महाकाव्ये" ह्या प्रबंधांवर दोघांना पीएच. डी. मिळाल्याबद्दल शाखाध्यक्ष प्रा. गोविंद देशपांडे यांच्या अध्यक्षतेखाली सत्कार करण्यात आला. ह्यावेळी दोघांची भाषणे झाली.

(इतर शाखांचे वृत्त हाती आले नाही).

⊕ ⊕ ⊕

नागपूर विद्यापीठातील मराठीचे प्रबंध

नागपूर विद्यापीठाने मराठी विषयातील आचार्य (पीएच्. डी.) पदवीसाठी अलीकडच्या काळात पुढील शोध-प्रबंध स्वीकृत केले आहेत :—

	विद्यार्थ्याचे नाव	प्रबंधाचा विषय	मार्गदर्शक
(१)	डॉ. रू. पां. पाजणकर	गडकऱ्यांच्या नाटकांतील व्यक्तिमत्त्वे : एक अभ्यास	प्रा. भ. श्री. पंडित
(२)	डॉ. विजया डवीर	नवी ऐतिहासिक कादंबरी	प्रा. म. गं. नातू
(३)	डॉ. अंबादास रं. असोलकर	अस्तित्ववाद आणि त्याचा १९४० ते १९७० या कालातील मराठी कविता, कथा, कादंबरी आणि समीक्षा यांवरील प्रभाव	डॉ. द. भि. कुळकर्णी
(४)	डॉ. विमल भालेराव	आधुनिक मराठी वाङ्मयातील स्त्रियांची आत्मचरित्रे (कालखंड : १९१० ते १९७५) : एक चिकित्सक अभ्यास	डॉ. वि. वा. प्रभुदेसाई
(५)	डॉ. मनोहर रामचंद्र रोकडे	महर्षी विठ्ठल रामजी शिंदे व्यक्ती आणि वाङ्मय	डॉ. गो. म. डोळके

अनुक्रमणिका
मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

वाङ्मयीन पुरस्कार

गोवा कला अकादमी अकादमीतर्फे गोमंतकीय लेखकांच्या उत्कृष्ट अशा मराठी व कोकणी वाङ्मय निर्मितीला पुरस्कार देण्यात येणार आहेत.

यांत काव्य, कादंबरी, लघुकथासंग्रह, चरित्रे, आत्मचरित्रे व आठवणी, बाल वाङ्मय, नाटक, ललित निबंध व प्रवासवर्णन आणि यापैकी कोणत्याही प्रकारात न बसणारे संकीर्ण साहित्य अशा आठ गटांतील प्रत्येक गटाला आणि दोन्ही भाषांतून मिळून एकूण प्रत्येकी एक हजार रुपये, असे सोळा पुरस्कार देण्यात येतील.

१ जानेवारी, १९७५ ते ३१ डिसेम्बर, १९७७ या कालावधीतच प्रसिद्ध झालेली पुस्तके या योजने-खाली विचारात घेतली जातील.

इच्छुक लेखकांनी अथवा प्रकाशकांनी, लेखकाच्या अनुमतीसह लेखकाचे नाव, पत्ता व गट आदी तपशिलासह प्रत्येक पुस्तकाच्या चार प्रती, सचिव, कला अकादमी, आल्तिनोपणजी, या पत्यावर ३० सप्टेंबर, १९७८ पर्यन्त पाठवाव्यात.

मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ
मकर संक्रांत, १९२३

युगवाणी (Yugwani) Regd. No. 1174 M. H.

● लौकरच प्रसिद्ध होत आहेत ●

❖ **रापण** : आत्मवृत्त : प्रल्हाद अनंत धोंड ❖ **मृगजळ** : कवितासंग्रह : इंदिरा : पुनर्मुद्रण
❖ **जेव्हा माणूस जागा होतो** : आठवणी गोदावरी परुळेकर पुनर्मुद्रण
❖ **व्यक्ती आणि वल्ली** : व्यक्तिचित्रे पु. ल. देशपांडे वाढविलेली नवी आवृत्ती

● काही आगामी पुस्तके ●

❖ **माती** : कादंबरी वि. ज. बोरकर ❖ **सौंदर्यानुभव** : समीक्षा प्रभाकर पाध्ये (ईस्थेटिक्स सोसायटी/मौज) ❖ **साठवणी** : आत्मपर लेखन रा. भी. जोशी ❖ **विश्वस्त** : कादंबरी ए. वि. जोशी ❖ **यक्षांची देणगी** : विज्ञानकथासंग्रह जयंत नारळीकर ❖ **पालाण** : कवितासंग्रह शंकर रामाणी ❖ **कॅक्टस-फ्लॉवर** : कवितासंग्रह अनुराधा पोतदार ❖ **आरण्यक** ललित लेख व्यंकटेश माडगूळकर ❖ **अनिकेत** समाजचित्रे अनिल अवचट ❖ **आलापिनी** : संगीतविषयक लेख वा. ह. देशपांडे ❖ **देवचाफा** कथासंग्रह विद्याधर पुंडलीक ❖ **चंद्रकांत राजाची कन्या** : ललित लेख सुरेश मथरे

मौज प्रकाशन गृह
खटाववाडी, गिरगाव, मुंबई–४०० ००४.

प्रकाशक : गो. स. देहाडराय, सरचिटणीस, विदर्भ साहित्य संघ, झाशी राणी चौक, नागपूर १२.
मुद्रक : क. मा. सावंत, व्यवस्थापक, नागपूर विद्यापीठ मुद्रणालय, नागपूर.

अनुक्रमणिका

मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ